# महाभारत

## खंड २० : अज्ञातवासपर्व ३

मराठी अनुवाद :

## श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## महाभारत खंड विसावा

## अज्ञातवास पर्व भाग तिसरा

## उद्योग पर्व (पुढे चालू)

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी

http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० सप्टेंबर २०१९**

## - अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा विसावा खंड आपण आता वाचणार अहात, त्यात उद्योग पर्वातील सनत सुजाता पर्व आणि यान संधी पर्व, आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणाऱ्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज

करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळयासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल.

त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः



धन्यवाद.

अशोक कोठारे


माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com

ashokkothare@yahoo.co.in


ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

# उद्योग पर्व पुढे चालू

# सनत सुजाता पर्व सुरू

# भाग एकेचाळीसावा

धृतराष्ट्र सांगतात, अरे विदूरा, आता कांहीं सांगण्यासारखे राहीले असल्यास तेसुद्धा मला ऐकावयाचे आहे. तुझी सांगण्याची पद्धत फारच रोचक आहे.

विदूर बोलतो, अहो धृतराष्ट्र, ते महान प्राचीन आणि अमर असलेले, ऋषी सनत सुजाता, जे कायम ब्रह्मचर्य पालन करत होते, ते सांगत कीं, मृत्यू अशी कांहीं गोष्ट नसते. त्यांचे त्याबद्दलचे विचार मी तुम्हाला सांगतो.

धृतराष्ट्र त्याला बोलतात, मला ठाऊक आहे किं, तू त् मला सांगू शकशील. तेवढा हुशार तू आहेस.

विदूर त्यावर बोलतो, "अहो मी शुद्र कुळातील असल्यामुळें फार कांहीं त्या विषयावर बोलणे योग्य होणार नाही. एवढे सांगू शकतो कीं, त्या ज्ञानी ब्राह्मणांने जे सांगितले ते अंतिम सत्य होते. ब्राह्मण कुळात जन्म घेतलेला सुद्धा त्यावर अधिकार वाणीने बोलू शकत नाही. म्हणून मी त्यावर बोलण्याचे धाडस कसें करणार"? धृतराष्ट्र त्याला बोलतो, "अरे ते सगळे सोड कारण मला माहीत आहे कीं, तू कोणत्याही ब्राह्मणांपेक्षा कांहीं कमी नाहीस व तुला त्याचे बरेच कळते. म्हणून मला सांग, अरे विदूरा, मी ह्या देहानी त्या प्राचीन व अमर ऋषीला भेटू शकतो कां"?

वैशंपायन पुढे सांगतात, विदूर त्या महान ऋषीचे स्मरण करू लागतो. त्याच्या तीव्र तपस्येमुळें तेथे तो अमर ऋषी साक्षात प्रकट होतो. ते पाहिल्यावर विदूर त्यांचे रिवाजानुसार आदरतीथ्य करतो. त्या नंतर ते स्वीकारून तो ऋषी त्याला दिलेल्या आसनावर विराजमान होतो. त्यानंतर विदूर त्या ऋषीला बोलतात, "अहो ज्ञानी, सनत सुजात जी, आमच्या मोठ्या बंधूला त्याच्या कांहीं शंकांचे निरसन करून घ्यावयाचे आहे, तरी आपण ते सांगू शकाल कां"? कारण मी शुद्र कुळातील असल्याने ते करू शकत नाही. आपण जर त्याच्या शंकांचे निरसन करणार असाल तर त्यांची मोठ्या विवंचनेतून सुटका होईल. जीवनातील प्राप्ती आणि नुकसान, काय योग्य आणि

काय अयोग्य, ऱ्हास आणि मृत्यू, भिती आणि मत्सर, तहान आणि भूक, गर्व आणि समृद्धी, आवड आणि नावड, वासना, क्रोध आणि जीवनातील चढ उतार तो सहजपणे सहन करू शकेल.

सनत सुजाता पर्व भाग एकेचाळीस संपला.

# सनत सुजाता पर्व

## भाग बेचाळीसावा

वैशंपायन पुढे सांगतात, त्यानंतर राजा धृतराष्ट्र विदूरांचे कौतुक करत ऋषीला विचारतो, "अहो महा ऋषी मी ऐकतो आहे कीं, आपण सांगता कीं, मृत्यू अशी कांहीं गोष्टच नाही"? पुढे असे समजतात कीं, असुर व देव अध्यात्म साधना करतात कारण त्यांना मृत्यू नको असतो. ह्यात काय तथ्य आहे ते जर मला समजावून सांगितले तर आपली माझ्यावर मोठी कृपा होईल".

सनत सुजात त्यावर त्याच्याकडे पहात बोलतात, "कांहींजण समजतात की, मृत्यू कांहीं विशिष्ट गोष्टी केल्यातर टाळता येतो. दुसरे कांहीं समजतात, मृत्यू अशी कांहीं गोष्टच नाही. तू मला विचारत आहेस कीं, ह्यातील खरे काय? ऐक मी काय सांगतो ते, मी जे सांगतो ते ऐकल्यावर तुझ्या मनातील सर्व शंकांचे समाधान होईल. अरे क्षत्रिया, वस्तुतः दोनही गोष्टी त्यांच्या सापेक्षते प्रमाणे, खऱ्या आहेत. ज्ञानी माणस समजतात, मृत्यूचे अस्तित्व अज्ञानामुळें मान्य केले जाते. खऱ्या अर्थाने अज्ञान म्हणजेच मृत्यू. आणि ज्ञान म्हणजेच अमरत्व. असुरांचा मृत्यू त्यांच्या अज्ञानामुळें होत असतो. देवांना ज्ञान असल्यामुळें ते अमर समजले जातात. त्यामुळें ते ब्रह्म अवस्थेला पोहोचतात. मृत्यू कोणाला खात नाही जसें वाघ त्याच्या सावजाला खातो. मृत्यूचे कांहीं स्वरुप नसते. त्याच प्रमाणें कांहीं समजतात यम म्हणजे मृत्यू. असें समजतात तो काल्पनिक देव यम पितरांच्या राज्याचा राजा आहे. त्याची कल्पना ज्ञानी लोकांना आनंद देते व अज्ञानी लोकांना भिती. ऋषी पुढे सांगतो, मृत्यूचे कांहीं प्रकार असतात. शरीराचा मृत्यू, अहंकाराचा मृत्यू, वासनांचा मृत्यू, लोभांचा मृत्यू असें विविध मृत्यू आहेत. त्यात राग हा एक मृत्यूचा प्रकार असतो. अज्ञान हा सुद्धा एक मृत्यूचा प्रकार आहे. अहंकारामुळें जेव्हां माणूस चांगुलपणा, माणूसकी (कोणाच्याही अज्ञानाचा, गरीबीचा, भोळेपणाचा, कमजोरीचा गैरफायदा न घेणे ह्यालाच माणूसकी असें म्हणतात) आणि भूतदया विसरून वागतो, तेव्हां त्याच्यातील सात्त्विकतेचा मृत्यू होत असतो. वासनांत गुरफटलेले त्यांचे ज्ञान हरवून बसतात, आणि त्या वासनाच्या आहारी गेल्यामुळें ते भरकटत जातात. तो एक प्रकारचा त्याचा मृत्यूच ठरतो. तशा अवस्थेत असतांना जर त्याला शरीराचा मृत्यू प्राप्त झाला तर तो त्या वासनेच्या पापमय लोकांत जातो. जे वासनांच्या आहारी जात नाहीत ते तसे भरकटत नाहीत. ते उच्च लोकांत जातात. वासनांत अडकलेले पुन्हा पुन्हा जन्म घेतात व वासनांत अडकलेले असल्यामुळें पुन्हा पुन्हा खालच्या लोकांत

त्यांच्या शरीराच्या मृत्यूनंतर फेकले जात असतात. जे वासनांत अडकलेले नाहीत ते त्यांच्या शरीराच्या मृत्यूनंतर स्वर्गात जातात. जे ब्राह्मज्ञाना पासून दूर असतात ते त्यांच्या वासनिक जीवनांमुळें अशारितीने जन्म मृत्यूच्या फेर्यात अडकलेले असतात. येथे वासना ही शरीराची त्याच्या संरक्षण, संवर्धन इत्यादी बाबींसाठी आवश्यक समजली जाते, जे समजदार ते लक्षात घेऊन त्यात शरीराच्या गरजां व्यतिरीक्त जास्त गुंतत नाहीत, ते त्या वासनांच्या आहारी जात नाहीत व ते जन्म मृत्यूच्या फेर्या पासून बचावले जातात. वासनांच्या गरजांना असत्य म्हणजे मायेच्या भोवर्यात फसलेले असें मानले जाते. शरीर हे असत्य म्हणजे मायेचाच भाग असल्यामुळें त्याची तेवढी गरज पुरवावी लागते. त्यालाच योगक्षेम असें म्हणतात. वासनिक भोगात असलेले त्यासाठी युद्ध करतात. त्यात ते मारले जातात. वासना पूर्ण न झाल्यास त्यातून क्रोध किंवा दुःख उत्पन्न होते. पुन्हा त्या प्रतिक्रीयांत तो अडकून घेतो स्वताला. ज्याला वासनांची सुमर्यादीत उपयुक्तता समजली आहे व जो स्वताला आत्मा समजतो व शरीराला त्यांचे सार्थ स्थान देतो तो वासनांत अडकत नाही. परंतु, त्यांची शरीराची गरज पहाता तो त्यां वासनांना त्यांचे यथायोग्य स्थान देऊन स्वताला त्यांपासून सुरक्षित करतो. जो ते समजून करत नाही तो त्या वासनांच्या जाळयात अडकून पुन्हा पुन्हा मृत्यूला गाठतो प्रत्येक जन्मात. जो समजतो कीं, ह्या मायावी जगात आत्म्यासाठी कांहींच नाही, जे कांहीं आहे ते शरीराच्या सौख्यासाठी आहे तो तेवढे भोग शरीरापुरते घेतो तसा माणूस शरीराच्या वासनांबद्दल त्या भोगत असतांनासुद्धा उदासिन होतो. अशारितीने ज्याने इंद्रीय भोगांपासून स्वतांला (स्वताच्या आत्म्याला) मुक्त केले त्याला यमदेव स्पर्श करू शकत नाही. परंतु, जो त्याच्या इंद्रीयांच्या भोगात अडकला त्याला यमदेव खेचून नेतो खालच्या लोकांत. वासना असणे म्हणजेच अज्ञान. कारण शरीर हे अज्ञानाचे एक रुप असते. त्यातून ज्ञानाच्या अंधारात तो अडकलेला असतो. जसे नशा केलेला माणूस त्याचे भान राखू शकत नाही तसेंच हे असते. वासनेच्या मोहात अडकलेले लोक अखेरीस स्वताच्या नाशाचा रस्ता धरतात. परंतु, ज्यांचा आत्मा वासनेच्या मोहात अडकलेला नाही त्याची दृष्टी स्वच्छ असते व तो भ्रष्ट होत नाही. त्याला मृत्यूची भिती नसते. म्हणून अरे क्षत्रिया, ज्याला मृत्यूची भिती नको असेल तो कोणतीही व्यर्थ वासना वाढवत नाही आणि कोणत्याही मोहात अडकत नाही. जर तुझ्या शरीरात असलेला आत्मा क्रोध आणि लोभाच्या कचाट्यात अडकलेला आहे तर तुझे ज्ञान कधीच पूर्ण होणार नाही. तो क्रोध आणि लोभ तुला अज्ञानातच धरून ठेवेल. तो एक प्रकारचा वासनेच्या प्रभावा खालील मत्यू असेल. त्या परिस्थितीत तू जरी शरीराने जीवंत वाटत असलास तरी दैविक दृष्ट्या मेल्या सारखाच असतोस. अशा परिस्थितीत जेव्हां ज्ञानी माणसास समजते कीं, त्याचा मृत्यू आला आहे तो त्यामुळें घाबरत नाही. जरी त्याचे मर्त्य शरीर नष्ट झाले तरी तो अमर आत्मा स्थीरपणे त्याच्या लिंगदेहासह रहातो. त्याच्यासाठी मृत्यूच संपतो.

धृतराष्ट्र त्याला विचारतो, "वेदात सांगितले आहे कीं, पवित्र मुक्तात्मे जे अवतारी ब्राह्मण आहेत ते त्या अवस्थेत जाण्यासाठी प्रार्थना आणि यज्ञ करतात. असें असतांना विद्वान माणसे त्या मार्गाचा अवलंब कां करत नाही आणि मृत्यू पासून स्वताची सुटका कां करून घेत नाहीत"?

सनत सुजाता सांगतो, तू म्हणतोस त्या मार्गाने ते जातात, ते योग्यसुद्धा आहे. परंतु, जे ह्या शरीराला प्रधान मानतात व आत्म्याकडे दुर्लक्ष करतात, त्यांनी जर वासनांचा मनापासून त्याग केला तर ते ब्रह्मपदी जातात. परंतु, जर वासनांत अडकलेल्या अवस्थेत ब्रह्मपदाची अपेक्षा करत असेल व त्यासाठी यज्ञ करत असेल तर त्याला त्या यज्ञाचा कांहींही उपयोग होत नाही. असें लक्षात घे अरे क्षत्रिया, वासना शरीराच्या योगक्षेमासाठी असतात व त्यात आत्म्याने लक्ष घालावयाचे नसते त्यासाठी शरीराच्या व आत्म्याच्या गरजातील फरक जो समजतो तो हे जे मी सांगितले ते समजू शकतो.

धृतराष्ट्राचा प्रश्न असा होता कीं, केवळ वासनामुक्तीच्या ज्ञानाने काम होत असेल तर यज्ञयागा सारख्या कर्मयोगाची का आवश्यकता भासते?

(हिंदू मान्यतेनुसार) मुक्ती म्हणजे आत्मानंद नव्हे तर पूर्णपणे वासनांच्या इच्छेतून मोकळे होणे असें आहे. आत्मानंद ही एक मधली अवस्था असून त्यात सुद्धा तो वासनांच्या कचाट्यातून पूर्णपणे मोकळा झालेला नसतो. परंतु, त्यांचे प्रभाव त्याने कमी केलेले असतात. त्या कारणांने त्याचे पुन्हा जन्म घेणे थांबत नाही. मुक्ती प्राप्त झाली कीं, ते पुनर्जन्म होणे थांबते. तरी अशा मुक्त आत्म्यांना कांहीं कामानिमित्त इतर आत्म्यांना मदत करण्यासाठी अवतार घ्यावे लागत असतात. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे ह्या ना त्या कारणांने आत्म्याचे पुनः जन्म घेणे चालूच असते. मुक्त होण्या आधी तो स्वताची मुक्तता करण्यासाठी जन्मत असतो व मुक्त झाल्यानंतर तोच आत्मा दुसऱ्यांना मुक्त होण्यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी जन्म घेत असतो. हे असें असते, विद्यार्थी व शिक्षक दोघेही शाळेत जात असतात पण एक (विद्यार्थी) शिकण्यासाठी जात असतो व दुसरा (शिक्षक) शिकवण्यासाठी जात असतो.

कर्मापासून मुक्तता म्हणजे शरीराच्या योगक्षेमात आत्म्याने लक्ष न घालणे असा आहे. अशा परिस्थितीत शरीर त्याचे काम करत असते व त्यात आत्मा ढवळाढवळ करत नाही. त्या अवस्थेत असणाऱ्यांना आत्मानंदी अवस्था असें समजले जाते.

धृतराष्ट्र पुढे विचारतात, "तो स्वयंभू आणि प्राचीन कोण आहे? त्याला ह्या सगळया उठाठेवी करण्याचे कारणच काय? त्याला हे करण्याची इच्छा कां झाली? जो स्वतः अशा इच्छेने बांधलेला आहे तो इतर आत्म्यांचे कसे नियमन करतो? हे सगळे करून त्याला काय मिळते"?

सनत सुजाता बोलतात, स्वयंभूने प्रथम गुण निर्माण केले जे त्याच्या मुळ अध्यात्मिक उर्जेचा परिणाम आहेत त्यातून मोघमपणे सत्त्व, रज आणि तम असें गुण उत्पन्न झाले. त्यांच्यातून पुढच्या प्रक्रीया सुरू झाल्या असें वेद सांगतात. ते तीन गुण त्या स्वयंभूचेच रुप आहेत. आपण सगळे त्या तीन गुणातून उत्पन्न होत असतो. त्या तीन गुणाच्या निर्मितीला जी कारणे होती ती सुद्धा स्वयंभूचाच हिस्सा आहेत, वेद तेंच सांगतात. स्वयंभूला स्वतःला पहाण्याची, अनुभवण्याची इच्छा झाली ती इच्छा ह्या सगळ्या विश्वाच्या कारभाराला कारण आहे. जोवर ती इच्छा कार्यरत आहे तोवर अरे क्षत्रिया, हे जग असेंच कार्यरत रहाणार आहे. त्या इच्छेमुळें स्वयंभू, जो साक्षात अध्यात्मिक उर्जेचे मुळ आहे, प्रथम अवकाश उत्पन्न करतो. त्यात त्याची सगळी अध्यात्मिक उर्जा प्रवेश करते. परंतु, तो अवकाश सतत वाढत असतो दहाही दिशांनी. त्यामुळें दहा दिशा तयार होतात. तसे होत असल्यामुळे त्याला जो अवधी लागतो त्यामुळें काळ हे परिमाण तयार होते. कालांतराने विश्वाचा आकार एवढा होतो कीं, त्यात स्वयंभूची सगळी अध्यात्मिक उर्जा सामावून आणखीन जागा उरते. त्यामुळें त्या उर्जेचे विभाजन होऊन ती कांहीं भागात जास्त व कांहीं भागात साधारण तर काहीं भागात कमी अशी विभागली जाते. त्यामुळें जास्त अध्यात्मिक उर्जा असलेल्या भागात सात्त्विक गुणाचा अनुभव येतो, त्याच प्रमाणे साधारण असते त्यात रजोगुणाचा व कमी आहे तेथे तमोगुणाचा असें अनुभव येतात. त्यानंतर जेथे अध्यात्मिक उर्जा नाही अशा भागातून त्या अध्यात्मिक उर्जेच्या प्रभावामुळें जड उर्जा उत्पन्न होते. अध्यात्मिक उर्जा व जड उर्जा (गुरूत्व, चुंबकीय, उष्णता, ध्वनी, विद्युत, प्रकाश आणि स्पंदनं) ह्यातील फरक असां कीं, अध्यात्मिक उर्जेत चैतन्य असते, ती स्वतंत्रपणे विचार करू शकते व निर्णय घेऊ शकते तर जड उर्जा पदार्थ स्वरुप असते. तिला कार्यरत करण्यासाठी अध्यात्मिक उर्जेची म्हणजे चैतन्याची आवश्यकता असते. त्याकरतां, सर्व विश्वात चैतन्य रुपाने अध्यात्मिक उर्जा कार्यरत असते. फक्त फरक असा कीं, तिचे प्रमाण कमी जास्त असते. जेव्हां फार कमी असते तेव्हां त्यात संवेदना नसतात व जसें तिचे प्रमाण वाढत जाते त्यांची संवेदना क्षमता वृद्धींगत होत असते. अशारितीने अरें क्षत्रिया, ह्या सृष्टीची सुरूवात झाली.

धृतराष्ट्र विचारतात, "ह्या जगात कांहीं पुण्य जमवण्याचा मार्ग आचरतात व कांहीं कर्म सन्यास घेतात. ज्याला संन्यास योग असें म्हणतात. त्यातील कोणता मार्ग जास्त श्रेयस्कर ते सांगा. कोणत्या मार्गाने माणसातील दोष खऱ्या अर्थाने संपुष्टात येतात. दुर्गुणाने ते मार्ग निरुपयोगी होतात कां"?

सनत सुजाता बोलतात, पुण्याचा मार्ग आणि संन्यास हे दोनही आपापल्या प्रकारे चांगले आहेत. परंतु, शहाणा माणूस संन्यास (औदासिन्य) मार्ग विशेष पसंत करतो. कारण पुण्य

कमावण्याच्या मार्गात बहुधा तो बर्याच वेळा पाप करून बसत असतो. त्यामुळें त्याला दोनही (पाप व पुण्य) करण्याची फळं भोगावी लागतात. त्यामुळें त्याचे स्वर्ग आणि नरक ह्यात फिरणे चालू रहाते. परंतु, बुद्धीमान माणूस त्याच्या पुण्यवंत कृत्याने पापाचे परिणाम नष्ट करू शकतो. त्याच्या जीवन कार्यात जर पुण्याचा प्रभाव जास्त असेल तर त्याला हा मार्ग आचरण्यास हरकत नसते. औदासिन्यामुळें पाप घडत नाही व तपस्येमुळें तो फक्त पुण्य जमा करत असतो, ज्यामुळें त्याची अध्यात्मिक उर्जा सतत वाढत जाते. असा तपस्वी, त्या मार्गाने यशस्वी होतो.

धृतराष्ट्र विचारतो, "पुण्य कर्मामुळें ज्या विविध योग्यतेच्या पातळया (लोक) साधक गाठू शकतो त्याची माहीती मला सांगा. इतर लोकांचीसुद्धा मला माहीती सांगा. अहो ज्ञानी मुनी, पापकर्मामुळें जे लोक त्याला मिळतात, ते मला ऐकावयाचे नाहीत".

सनत सुजाता सांगतात, जे ब्राह्मण त्यांच्या योगसाधनेचा सार्थ अभिमान बाळगतात, ते मेल्यानंतर ब्रह्म लोकाला जातात. जे ब्राह्मण अभिमानाने त्यांचे यज्ञयाग करतात, आणि इतर वैदीक कर्मकांड करतात ते देवलोकाला जातात. कांहीं वैदीक साधक मानतात कीं, वेदाच्या कर्मकांडाचे आचरण बंधनकारक असते, ते न केल्यास तेच एक पाप कर्म ठरते. अशा कर्मकांडाच्या क्रिया खरेतर आवश्यक नसतात पण ते त्या करत रहातात. त्यांना विशेष महत्व देण्याची आवश्यकता नसते. जो सज्जन ब्राह्मणाला शिधा दिल्याशिवाय खात नाही त्याच्या चांगुलपणामुळें तो पुण्यवंत वरच्या लोकांत जातो. ब्राह्मणांनी जर आपल्या मोठेपणासाठी गरीब गृहस्थाला त्रास दिला तर तो ब्राह्मण त्याच्या त्या कृत्यामुळें अध्यात्मिक उर्जेत खाली उतरतो. स्वताचे श्रेष्ठत्व शाबित करणारा योगी बरबाद होतो. समाजात रहाणाऱ्या ब्राह्मणांने आपल्या योगीक साधनेचा चवाठा करावयाचा नसतो. तसे केल्यांने लोकपाल (इंद्र, वरुण, वायू, अग्नी, कुबेर आणि यम) देवता नाराज होतात. योग्य साधना करणारे क्षत्रिय त्याप्रमाणें साधना करून आपले उद्दिष्ट साध्य करू शकतात. जो ब्राह्मण कोणाकडूनही भेटी घेत नाही, जो सर्वांचे मन जिकतो, जो शांत स्वभावाचा आहे, ज्याचे वेदाचे ज्ञान पुरेसे आहे, तोंच ब्रह्मपदाला जाऊ शकतो. जो वास्तविक संपत्तीबाबत गरीब आहे परंतु, दैवी संपत्तीबाबत (अध्यात्मिक उर्जा) संपन्न आहे, ज्याने यज्ञ केले आहेत, जो अजिंक्य आणि बेडर होतो. त्याला ब्राह्मण समजायला हरकत नाही. ज्या माणसांने यज्ञ केले आहेत व देवांना प्रसन्न केले आहे, तो तरीसुद्धा ब्रह्म जाणणाऱ्या साधकाची बरोबरी करू शकत नाही. कारण यज्ञ करणाऱ्याला त्याच्या कर्मामुळें कांहीं उपाधी लागतात ज्या केवळ ब्रह्म जाणणाऱ्याला नसतात. जेव्हां दैवी शक्ती त्याला मानतात जरी तो यज्ञ करत नाही तो खरा सन्माननीय समजावा. अशा साधकाला जरी कोणी इतरांनी मानले नाही तरी त्याची पर्वा त्यांने करावयाची नसते.

माणसें त्यांच्या स्वभावानुसार वागतात अगदी सहजपणे जसे डोळयाच्या पापण्यांची उघडझाप होत असते. परंतु त्याला ओळखणारे ज्ञानी त्याला ओळखतात व मानतात. पापात रमलेले, चोर्या करतात, इतर पाप करतात ते योग्य माणसाला ओळखत नाहीत. उलट ते त्या ज्ञानी माणसाचा अपमान करतात. कारण त्यांना त्याची योग्यता समजण्याची कुवत नसते.

आता मौन साधनेबाबत सांगतो, वैराग्यातील मौन पाळणे ही एक मोठी साधना असते. समाजातील सन्मानाचे व मौनाचे जमत नाही कारण मौन पाळणाऱ्यांना समाज समजू शकत नाही. त्यांच्याबद्दल गैरसमज पसरतात. परंतु, हे जग मानमरातबाचे आहे त्यांमुळें साधारणपणे मौन पाळले जात नाही. त्या उलट अध्यात्मिक जगात मौनाचे महत्व विशेष असते. क्षत्रिय ह्या जगात मानाभरात रहातात. ते समृद्धी प्राप्त करतात. परंतु, त्यांना दैवी कृपा लाभत नाही. वासनांच्या वाटा पुष्कळ असतात, त्या सगळया थांबवता येत नाहीत. खरे सत्य ह्यात असे आहे कीं, सच्चा प्रामाणिकपणा, नम्रता, संयम, इंद्रिय निग्रह किंवा औदासिन्य, मनाची शद्धता, वेदांचा अभ्यास ह्या साधनांच्या मदतीने खरा साधक त्याचा अहंकार आणि अज्ञान संपुष्टात आणू शकतो.

सनत सुजाता पर्व भाग बेचाळीसावा संपला.

## सनत सुजाता पर्व

## भाग त्रेचाळीसावा

धृतराष्ट्र विचारतात, "वैराग्यामध्ये मौन आणि ध्यान ह्या दोन गोष्टी येतात, त्यातील फरक काय ते सांगा. त्यातील कोणते आपल्या दृष्टीने जास्त चांगले आहे? अहो ज्ञानी, मला सांगा, मौन ह्या तपस्या प्रकाराचे महत्व काय? वेदाचा अभ्यास केलेला माणूस केवळ मौन आचरून मोक्ष प्राप्त करू शकतो कां"? मौन आचरण्याच्या पद्धती बद्दल सांगा.

सनत सुजाता सांगतात, "स्वयंभूला मिळणे वेदाच्या ज्ञानाने अथवा केवळ मौनाने साध्य करणे केवळ अशक्य असते. म्हणून आत्म्यालाच कांहीं ज्ञानी मौनी म्हणतात. त्या मौनातून ध्वनी उत्पन्न झाला आहे, त्यात ओम हा पहिला आहे".

धृतराष्ट्र पुढे विचारतात, चारही वेदांचे ज्ञान असलेला पाप करून भ्रष्ट होऊ शकतो कां"?

सनत सुजाता बोलतात, ज्याने त्याच्या वासनांवर नियंत्रण ठेवलेले नाही, त्याने वेद शिकून सुद्धा कांहीं उपयोग नाही. पाप करणाऱ्याला त्याच्या कर्माचे फळ भोगावेच लागते, मग तो वेदाचा ज्ञाता असला अथवा नसला त्याने कांहीं फरक पडत नाही. ज्याप्रमाणे पंख फुटलेला पक्षी त्याचे घरटे सोडून जातो त्या प्रमाणे वेदाचे ज्ञान त्या पापाचरण करणाऱ्याला सोडून जाते. धृतराष्ट्र बोलतात, "ते उघड आहे कीं, केवळ वेदांचे ज्ञान असून कांहीं होत नाही, त्यासाठी पुण्य वाढणे हे महत्वाचे असते. त्याचा अर्थ असा होतो कीं, हा केवळ एक समज आहे ब्राह्मणांत कीं वेद पापी माणसाला वाचवतात".

सनत सुजाता त्यावर सांगतात, अहो महाजन, हे विश्व स्वयंभूच्या विविध प्रवृत्तींमुळें विकसित झाले आहे. त्यात नांव, आकार अशा प्रवृत्ती आहेत. तसेंच त्या विविध प्रवृत्ती आणि स्वयंभू हे एकरुप नाहीत असें वेदांत सांगितले आहे. म्हणून स्वयंभू मध्ये विलीन होण्यासाठी जे त्या विश्वाचे भाग म्हणून उत्पन्न झाले आहेत त्यांना त्या प्रवृत्तींतून बाहेर पडावे लागते. त्यासाठी विविध पद्धतीच्या साधना विशेष आचरण्यात येतात. आपण जे वासनामय जीवन जगतो त्यामुळें आपण त्या प्रवृत्तीत अडकलेले असतो. परंतु, जेव्हां त्या वासनांतून तुम्ही मुक्त होता पूर्णपणे त्या वासनांच्या बंधनातून मुक्त झाल्यानें आपसुकपणे तो स्वयंभूच्या जवळ जाऊ लागतो. त्याची अध्यात्मिक उर्जा वाढत जाते परिणाम स्वरुप तो स्वयंभूत विलीन होतो. तरी अरें क्षत्रिया, त्यानंतर सुद्धा तो स्वयंभूत पूर्णतया विलीन होऊ शकत नाही, जोवर हे विश्व कार्यरत आहे. अध्यात्मिक उर्जा वाढवण्यासाठी आत्म्याची ताकद वाढवावयाची असते. ते करण्यासाठी, मौन

आणि ध्यान ह्या साधना उपयोगी असतात. विचार करण्यानें आत्म्याची शक्ती खर्च होत असते, त्यासाठी विचार न करणे हा एक प्रभावी मार्ग आचरला जातो. त्यातून ध्यान मार्ग विकसित झाला आहे. माणसाच्या मेंदूची रचना अशी आहे कीं, तो एका वेळी एकच कार्य करू शकतो. त्यामुळें जेव्हां तो विचार करतो त्यावेळी तो इतर कार्य नीटपणे करू शकत नाही. तसेंच जेव्हां तो एकाद्या कामावर त्याचे ध्यान एकाग्र करतो तेव्हां तो विचार करू शकत नाही. ह्या प्रवृत्तीचा उपयोग ध्यान साधनेत केला जातो. ही प्राचीन साधना आहे. त्यासाठी साधकाने कशावर तरी त्याचे लक्ष एकाग्र करावयाचे असते अशा वर कीं, त्याने त्याची अध्यात्मिक उर्जा खर्च होणार नाही. मौनात सुद्धा विचार प्रक्रीया थांबवणे हांच उद्देश असतो. अशारितीने जेव्हां तो ध्यान, मौन साधना करतो नियमितपणे त्याच्या आत्म्याची अध्यात्मिक उर्जा वाढत रहाते त्यामुळें त्याची सात्त्विकता सुधारत जाते, हिंच प्राचीन साधना पद्धती आहे. त्यासाठी यज्ञाप्रमाणे कोणतेही इतर साधन व सुविधा आवश्यक नसते. अरे क्षत्रिया, तुला माहीत आहे की, तत्वतः स्वयंभू आणि तुझ्यातील आत्मा एकच आहेत फक्त तुझ्या मधील आत्म्याने अनेक जन्मात विनाकारण विचार करून अगणित अशी अध्यात्मिक उर्जा व्यर्थ घालवलेली आहे. ती सगळी पुनः प्राप्त करण्यासाठी ध्यान साधना हा एक अतिउपयोगी असा मार्ग आपल्या ऋषींनी फार पूर्वी शोधून काढला आहे. आपण बोलण्याने सुद्धा आपली अध्यात्मिक उर्जा व्यर्थ घालवत असतो म्हणून प्राचीन ऋषींनी मौन हा मार्ग सांगितला आहे, जेणे कारणे, तो बोलणार नाही व त्याची उर्जा व्यर्थ घालवणार नाही. अरें क्षत्रिया, केवळ मौन धारणा करून भागत नाही, त्याबरोबर ध्यानसाधना (विचारशुन्य अवस्थेत रहाणे) करणे आवश्यक असते. त्या दोघांच्या मदतीने साधक उच्च पदी जाऊ शकतो. बोलण्या प्रमाणे ऐकणे हे सुद्धा अध्यात्मिक उर्जा कमी करण्यास कारणीभूत होऊ शकते जर आपण नको ते ऐकत असू. मनुष्य पापं करतो त्यामुळें सुद्धा त्याची अध्यात्मिक उर्जा कमी होत असते. म्हणून साधकांनी पापकर्म करू नये असें ठरलेले आहे. परंतु, शरीराच्या योगक्षेमात पाप कर्म अपेक्षित असते ते होणारच म्हणून त्याच्या निवारणार्थ आणखीन ध्यान करावयाचे असते. पुण्य कर्मांने अध्यात्मिक उर्जा वाढते म्हणून साधकांने पुण्य कर्मात त्याचा समय व्यतीत केला पाहिजे. जो माणूस त्याचे चार उद्देश (धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष) साध्य केल्याने जे भोग त्याला प्राप्त होतात ते तो भोगतो व ते कालबद्ध असल्याने त्यांचा समय संपल्यावर त्याला पुनः जन्म घ्यावा लागतो. ह्या जन्मातील ध्यान साधनेने जे त्यांने मिळवले ते त्याला बहुधा त्याच्या नंतरच्या जन्मात उपयोगी येतात.

धृतराष्ट्र विचारतो, "अहो ऋषी सनत सुजाता, दोन वैराग्य आचरणाऱ्यात एकाला यश प्राप्त होते व दुसऱ्याला प्राप्त होत नाही असें झालेले आपण प्रायः अनुभवतो, ते कां तसें होते"?

सनत सुजाता सांगतात, "एक गोष्ट लक्षात घे अरे क्षत्रिया, केवळ मौन अथवा ध्यान साधना आणि वरकरणी वैराग्य असून कांहीं उपयोगाचे नसते कारण, मुख्य गाभा आहे तो अध्यात्मिक उर्जेच्या व्यवस्थापनाचा. त्यासाठी तो साधक निरीच्छ प्रवृत्तीचा असावा लागतो. म्हणजे तो सात्त्विक असावा लागतो. ज्याच्या सगळया इच्छा त्याच्या शरीराच्या योगक्षेमापुरत्या मर्यादीत असल्या पाहिजेत. ज्याच्या विचारांची अवस्था अशी आहे त्याला यश हमखास मिळणारच व ज्याची तेवढी तयारी नाही त्याला ते यश मिळण्याची शक्यता नसते. ज्या इच्छा त्याच्या शरीराच्या योगक्षेमापेक्षा जास्त आहेत म्हणजे त्याच्या आत्म्याला त्या इच्छांचा मोह झाला आहे, त्याने कितीही साधना केली तरी तो एक मिथ्याचार होतो".

सनत सुजाता पुढे त्याला सांगतात, "तुझ्या चौकशा वैराग्य प्रवृत्तीच्या सर्व बाजूंचा विचार करणाऱ्या आहेत. वैराग्य प्रवृत्ती जी प्रामुख्याने औदासिन्याच्या धोरणाने साध्य होते तींच ब्रह्मा पर्यंत माणसाला पोहोचवण्यात मदत करत असते".

धृतराष्ट्र पुढे विचारतात, "निर्दोष वैराग्य म्हणजे काय ते मी आता आपल्याकडून समजलो आहे. त्यामुळें माझ्या त्या बाबतच्या शंकांचे समाधान झाले आहे. आता मला सांगा सदोष वैराग्य कसे ओळखावे"?

सनत सुजाता सांगतात, "अरे राजा, तेरा प्रकारची पापमय लक्षणं आहेत त्यात क्रोध प्रमुख असतो, त्यामुळें वैराग्य भ्रष्ट होत असते. त्यामध्यें द्वेष, भोगांबद्दलची सुप्त वासना, अहंकार, योग्य अयोग्य ह्यातील फरक न समजणे, क्रौर्य, सुखासिनतेचा मोह, मत्सर, दुःखी होणे, लोभीपणा, आशावादी असणे, गर्व, दुसऱ्यांचा अपमान करण्याची इच्छा (दुसऱ्याला तुच्छ समजण्याची प्रवृत्ती, ह्याला अहंकाराचे विकृत रुप असें समजले जाते) हे दोष साधारण माणसांत असतात. हे बारा टाळणे वैराग्यासाठी आवश्यक असते. त्यातील एकसुद्धा त्याचे वैराग्य भ्रष्ट करू शकते. ते माणसात त्याच्या अहंकाराच्या प्रवृत्तीमुळें लपून बसलेले असतात व संधी मिळतांच ते प्रकट होतात. स्वताचा अहं व्यक्त करण्याची तीव्र इच्छा ह्या सगळयां मागे असते. ज्या प्रकारच्या विचारांमुळें व त्यातून प्रकट होणाऱ्या कृतीमुळें त्याच्या अहंकाराला पुष्टी मिळते ते सगळे तो करू इच्छित असतो. त्या कृतींमुळें किंवा त्यांच्या विचारांने तो पाप करत असतो ज्यामुळें त्याची अध्यात्मिक उर्जा कमी होत असते. रजोगुणी आणि तमोगुणी लोक वासनापूर्ती म्हणजेच अंतिम सुख असें समजून त्यासाठी प्रयत्न करतात. त्यांना असें वाटते कीं, वासनांच्या पुर्ततेतूनच सर्वकाहीं मिळते ते त्यात रमतात. परंतु, अशी एक वेळ येते जेव्हां त्याला समजते कीं, वासनापूर्ती कधीच पूर्ण समाधान देत नाही. तेव्हां त्याला त्याच्या अपुरेपणाची कल्पना येते. तो पर्यंत असा इसम त्यांत पूर्णपणे अडकलेला असतो. त्याला त्या विविध वासनांचे जणू व्यसन लागलेले असते, त्यातून

सुटका केवळ अशक्य असते. अशी माणसें त्यात घोटाळत रहातात, अनेक जन्म. आपल्यावर विसंबून असणाऱ्या प्रजेवर त्यांना पेलणार नाहीत असें कर लादून तो भ्रष्ट राजा त्याचा अहंकार पोसत असतो. अशी माणसें स्वताशिवाय कोणावरही प्रेम करत नाहीत. त्यांचे प्रेम हे त्यांच्या अहंकाराच्या आविष्काराचा एक भाग असते. जेथे त्याचा मतलब साध्य होणार तेथे त्याचे प्रेम असते परंतु, जेव्हां त्याला समजते कीं, त्याचा स्वार्थ साध्य होणार नाही तेव्हां त्याचे प्रेम संपुष्टात येते व त्याची जागा तिरस्कार, द्वेष, संताप हे दोष घेतात. चांगुलपणाचा उपयोग वाईट काम करणाऱ्याला दया देऊन करणे हे सुद्धा एक पाप कर्म समजले जाते. म्हणजे चांगुलपणा, दया, क्षमा हे चुकीच्या लोकांना (अपात्र) देणे हे सुद्धा वैराग्याला वर्ज असते. कारण अशा पापमय लोकांना जर दया दाखवली, क्षमा केले, चांगुलपणाने मदत केली तर त्यांच्या पाप कर्माला उत्तेजन दिल्याचे महापाप त्या वैराग्याला लागत असते व त्याची अध्यात्मिक उर्जा खालावत जाते.

चांगुलपणा, सत्याची चाड, इंद्रीय संयमन, मर्यादा, भोगांबद्दल औदासिन्य, दुसऱ्यांच्या सुखात सहभागी होणे, नम्रपणा, प्रेमळपणा, धीरोदात्तता, चांगल्या साठी त्याग करण्याची इच्छा असणे, सत्पात्र दान करण्याची प्रवृत्ती, योग्य ठिकाणी सहनशिलता, वेदांचे ज्ञान ही खऱ्या ब्राह्मणाची लक्षणं समजली जातात. ज्यांने हे चांगले गुण आत्मसात केले व त्याचे जीवन त्यानुसार झाले आहे त्याच्यावर लोकपाल देवता प्रसंन्न होतात व त्याच्या योगक्षेमाच्या सगळया गरजा आपसुकपणे पूर्ण होतात".

धृतराष्ट्र विचारतात, "सामान्य माणसाचा योगक्षेम व राजाचा योगक्षेम सारखेच असतात का त्यात कांहीं भेद आहे"?

सनत सुजाता सांगतात, राजाचा योगक्षेम त्याच्या राज्यातील लोकांच्या, प्राणिमात्रांच्या योगक्षेमाने व्यापलेला असतो. गृहस्थाचा योगक्षोम त्याच्या कुटूंबाच्या सर्व सदस्यांच्या योगक्षेमांने व्यापलेला असतो. एकाद्या उद्योगपतीचा योगक्षेम त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या सगळयांच्या योगक्षेमा एवढा व्यापक असतो. अशारितीने योगक्षेमाची व्याप्ती परिस्थितीनुसार कमी जास्त ठरत असते. संन्यासाचा योगक्षेम फक्त त्याच्या शरीरापुरता असतो.

सात्त्विक माणसाच्या येथे दिलेल्या सगळया गुणांत सत्याची चाड सर्वात जास्त महत्वाची असते. त्यांनतर संयम येतो. संयमात येणाऱ्या गुणांची यादी अशी आहे, दैवी आदेशांचे पालन करणे, खोटेपणा न करणे, राग आवरणे, दुःख, तहान, द्वेष ह्यांपासून दूर रहाणे, दुसऱ्याच्या दुःखात सहानुभूती बाळगणे, आपली कर्तव्ये न विसरणे, दुसऱ्याला त्रास न देणे, दुरभिमान न करणे, खोटा रुबाब न करणे हे संयम त्यांने पाळावयाचे असतात. असें समजले जाते कीं, हे येथे नमुद केलेले

मद दोषाचे भाग समजले जातात. कांहीं त्याग करावयाचे असतात वैराग्याने, त्यात येणारे प्रशंसनीय त्याग असें आहेत, समृद्धीच्या काळी सुद्धा फार आनंदी न होणे. यज्ञ, प्रार्थना आणि पुण्य कर्मात न रमणे, तिसरा आहे सर्व प्रकारच्या वास्तविक इच्छांचा त्याग करणे. हे साध्य करण्यासाठी अरे राजा, वैराग्याला औदासिन्य आचरता आले पाहिजे. सुखात असून सुखात न रमणे व दुःखात असून दुःख न जाणवणे अशा अवस्थेत तो राहतो. म्हणजे सगळे कांहीं असून नसल्यासारखे त्याचे रहाणे असते. अशा वैराग्याला आलेले यश आणि अपयश सारखेच वाटते. तरी, त्यांचे मुल्यमापन तो चिकीत्सापूर्वकपणे करत असतो. एकाद्या परक्या निरीक्षकां सारखे. अहंकार संपुष्टात आल्यामुळें हे माझे यश अथवा हे माझे अपयश अशी भावना त्यात रहात नाही कारण तो ओळखून असतो कीं, त्यांचे असें वस्तुतः ह्या सृष्टीत कांहींच नाही. तो स्वतः सुद्धा त्याचा नसतो हे समजलेला वैरागी धन्य होतो. त्याला कोणी नातेवाईक रहात नाहीत, न बायको, न मुलं, न मित्र तसेंच न शत्रू.

सत्पात्र दान व भेटी देणे नेहमीच पुण्यकारक समजले जाते. दुसऱ्याच्या गोष्टींना हात न लावणे, कार्य कारण भाव समजून वागणे, त्याचा अर्थ आपण जे करणार, बोलणार त्याचे कोणते शक्य परिणाम होणार आहेत त्याचे भान असणे व त्याची जबाबदारी घेणे हे त्यात येते. ब्रह्मचर्य पालन हे त्यात येते. कोणाकडून दान अथवा भेटी न घेणे हे त्यात येते. त्याची सविस्तर माहिती वेदात दिली आहेच. जो इतक्या सावधगिरीने जगतो तो अध्यात्मिक उर्जेत प्रबळ होतो.

आता सांगतो, स्वताला ओळखणे म्हणजे काय, स्वताची जाण असण्याचे आठ फायदे आहेत आणि त्याची जाण नसल्याचे आठ तोटे आहेत. ज्याचे त्यांच्या ज्ञानेंद्रीयांवर नियंत्रण आहे व त्याशिवाय ज्याचे मन त्याच्या ताब्यात आहे, भूतकाळ आणि भविष्याचा विचार करत नाही तो खऱ्या अर्थाने मुक्त असतो. अरे राजा तुझा आत्मा सत्याला धरून राहील असें पहा. सगळे जग त्या एका सत्यावर विसंबून असते. संयम, वासनांबद्दल औदासिन्य आणि स्वताची जाण ह्या गोष्टी सत्याच्या अनुचरणासाठी आवश्यक असतात. हे नसणे हा दोष समजला जातो वैराग्यासाठी. कारण त्याशिवाय जो स्वताला वैरागी सांगतो तो खोटा असतो. ज्याने हे साध्य केले त्याच्या अघ्यात्मिक उर्जेत प्रचंड वाढ होते व ती त्याची खरी संमृद्धी समजली जाते. तू मला विचारलेल्या प्रश्नाची उत्तरं मी दिली आहेत, ज्या माहीतीनुसार जो त्याचे जीवन रचतो तो दुःख व जन्म मरणाच्या बंधनातून मुक्त होतो.

धृतराष्ट्र पुढे विचारतात, आख्यानं ज्यांना पांचवा वेद असें मानतात त्यात म्हणतात कीं, सगळी चराचर सृष्टी स्वयंभूच्या पासून उत्पन्न झाली आहे. दुसरे कांही सांगतात कीं चार देवांनी

हि सृष्टी तयार केली व आणखीन कांहीं म्हणतात, फक्त दोन व कांहीं म्हणतात फक्त एकच ह्या चराचर सृष्टीचे कारण आहे. ह्यात मी कशावर विश्वास ठेवू कीं खरे ब्राह्म कोणते आहे.

सनत सुजाता सांगतात, एकच ब्रह्म आहे जे सत्य आहे. केवळ अज्ञानामुळें बाकीच्या गोष्टींची चर्चा होत असते. तत्वतः एकच जरी असले तरी त्याला अनेक गुण आहेत, त्या प्रत्येक गुणांची विशिष्ट अशी ओळख असते त्यानुसार त्यांचा उल्लेख वेगवेगळा केला जातो तरी ते एकच असते. माणसाला अनेक नांवे असतात तरी तो एकच असतो. उदाहरणार्थ, एक माणूस कोणाचा पिता असतो, तर कोणाचा मुलगासुद्धा असतो, त्याशिवाय तो बंधू, मित्र, वैरी, तटस्थ अशी अनेक रुप घेत असतो त्याच्या आयुष्यात ते सगळे त्याचे अवतार मानले जातात. तो त्यापैकी एका अवतारात असतांना कांहीं विशिष्ट प्रकारे वागतो तर दुसऱ्या अवतारात आणखीन वेगळा वागत असतो त्याप्रमाणें ब्रह्माचे सुद्धा अनेक अवतार व त्यांची विविध नांव असतात व ते त्या अवतारानुसार वागत असतात तो त्या देवतेचा स्वभाव म्हणून समजले जाते. तसे हे आहे. ज्याला ज्या गुणाची तारीफ तो त्या गुणाची भक्ती करतो अथवा त्या गुणाचा यज्ञ करतो ज्यामुळें त्याला त्या गुणाचा उपयोग होईल. ज्या गुणांने त्याचा फायदा झाला तो त्या गुणालाच मानतो व इतर गुणांकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळें अनेक देव असल्यासारखे वाटते. धृतराष्ट्र विचारतात, "अहो मुनी, कांहीं देवता पुरूष व कांहीं स्त्री रुपात असें कां असतात"?

सनत सुजाता सांगतात, अरे क्षत्रिया, मघा जसे आपण पाहिले कं, अनेक अवतार एकाच ब्रह्माचे असतात तसेंच पुरूष आणि स्त्री रुप त्या देवतांची असतात कारण त्या देवतेत ह्या दोन प्रवृत्ती असतात. म्हणजे पुरूषी स्वभाव व बाईचा स्वभाव असें दोनही असतात. वैरागी त्यातील ज्या स्वभावाची साधना करील त्याला त्या रुपात ती देवता प्रसन्न होत असते व त्याची मदत करत असते. पुरुषी स्वभाव थोडा बेपर्वा, उद्धट, घमेंडखोर, कमी दयाळू, अस्वस्थ, शंकाखोर, आगाऊ आणि आळशी असा असतो त्या प्रमाणे, देवतेचे नरस्वरुप काम करते. म्हणून देवतेच्या त्या रुपाची साधना करणे कष्टसाध्य असते परंतु, खरा बैरागी ते करतो. परंतु, प्रपंचात असलेला गृहस्थ बाईच्या स्वभावाची पुजा करणे पसंत करतो कारण तो स्वभाव, देवतेचे स्त्री स्वरुप स्त्रीचा स्वभाव व्यक्त करते. तो आहे, काळजीपूर्वक, नीटनेटके, ममतापूर्वक, नम्र, प्रेमळ, शांत, सावध, मेहनतू. अशा भिन्न वागणूकीमुळे देवतेचे स्त्री स्वरुप साधारण भक्तासाठी जास्त भावत असते. अरे राजा, सामान्य माणसास देवतेचे स्त्रीरुप जास्त सोयिस्कर असते. (त्या जोड्या अशा, विष्णू-लक्ष्मी, गणपती-सरस्वती, शंकर-पार्वती)

ते लोक मोक्ष प्राप्त करू शकत नाहीत कारण ते त्यांच्या इच्छापूर्तीपाठी लागलेले असतात. त्यांना त्या इच्छा पूर्ण होणे मोक्षा पेक्षा जास्त महत्वाचे असते त्या प्रमाणें ते होत असते. त्या साधनांचा मोक्षाशी कांहीं संबंध नसतो. कर्मकांड, योग साधना, ध्यान साधना अशा सगळया प्रकारच्या साधनांमुळें त्यांना ते रुप व त्यापासून चे फायदे मिळतात परंतु, मोक्ष मिळत नाही कारण त्यांना मोक्ष नकोच असतो. जे ब्रह्मज्ञानासाठी त्याच सगळया साधना करतात त्याना ब्रह्मज्ञान मिळते. परंतु, जर त्यात यश नाही मिळाले तर तो मौन व्रत सांभाळतो ज्याला दिक्षाव्रत म्हणतात. दिक्षा शब्द आला आहे ज्याचा अर्थ आहे, वचनबद्ध रहाणे. ज्याला जे अपेक्षित आहे त्याला ते ते मिळते प्रयत्न प्रामाणिक मात्र असला पाहिजे. ज्याला ब्रह्मज्ञानाचा अनुभव नाही असें जे फक्त त्याबद्दल वाचन केले आहे त्यांना ज्ञानी समजले जात नाही. त्यांना शिकलेले असें समजले जाते. शिकलेले व अनुभवी ह्यांत फार मोठा फरक असतो. म्हणून क्षत्रियांनी केवळ शिकलेला आहे म्हणून त्याला ब्राह्मण समजणे चुकीचे असते. फार प्राचीन काळी अथर्वने महान ऋषींच्या सभांत जे गायले त्यांना छंद असें म्हणतात. केवळ छंद शिकला म्हणून तो ज्ञानी होत नाही. ते सगळे वरवरचे आहे. त्याला अनुभवाच्या क्षेत्रात कांहीं स्थान नसते. अशांना वेद समजले असें समजणे सुद्धा गैर होईल. केवळ मनाने साधना केली म्हणून त्याला ज्ञान प्राप्त होत नाही. खरे ज्ञान प्राप्त होण्यासाठी त्या माणसाला स्वयंभूची मान्यता असावी लागते. ती मान्यता मोठ्या तपस्येने आणि उच्च कोटीची अध्यात्मिक उर्जा प्राप्त केल्यानंतरच प्राप्त होत असते. तशी मान्यता मिळण्यासाठी इतर उच्च कोटीच्या ऋषींचीसुद्धा मान्यता असावी लागते. अशा अनेक चाचण्या नंतर ते ज्ञानाचे दरवाजे उघडतात. म्हणून ब्रह्मज्ञान सहजासहजी प्राप्त होणारी गोष्ट नसते. अरे राजा, केवळ ध्यान साधनेने माणसाला सिद्धी मात्र प्राप्त होऊ शकतात, ज्या त्या त्या देवतांच्या प्रसन्न होण्यामुळें मिळत असतात. परंतु, ज्ञान मिळणे व सिद्धी मिळणे ह्यात महदंतर असते. ज्याला ज्ञान प्राप्त झाले त्याला सगळया सिद्धी देवता प्रसंन्न होतात व म्हणून त्याला जर पाहिजे असेल तर ती सिद्धी सहजपणे प्राप्त होत असते. परंतु, अरे क्षत्रिया, तसा ज्ञानी सहसा त्या सिद्धी वापरत नाही. कारण निसर्ग स्वाभाविकपणे त्याला अनुकूल होत असतो. तशा परिस्थितीत त्याला सिद्धींची आवश्यकता नसते. ज्याला समजले आहे कीं, आत्मा आणि जीव (शरीराची कार्यकारी उर्जा) हे वेगळे आहेत तो योगक्षेमाचे वेगळे महत्व समजतो व काय जीवाची गरज अथवा शरीराची गरज आणि काय आत्म्याची हे समजून, त्याप्रमाणे त्याच्या इच्छांचे व्यवस्थापन तो चांगल्या प्रकारे करू शकतो. जीव शरीराबरोबर येतो व शरीराबरोबर नष्ट होत असतो. परंतु, त्याच्या योगक्षोमाच्या कामांत जे झाले त्याची नोंद मात्र आत्म्याच्या बरोबर असलेल्या लिंगदेहात केली जात असते व ते सगळे आत्म्याला भोगावे मात्र लागत असते म्हणून आत्म्याला जीवाच्या कारभारावरसुद्धा ध्यान द्यावयाचे असते. केवळ वनात राहील्यामुळें अथवा केवळ ध्यान केल्यामुळें त्याला

त्याच्यातील आत्म्याचे दर्शन होत नाही. जरी तो त्याच्याशी संपर्क करू शकत असला. तो खरा मुनी ज्यांने आत्म्याचा अनुभव घेतला आहे. तो आत्म्याचा अनुभव त्याला शरीराच्या म्हणजे जीवाच्या माध्यमातूनच घ्यावा लागत असतो. म्हणून त्याचे जीवाचे व्यवस्थापन चांगले असावे लागते. जीवाचा छळ करून आत्मज्ञान कधीही प्राप्त होत नाही. जीव आणि आत्मा ह्यांच्यातील संधान अचूक असेल तर तो योगी धन्य समजावा. ज्याला ते झाले त्याला ह्या विश्र्वाचे व्याकरण (कार्य कारण भाव) समजले असें म्हणता येईल.

त्याला दिव्यदृष्टी प्राप्त झालेली असते. अशा व्यक्तीला खरा ब्राह्मण समजता येईल. क्षत्रियसुद्धा तपस्या करून त्या पदाला जाऊ शकतो. तो क्रमा कर्माने त्याची अध्यात्मिक उर्जा वाढवत गेला तर तो अखेरीस ब्रह्मपदाला पोहोचतो. हे जे मी सांगितले ते तू चांगले समजून घे.

सनत सुजाता पर्व भाग त्रेचाळीसावा संपला.

# सनत सुजाता पर्व

## भाग चव्वेचाळीसावा

धृतराष्ट्र पुढे विचारतात, फार चांगली माहीती आपण मला सांगितली आहे, त्यामुळें ब्राह्मण कसा होतो व विश्र्वाचे मर्म मला आपल्या विवेचनामुळें चांगले समजले. आता मला सांगा, ज्या प्रपंचाच्या वासना (इच्छा) असतात, त्यापेक्षा वेगळ्या गोष्टींची अधिक माहीती जी साधारणपणे माणसांना माहीत नसते ती मला समजाऊन द्या.

सनत सुजाता सांगू लागतात, ज्याची माहीती तू मला सांगावयाला सांगत आहेस ती लक्षात येणे सोपे नाही. जेव्हां सगळी इंद्रिये नियंत्रित आहेत, आणि मन विकारशुन्य झाले आहे, ती अवस्था केवळ ब्रह्मचर्य पालनानेच प्राप्त होत असते.

धृतराष्ट्र पुनः विचारतो, "आपण सांगता कीं, ब्रह्माचे ज्ञान मनाने आकलन होते, त्यासाठी वासना विरहीत असें ब्रह्मचर्य आचरणात असणे जरूरीचे असते. त्या ब्रह्मचर्याच्या प्रेरणा सुद्धा मनातच असल्या पाहिजेत. ते ज्ञान मिळाल्यानंतर अमरत्व कसे प्राप्त होते"?

सनत सुजाता सांगतात, ब्रह्माचे ज्ञान अंतर्यामी माणसाला असले तरी ते उघड होत नाही. परंतु, बुद्धीच्या मदतीने त्या ज्ञानाचे आकलन होऊ लागते. अशारितीने ते गुढ उकलल्यावर तो ज्ञानी सगळे सोडून देतो. तुला सगळ्या ज्ञानींमध्ये ते आढळून येईल. आता मी तुला ज्ञान म्हणजे काय प्राप्त होते ते सांगतो.

धृतराष्ट्र विचारतात, "ब्रह्माची लक्षण कोणती"? कोणत्या मार्गाने ब्रह्म समजणे जास्त सोपे आहे ते सांगा, अहो ऋषीवर्य.

सनत सुजाता सांगतात, जे त्यांच्या गुरूच्या घरात राहून ज्ञानार्जन करत आहेत व अर्घ्य देत आहेत ते सहजपणे ज्ञान शिकू शकतात. व्रतस्थ जीवन जगणे, त्यानंतर मृत्यू आला कीं तो ब्रह्मात विलीन होतो. ज्याना ब्रह्मपदी जाण्याची इच्छा आहे ते वैराग्य आचरतील व त्याचे नियम पाळतील. जोवर वासना उत्तेजित आहेत तोवर ते शक्य नसते. वैराग्य पालनाने शरीराची म्हणजे जीवाची सुद्धा वासना कमजोर होत जाते व ते शरीर वासनाहीन जीवन जगू लागते. ते जर शक्य झाले तर आत्म्याचे ब्रह्मात एकरुप होणे सोपे होते. परंतु, ते बळजबरीने साध्य करावयाचे नसते. सामान्यपणे शरीराची निर्मिती माता आणि पित्याच्या एकत्र येण्यामुळें होत असते. परंतु, ज्ञानी माणसाचा जो पुनर्जन्म होतो त्याच देहात त्याला कारणीभूत असतो त्याचा सद्गुरू. सद्गुरूच्या कृपेने शिष्याच्या मेंदूतील कवाडं उघडली जातात व त्याला त्याच्यातील परमात्म्याचा अनुभव

येतो. त्यासाठी अरे राजा, माणसाचा जन्म मिळणे अगत्याचे असते. दुसऱ्या कोणत्याही योनीत ते शक्य नसते म्हणून माणसाच्या जन्माला विशेष महत्व असते. त्यासाठी शिष्य त्याच्या सद्गुरूला नेहमी विनम्रपणे नमस्कार करील. कारण तो सद्गुरू त्याचा मायबाप झालेला असतो. सद्गुरूची सेवा करण्यात त्याला कमीपणा वाटला नाही पाहिजे. त्यातूनच ब्रह्मचर्य पालनाचे धडे सुरू होतात. सद्गुरूच्या आज्ञांचे पालन त्याला करावयाचे असते. सद्गुरूच्या निजी परिवाराचीसुद्धा त्याला सेवा करावयाची असते. सद्गुरूच्या उपकाराची आठवण त्यांने ठेवली पाहिजे. (येथे शिक्षक आणि सद्गुरू ह्यातील फरक लक्षात घेतला पाहिजे. माहिती शिक्षक शिकवतो परंतु, सद्गुरू माहितीचे ज्ञानात रुपांतर करून अनुभव देतो.) ज्ञान पूर्ण झाल्यावर शिष्य सद्गुरूला दक्षिणा देतो ज्यात गुरू मागील ते द्यावा लागते, त्यातसुद्धा शिष्याची परीक्षा होत असते. त्या शिक्षणात चार पायऱ्याने शिकवले जाते, पहिल्या पायरीत त्याला ब्रह्मचर्य पालन करावे लागते, दुसऱ्या पायरीला गुरू शिष्याची त्या ज्ञानासाठी निवड करतो त्यासाठी त्याच्या अनेक अवघड चाचण्या होत असतात. तिसऱ्या पायरीला शिष्य आपली योग्यता सिद्ध करतो, त्यासाठी आणखीन कांहीं प्रकारच्या चाचण्यातून त्याला जावे लागते, त्यातून गेल्यावर चौथी पायरी असते व त्यात गुरू शिष्य संवाद होत असतो ज्याला उपनिषद असें म्हणतात. त्यानंतर सद्गुरू शिष्याचे मेंदूतील गुप्त कवाडं त्याच्या सिद्धीने उघडतो व शिष्याचे ज्ञान पूर्ण होते. जर त्यापैकी एकात शिष्य नापास झाला तरी तो गुरूला सोडून जातो. ब्रह्मचर्याची चाचणी करतांना गुरू त्याच्यात बारा गुण आहेत कां ते पहातो. जर ते असतील तर त्याचे ब्रह्मचर्य खरे असें शाबीत होते. त्यानंतर योग अभ्यास केला जातो त्याला अंग असें म्हणतात. त्यानंतर ध्यान साधना येते, त्याला वलम म्हणतात. त्यानंतर अखेरची परीक्षा होत असते. त्याकाळात जी धन दौलत शिष्याने कमावलेली असते ती सगळी त्याला गुरूला द्यावा लागते. त्यानंतर शिष्य गुरूच्या मुलासारखा समजला जातो. अशारितीने तयार झालेले शिष्य जगात जाऊन मोठी प्रसिद्धी कमावतात. अशारितीने तयार झालेल्या शिष्यावर राजे संपत्ती उधळतात व तो शिष्य त्याच्या जीवनात यशस्वी होतो. त्यानंतर त्याच्याकडे दुसरे शिष्य बनण्यासाठी जातात व त्याचे गुरूकूल सुरू होते. अशी परंपरा आजवर चालू आहे. खऱ्या ब्रह्मचर्य पालनाने कित्येक स्वर्गापर्यंत जातात. त्यापुढे ब्रह्माच्या लोकात जातात. त्यांच्यातून गंधर्व कांहीं होतात तर कांही ज्या बायका असतात त्या अप्सरा होतात. त्यांच्या सगळया कामना पूर्ण होतात. त्यांना कांहीं कमी रहात नाही. तरी तो मुळतः वैरागीच असतो हे राजा, लक्षात असू दे. जो ते वैराग्य चालू ठेवतो व मिळणाऱ्या सुखात रमत नाही तो त्यापुढे जातो. त्याला मृत्यूवर विजय प्राप्त होतो. अरे राजा, जी माणसें त्यापेक्षा इतर मार्गाने जातात त्यांना कितीही शुद्ध जीवन जगले तरी नश्वर जगातच ते रहातात आणि प्रत्येक वेळी मृत्यू त्यांना त्रास देत रहातो. सद्गुरूकडून ज्यांने अनुभव सिद्ध ज्ञान संपादन केले ते नित्य असल्यामुळें

त्याचा कधी ऱ्हास होत नाही. म्हणून त्यापेक्षा वेगळा दुसरा कोणताही उत्तम मार्ग नाही मोज्ञाकडे जाण्यासाठी.

धृतराष्ट्र बोलतात, "आपण सांगता कीं, ब्रह्माचा प्रत्यक्ष अनुभव शहाणी माणसं स्वताच्या देहात असतांना घेतात, मग मला सांगा ब्रह्माचा रंग कोणता असतो? शुभ्र, लाल, पिंगट कां निळा ते सांगा. मला सांगा स्वयंभूचे स्वरुप कसे असते, त्याला रंग असतो कां, त्याचा आकार कसा असतो"?

सनत सुजाता सांगतात, जर मला विचारशिल कीं त्याचा रंग कोणता तर मी सांगेन कीं तो शुभ्र असतो. परंतु, तो पहाणाऱ्याच्या पहाण्यावर सुद्धा अवलंबून असतो. कारण त्याला त्याचा असा कांहीं रंग नसतो आपण जो समजू तो रंग त्यात आपल्याला दिसू लागतो. खरे सांगावयाचे तर स्वयंभूला कांहीं आकार, रंग नसतो कारण ते पाहिले तर अदृष्य सुद्धा असते. त्याला लिंग नसते म्हणून त्याला ते म्हणावयाचे कां ती कां तो तेसुद्धा सांगता येणार नाही. त्याचे वर्णन करता येत नाही. तो ऋक् मध्ये नसतो, किंवा यजूत नसतो अथवा साममध्ये सुद्धा सापडावयाचा नाही. त्याचे दर्शन कोणत्याही यज्ञाने प्राप्त होत नाही, मग तो रथंतर असो अथवा वर्हद्रथ असो. सामान्य बुद्धीने त्याला समजता येणारे ते नाही. किंवा त्याचे वर्णन शब्दाने करता येणार नाही. ते फक्त अनुभवाने समजू शकते. म्हणून ते शिकवतासुद्धा येत नाही. जेव्हां यथाक्रम हे विश्र्व लय पावते तेव्हां तो स्वयंभू सुद्धा त्यात विरघळून जात असतो म्हणजे कांहींच उरत नसते. त्याची कल्पना करण्यासाठी त्याच्यासारखे दुसरे कांही असले पाहिजे पण तसे दुसरे कांहीं नसल्याने त्याची तुलनासुद्धा करता येत नाही. ते नित्य असतांना त्याचवेळी अनित्य सुद्धा असते, अशाची तुलना कशाची करता येणार नाही, हे तू समजून घे. स्वतः त्याचा अनुभव घेणे हेंच केवळ त्यासाठी साधन असते. ते सुक्ष्म असतांना त्याचवेळी सर्वव्यापीसुद्धा असते.

धृतराष्ट्र विचारतो, आपण ब्रह्मचर्या बद्दल सारखे सांगत असता तर त्याबद्दल कांहीं सागावे.

सनत सुजाता सांगतात, ब्रह्मचर्य पालनाचा संबंध प्रामुख्याने लैंगिक वासनांच्या संदर्भात असतो कारण अरे क्षत्रिया, माणसाच्या अध्यात्मिक उर्जेचा सर्वात जास्त ऱ्हास ह्या लैंगिक वासनांमुळं होत असतो. जर माणूस त्याच्या लैंगिक वासनांवर नियंत्रण ठेवेल तर त्याची अध्यात्मिक उर्जा कमी होणार नाही. ब्रह्मचर्य पालन प्रामुख्याने पुरूषांसाठी सांगितले आहे. त्यासाठी वयात आलेल्या सगळया सामान्य प्रकृतीच्या पुरूषास स्त्री बद्दल आकर्षण वाटू लागते. ते प्रजोत्पादनाच्या नैसर्गिक गरजेनुसार योग्य जरी असले तरी प्रायः ते आकर्षण जरूरीपेक्षा

जास्तच असते. त्याचे नियंत्रण करण्याच्या योगाला ब्रह्मचर्य योग असें समजले जाते. लैंगिक वासना स्त्रीबद्दल असल्याने तिच्या बद्दल विविध प्रकारचे विचार पुरूषाच्या मनात उत्पन्न होत असतात. त्यात दोन प्रकारचे विचार प्रामुख्यानी लक्षात घेतले पाहिजेत. जर स्त्रीबद्दल आदर भाव असेल तर तिच्याबद्दल वासना कमी उत्पन्न होत असते. परंतु, जर तसे नसेल तर त्या स्त्रीचा भोग घेण्याची पाशवी वासना सहजपणें त्याच्या मनात उत्पन्न होत असते. माणसाच्या जीवनात चार प्रकारची स्त्री विषयक नाती असतात. ती अशी, पिता-पुत्री, बंधू-भगिनी, स्त्री-पुरूष, माता-पुत्र. त्यातील सामान्य पुरूषाच्या मनात फक्त स्त्री-पुरूष ह्या नात्यामध्येच लैंगिकता अभिप्रेत असते आणि इतर नात्यात सात्त्विक भाव असतो म्हणजे त्या नात्यात लैंगिक भाव नसतो. त्यात बंधू-भगिनी हे नाते विशेष पवित्र मानले जाते. हे स्वाभाविक असते म्हणून त्या स्वाभाविक प्रवृत्तीचा उपयोग ब्रह्मचर्य पालनासाठी केला जातो. म्हणजे ब्रह्मचारी सगळ्या स्त्रीयांना भगिनी समजू शकतो व त्यामुळें त्या बायकांच्या बाबत त्याच्या मनात लैंगिक वासना उत्पन्न होण्यास विरोध होतो व तो ब्रह्मचर्य सहजपणे आचरू शकतो. त्यातसुद्धा आणखीन एक मनोधारणा अपेक्षित असते ती बायकांच्या बद्दल आदरभाव ठेवणे. जो ब्रह्मचारी सगळ्या स्त्रीयांबद्दल आत्यंतिक आदराची भावना, म्हणजे सात्त्विक भाव, बाळगतो त्याला ब्रह्मचर्य पाळणे जास्त सोपे होते अशा ब्रह्मचर्याला शुक्ल ब्रह्मचर्य समजले जाते. शुक्ल ब्रह्मचारी उच्च कोटीचा ब्राह्मण होतो व मोक्षपदी जातो. दुसरी भावना कांहीं पुरूषांत आढळते ती तामसी प्रवृत्तीचे निदर्शक असते त्याप्रमाणे तो ब्रह्मचारी सगळ्या बायकांना तूच्छ, घाण समजतो व कोणी तूच्छ गलिच्छ गोष्टीत रमू शकत नाही व त्या न्यायाने तो ब्रह्मचर्य पालन करतो ते तामसी प्रवृत्तीचे असते त्या ब्रह्मचर्याला कृष्ण ब्रह्मचर्य समजले जाते. तसा ब्रह्मचारी जरी कितीही शुद्ध ब्रह्मचर्य पालन करत असला तरी त्याला त्याच्या तामसी प्रवृत्तीमुळें अध्यात्मिक विकास करता येत नाही. साधकात स्त्री सुद्धा असू शकते, त्यांना फक्त स्त्री-पुरूष पर्याय वगळता इतर प्रकारची नाती परपुरूषांबद्दल धरून त्यांचे ब्रह्मचर्य पालन करता येते. स्त्रीला तिच्या शरीराचा विशेष अभिमान असल्याने ती ब्रह्मचर्य पालन पुरूषांपेक्षा जास्त चांगल्या प्रकारे करू शकते.

सनत सुजाता पर्व भाग चव्वेचाळीसावा संपला.

# सनत सुजाता पर्व

## भाग पंचेचाळीसावा

सनत सुजाता पुढे सांगतात, दुःख, क्रोध, लोभ, वासना, अज्ञान, आळस, द्वेष, स्वार्थ, मोह, मत्सर, गर्व, अर्वाच्य वाचा हे बारा दोष माणसाच्या ऱ्हासास कारणीभूत असतात. ते सगळे त्यांची संधी पहात असतात कीं कधी ते त्या माणसाचा विनाश करतात. ह्यांच्या आहारी गेलेला माणूस त्यांच्या प्रभावाखाली पापाचरण करू लागतो, ते सगळे त्याच्या बेशिस्त अहंकाराचे वाईट आविष्कार असतात.

जे वासनिक समाधान म्हणजे सर्व कांहीं असे मानतात, ते घमेंडीत रहातात, आपल्या यशाचा गर्व करतात, आपण केलेले दान सर्वांना सांगतात, जे मनाने कमजोर आहेत, जे स्वताच्या कौतुकात रमतात, जो स्वताच्या पत्नीचा द्वेष करतो, हे सात दोष माणसाला पापी करतात.

पुण्याचा मार्ग आचरणारे चांगुलपणा, वैराग्य, संयम, समाधान, नम्रता, त्यागीवृत्ती, सगळयांशी सलोखा करणारे, धीरोदात्त, दान करणारे, वेदाचा आभ्यास करणारे, क्षमाशिल, सत्यवादी असें बारा गुण दाखवतात. ते सगळया जगावर राज्य करू शकतात. त्यांच्याशी सगळया लोकपाल देवता संतुष्ट असतात. तो सगळे कार्य विधात्याच्या नांवाने करतो. त्याला ब्राह्मण म्हणतात. संयम, त्यागीवृत्ती आणि वेदाचा अभ्यास हे जास्त महत्वाचे आहेत. ते माणसाला मोक्षापर्यंत नेऊ शकतात. चांगले असो अथवा वाईट असो ते इतरांबद्दल कधी खराब बोलत नाही. जे तसे वागत नाहीत त्यांच्यासाठी नरकात जागा तयार असते.

मद म्हणजे गर्व करण्याची प्रवृत्ती त्याचे अठरा उपदोष आहेत. त्यांबद्दल मी आता तुला कांहीं सांगणार आहे, ते असें, दुसऱ्याचे वाईट चिंतणे, गुणीलोकांच्या कामात अडथळे करणे, दुसऱ्याच्या चांगल्या कामात वैगुण्य पहाणे, खोटे सांगणे, क्रोध, हट्टीपणा, दुसऱ्यांना कामाला लावणे, इतरांची टीका करणे, आपल्या संपत्तीचा देखावा करणे, अधिकारावरून भांडणे, उद्धटपणा, प्राणिमात्रांबद्दल तुच्छतेची वर्तणूक, द्वेष, इतरांबद्दल अज्ञान, सन्माननीयांचा अपमान करणे, अक्कलशून्यपणा (योग्य अयोग्य ह्याचे न समजणे), दुसऱ्यांना त्रास देण्याची इच्छा, घमेडखोरी.

म्हणून शहाणा माणूस कधी मद दोषात अडकणार नाही. कारण त्या दोषांबरोबर इतर दोष त्याच्यात उत्पन्न होत असतात. त्याला सच्चे मित्र लाभत नाहीत. त्याच्या प्रगतीने कोणाला संतोष होत नाही. मद आणि मत्सर हे दोष उत्पन्न होण्याते कारण माणूस त्याची तुलना इतरांशी करतो. जर त्या तुलनेत तो वरचढ ठरला तर मद भाव वाढतो आणि कमी ठरला तर मत्सर भाव

वाढत असतो अशासाठी वैरागी कधीही स्वताची कोणाशी तुलना करत नाही. खरा साधक तुलना स्वताच्या आधीच्या परिस्थितीची आजच्या परिस्थितीशी करतो व त्यातून त्याला समजते कीं, त्याने अध्यात्मिक दृष्ट्या प्रगती केली आहे कीं नाही.

खऱ्या मैत्रीची लक्षणं अशी आहेत, मित्राच्या नुकसानीने त्याला दुःख होते, मित्राच्या उत्कर्षात त्याला आनंद होतो, त्याच्याकडे कांहीं मागितले तर तो ते आनंदाने देतो, खरा मित्र त्याची सगळी संपत्ती मित्रासाठी देण्यास तयार असतो. शहाणा माणूस कधी आपल्या मित्राच्या घरात रहात नाही. खरा मित्र त्याच्या मित्राला त्रास देत नाही कांहीं मागून वगैरे. तशारितीने रहाणारा श्रीमंत त्याचे सगळें ध्यान वैराग्याकडे ठेवतो. जे आहे ते त्याचे नाही ही त्याची धारणा असते व त्यामुळें त्या गोष्टी त्याला बाधत नाहीत. अशी धारणा खऱ्या वैराग्याचे लक्षण असते. तशा धारणेची जशी वाढ होत जाते त्याला एक वेगळा आनंद अनुभवायला येऊ लागतो. जरी ज्ञान प्राप्त झाले नाही तरी तो आनंद त्याला समाधान देत असतो. जसे तो आनंद त्याला मिळू लागतो तो आणखीन त्याग करू लागतो कारण ते त्याचे नाहीच अशी त्याची पक्की धारणा झालेली असते. असा माणूस ब्रह्माच्या जवळ जात असतो. असा परिस्थितीत योगी त्याच्या मनाने यज्ञ करू लागतो. जो जप करू लागतो, नाहीतर कर्मयोगात रमतो. खरे ब्रह्म त्याच्यातच आहे ज्याला कांहीं लक्षणं नसतात. म्हणून त्याचे वर्णन करता येत नाही.

[श्रीमद्भगवत गीते मध्ये सोळाव्या भागात दैवी आणि असुरी संपदा सांगितल्या आहेत त्या मध्यें ह्यावर विशेष माहीती आहे ती पहावी]

आता दुसरे कांही मी तुला सांगणार आहे. आता मी जे सांगणार आहे ते उच्च दर्जाचे तत्त्वज्ञान फक्त शिष्यानाच सांगितले जाते. दुसरे सगळे केवळ शब्दाचा पसारा असतो. ह्या विश्र्वाचे सत्य ह्या तत्त्वज्ञानात सांगितले आहे. ज्यांने ते समजले त्याना मृत्यूची भिती नसते. अरे राजा केवळ साधना करून कोणीही ब्रह्मापर्यंत पोहोचू शकत नाही. ज्याला ते ज्ञान नाही त्यांने कितीही यज्ञ केले तरी त्याला ते मिळत नाही. अमरत्व मिळण्यासाठी अथवा अंती परमानंद मिळवण्यासाठी त्याला त्याच्या सगळ्या भोगेंद्रीय व ज्ञानेंद्रीयांना बंद करूनच तो ब्रह्मपद मिळवू शकतो. असा साधक त्याच्या सगळ्या भावनासुद्धा बंद करतो. त्याला प्रेम, द्वेष, सुख, दुःख असें कांहींही बाधत नाही. तो क्रमशः जसे वेदात सांगितले आहे, तो त्याची प्रगती करत असतो. सनत सुजाता पुढे बोलतात धृतराष्ट्राला, तुझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मी आतापर्यंत दिली आहेत.

सनत सुजाता पर्व भाग पंचेचाळीसावा संपला.

## सनत सुजाता पर्व

## भाग सेहेचाळीसावा

सनत सुजाता पुढे सांगतात, ह्या विश्र्वाचे मूळ बीज ज्याला महायत्त म्हणतात, ते शुद्ध बीज आहे, केवळ अध्यात्मिक उर्जा असें त्याचे स्वरुप आहे. त्याचे तेज विलक्षण आहे. त्याच्यात सगळे ज्ञान एकवटलेले आहे, त्याचे तेज सूर्याच्या तेजाचे मुळ आहे. योगी लोकांना त्याचे दर्शन होत असते. त्यांच्या मनःचक्षूने ते त्याला पहातात. त्यामुळें हि सृष्टी उत्पन्न झाली आहे. त्याच्या प्रेरणेने सृष्टी वाढत जाते अथवा लहान होत असते. त्याला कांहीं महान अंडे अथवा ब्रह्मांड असेसुद्धा समजतात. त्यातून आपले आत्मे जे स्वयंभूचे सुक्ष्म रुप आहेत तयार होत असतात जसें मुंगीच्या राणीतून तिची पिलं जन्म घेतात. ते स्वयंप्रकाशित असतात. त्याची भिती वाटावी असे त्याचे स्वरुप असते. ते दिव्य तेज योगी त्यांच्या मनःचक्षूंनी पहात असतात. त्या अंड्यात पंचमहाभूत सुक्ष्म स्वरुपात असतात. त्यांच्यातून एक ब्रह्म तयार होते. त्यावेळी त्याला ईश्र्वर असें म्हणतात. विश्र्वाच्या अंती ते पुनः विरघळतात. त्यांची संवेदना झोपल्या प्रमाणे निद्रीस्त झालेली असते, तसे ब्रह्माचे होत नाही. ते ब्रह्म सूर्याचा सूर्य असतो. त्याच्यातून पृथ्वी व इतर तारांगण उत्पन्न होत असतात. त्यातून दिशा तयार होतात ल अवकाश सुद्धा ज्यात हा सगळा पसारा सामावला आहे. ते सगळे व आणखीन बरेच योगीलोक त्यांच्या मनःचक्षूंनी पहात असतात. अनेक जन्म झालेले आत्मे त्यांच्या कर्मविपाका बरोबर त्या अंतराळात संचार करत असतात. त्यांची चाल त्यांना त्यांच्या येणाऱ्या मृत्यूकडे नेत असते. परंतु, ते देहाचे होत असते व आत्मा कधीच मरत नसल्याने तो तसांच त्याच्या गत जन्माच्या भोग संचाला घेऊन फिरत असतात. त्या भोग संचाला लिंगदेह असें म्हणतात.

अरे राजा, ह्याचे प्रत्यक्ष वर्णन कोणी केले तरी ते तंतोतंत होऊ शकत नाही. ते स्वतः अनुभवणेच खरे ज्ञान मिळण्यासाठी जरूरीचे असते. ज्या योगींना ते दिसते त्यांचा मृत्यू होत नाही. सगळे मायावी आहे असें वाटते. त्या आत्म्यांची सतत कोठेतरी प्रवास होत असतो परंतु, ते कोठे व कां जातात ते कधी कोणालाही समजत नाही. तो ईश्र्वर त्या सगळ्यामागे प्रेरणा स्वरुप असतो. ते योग्यांना जाणवते. सगळे मनःचक्षूंपुढे होत असते. वास्तविक जगात ते दिसत नाहीत. योगी लोकांना देव दिसतात जे ही सृष्टी चालवत आहेत. त्याच वेळी त्यांना जे आत्मे जन्म घेणार ते एकत्र ठेवलेले दिसतात. त्यांचे व्यवस्थापन ईश्र्वर करत असतो. त्याच्या आज्ञेत अनेक देव त्याला त्या कामात मदत करत असलेले त्या योग्याला दिसतात. तेथे ठरते कोणी कोठे जन्म घ्यावयाचा. ब्रह्माच्या संपर्कात येणारे आत्मे विविध प्रकारचे रुप घेतात ज्या योनीत ते जन्म घेणार असतात

त्यांच्या कर्मविपाकानुसार. त्या ब्रह्मातून पांच महाभूते उत्पन्न होतात व त्यातून सृष्टी निर्माण होत असते हे तो योगी जाणतो. त्यातूनच अग्नी आणि सोम तयार झालेले त्याला समजते. त्यातून जीवंत चराचर उत्पन्न होत असतात. त्या मुळ बीजाला (ब्रह्मांडाला) वेदात तत् असें म्हंटले आहे. त्या बीजाचे वर्णन करता येत नाही ते अनुभवावेच लागते समजण्यासाठी. जीवांचा कारक अपान वायू प्राण शोषू लागतो व त्यातून श्र्वासोंश्र्वास क्रिया सुरू होते. त्यावेळी त्यात मन आणि बुद्धी तयार होते. योगी लोकांना तो चार पायाचा असलेला दिसतो. ते पाय असें, शुद्धी, स्वप्नावस्था, गाढ निद्रा आणि तुरीया अवस्था. त्यात तुरीया अवस्था इतर अवस्थांचे नियंत्रण करत असते. त्या अवस्थेत मृत्यू व मोक्ष एक सारखेच असतात. त्याचा आकार आंगठ्या एवढा असतो जेव्हां योगी त्याला त्यांच्या मनःचक्षूनी पहातात. त्यात जीवाचे सगळे गुण सामावलेले असतात. तो परमात्मा सगळयांत असतो जे जाणतात व जे जाणत नाहीत. ज्ञानी माणसाचे अग्नीहोत्र केलेले असो अगर नसो त्याने त्याच्या अवस्थेत कांहीं फरक पडत नाही. परमात्म्याचे आणखीन एक नांव आहे, शुद्ध ज्ञान. ज्यानी व्रतस्थ जीवन जगले आहे त्यांनाच तो मिळतो. त्याला असें दिसते कीं सगळे चराचर त्या परमात्म्यात विलीन होत आहेत व पुन्हा त्याच्यातून बाहेर येत आहेत. ज्या योग्याला त्याचे आधीच ज्ञान आहे त्याला तेथेच मोक्ष मिळतो. सर्व जगाचा त्याग केलेला त्यात मिळून जातो. परंतु, ज्याला अजून इच्छा आहेत त्याला ते दिसतसुद्धा नाहीत. त्या ब्रह्माची कशाची तुलना करता येत नाही. ते सत्य आणि असत्य ह्या दोघांचे असते कारण माया जी असत्य आहे तीसुद्धा त्याच्यातूनच उत्पन्न झालेली असते. ज्याला ब्रह्म समजले तो ब्रह्ममय झालेला असतो. सामान्य माणसात त्यावर चर्चा होते कारण त्यांना ब्रह्म म्हणजे काय ते समजत नाही व ते वेगवेगळया कल्पना करत रहातात त्या बद्दल. ब्रह्म ज्ञानी अमृतासारखा असतो. किंवा त्या अवस्थेत असतो जीला कैवल्य अवस्था म्हणतात. त्या अवस्थेत असलेला पुण्य व पापाच्या पलिकड गेलेला असतो कारण त्याची अध्यात्मिक उर्जा पूर्ण अवस्थेला पोहोचलेली असते. असा माणूस सतत ब्रह्मपदीच असतो. एकदा अध्यात्मिक उर्जा पूर्ण अवस्थेत गेली कीं त्या योग्याला कशाचीच काळजी नसते. तो कशाचाच विचार करत नाही. कारण त्याची त्याला आवश्यकता वाटत नाही. त्या अवस्थेत तो सतत रहाणे पसंत करतो, तो त्याचा स्वभाव बनलेला असतो. मी जे सांगत आहे ते सांगण्या इतके साधे नाही, कारण ते प्रत्यक्ष अनुभवावे लागते परंतु, तू विनंती केली म्हणून मी ते सांगण्याचा प्रयत्न केला एवढेच. कारण ती अशी विलक्षण अवस्था असते कीं, त्या अवस्थेत मी व तू एकच असतो. सगळे विश्र्व एका आंगठ्या एवढे लहान बनलेले आपण पहातो त्याला आवळयाची उपमा दिली आहे व करतलावर आवळा घेऊन तो पहावा अशाप्रकारे तो योगी हे जग पहात असतो. मी व तू, माझा मित्र व माझा शत्रू सगळे एकच आहेत असे विलक्षण ज्ञान त्याला होते व ह्या सगळया नेहमीच्या संज्ञा, नाती सगळे किती खोटे आहे ते तो समजतो. जग ज्या भ्रमात कार्यरत आहे ते

खोटे आहे हे तो समजतो परंतु, त्याला त्यात राहून कार्य करावे लागते. मींच किडा, मुंगी, वाघ, हत्ती असें सगळे आहे अशी धारणा त्याच्या येते. त्याला तथागत असें म्हणतात. त्या ब्रह्माने सगळी चराचर सृष्टी व्यापलेली आहे हे ज्ञान त्याला शांत करते. तो मुक्त होतो व पुन्हा जन्म घेत नाही नेहमीच्या अर्थाने, तरी त्याला देवत्व प्राप्त झालेले असते व म्हणून तो कांहीं कामासाठी इतरांना मुक्त करण्यासाठी ह्या जगात पुन्हा येत असतो. जगाचे रहाटगाडगे चालवण्यासाठी. असें सांगतात सनत सुजाता. धृतराष्ट्र व विदूर ऐकत असतात. रात्र त्यात संपते. सनत सुजाता निघण्याची तयारी करतात. दोघे बंधू अवाक तसेंच असतात, ते त्या परमात्म्याच्या बद्दलच्या माहितीने पुरते भारावलेले असतात.

सनत सुजाता पर्व सेहेचाळीसावे संपले.

## - सनत सुजाता पर्व संपले -

## - यान संधी पर्व सुरू –

## भाग सत्तेचाळीसावा

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने सनत सुजाता ह्यांच्याशी त्यांच्या गप्पा गोष्टी होण्यात ती रात्र संपते. त्यानंतर दुसरा दिवस उगवतो. विविध राजे आणि मानकरी सभागृहाकडे येण्याची सुरूवात होते. त्यांची मनस्थिती प्रसंन्न असते, ते संजयाचे, पार्थाकडून आलेले विधान ऐकण्यासाठी आतूर असतात. राजसभेत धृतराष्ट्राच्या नेतृत्वात ते सगळे राजे व मानकरी येतात व आपापल्या श्रेणीनुसार राखून ठेवलेल्या जागांवर स्थानापन्न होतात. ते सभागृह शुभ्र रंगाचे होते व खाली गालीचे आंथरलेले होते. भिंती सोन्याच्या होत्या. सगळे सभागृह अतिशय सुंदररीत्या सजवलेले होते. आसनं छानशी उत्तम कपड्यानी झाकलेली होती.

भिष्म, द्रोण, कृप, शल्य, कृतवर्मन, जयद्रथ, अश्र्वत्थामा, विकर्ण, सोमदत्त, वल्हिक, विदूर, युयुत्सू असें सगळे मातबर लोक त्या सभेत येऊन बसतात.

दुःशासन, चित्रसेन, शकूनी, दुर्मुख, दुःस्सह, कर्ण आणि उलूक, विवस्वान दुर्योधना बरोबर येऊन त्यांच्या आसनांवर जाऊन बसतात. ते त्यांच्या आयुधांसह तेथे प्रवेश करतात. त्याच्या हातात गदा, तलवारी, जंबिया असें असतात.

सगळे आल्याचे समजल्यावर राजसभेचा अधिकारी सगळया सभेला उद्देशून सांगतो कीं, आपला प्रतिनिधी जो पांडवांकडे समझौत्याच्या गोष्टी करण्यासाठी पाठवला होता तो आता सभेत येत आहे त्याचे सगळे स्वागत करतील. त्या प्रमाणे औपचारिकता पूर्ण झाल्यावर सुताचा पुत्र संजय आपले भाषण करण्यासाठी उभा होतो. संजयाच्या दोनही कानात रत्नजडीत वाळे होते. त्याचा उत्साह स्पष्टपणे जाणवत होता. प्रथम सगळयांना शुभेच्छा देऊन तो आपले प्रातिनिधीक भाषण करण्यास प्रारंभ करतो. तो बोलतो, "अहो कौरवांनो, आपळयाला माहीत आहे कीं, मी पांडवांना भेटण्यास गेलो होतो. मी आता तेथूनच परतत आहे. तेथे गेल्यावर माझे पंडुच्या सगळया मुलांनी यथोचित स्वागत केले व आपल्या कडील सगळया मंडळींची त्यांच्या प्रत्येकाच्या योग्यतेनुसार चोकशीसुद्धा केली. आपल्या सगळयांना उपचारानुसार ते शुभेच्छासुद्धा देत आहेत. आता ऐका ते काय बोलले ते मी जसे ते बोलले तसेंच सांगणार आहे. त्या आधी राजे धृतराष्ट्र ह्यांचा त्यांना जो संदेश मी घेऊन गेलो होतो तो वाचतो.

यान संधी पर्व भाग सत्तेचाळीसावा संपला.

## यान संधी पर्व

## भाग अठ्ठेचाळीसावा

धृतराष्ट्र बोलतात, "अरे संजया, मी प्रथम तुला विचारतो, मला प्रथम सांग तो धनुर्धारी धनंजय जो सगळ्या पाप्यांचा नाश करण्यासाठीच आला आहे व ज्याच्याशी दोन हात करणारा अजून जन्मला नाही असा पंडुचा मुलगा काय बोलला ते मला ऐकावयाचे आहे.

संजय त्यावर सांगतो, "अरे दुर्योधना त्याचे बोल तू ऐकणे जास्त महत्वाचे आहे म्हणून तू ते नीटपणे ऐक, पहिली गोष्ट म्हणजे अर्जुन युद्धासाठी उत्सूक आहे, म्हणजे सगळेच पांडव कौरवांना ठार मारण्यासाठी उताविळ आहेत. फक्त ते त्यांचा राजा आणि मोठा भाऊ, युधिष्ठीराच्या आज्ञेची वाट पहात आहेत. वासुदेवाच्या समक्ष त्याने ते जाहीर केले आहे कीं, कृष्णाच्या परवानगीने तो कौरवांचा नाश करण्यासाठी तयार आहे. असें सांगण्याचे कारण पांडव कृष्णाच्या आज्ञेत असतात. तो मला म्हणाला, अहो सुत, धृतराष्ट्राच्या त्या मूर्ख मुलाला सगळयांच्या समक्ष सांग कीं, त्या सुताच्या शिवीगाळी करणाऱ्या कर्णालासुद्धा तो ठार मारणार आहे. त्या सगळयांचे दिवस भरलेले आहेत". संजय सगळया सभागृहात जमलेल्या राजांना उद्देशून सांगतो कीं, पांडवांना युद्ध पाहिजे व त्यासाठी आपणसुद्धा तयार व्हावयाला पाहिजे ज्या युद्धात कौरवांच्या बाजूने लढणाऱ्या सगळयांना ते आव्हान होते. पुढे संजय बोलतो, "अहो राजश्री, ते तो बोलत असतांना स्वर्गातील देव त्यांच्या राजासह ते अर्जुनाचे बोल ऐकत होते आणि त्याच प्रमाणे पांडवांत बसलेले श्रींजयसुद्धा किर्तीचे ते आव्हान ऐकत होते. ते बोलत असतांना त्याचे डोळे लालेलाल झालेले होते. तो पुढे बोलला, जर बर्या बोलाने युधिष्ठीराला त्याचे सगळे राज्य बिनशर्त परत केले नाही तर हे युद्ध होणार ही काळ्या दगडावरील पांढरी रेष आहे असें समजा. धृतराष्टाच्र्या मुलांनी आता पर्यंत बरीच कुकर्म केली आहेत त्यांची शिक्षा त्यांना अजून झालेली नाही त्याची शिक्षा आता त्यांना देण्यासाठी युधिष्ठीर युद्ध करणार आहे. त्यासाठी भिमसेन, अर्जुन स्वतः आणि आश्विनी द्वय जय्यत तयार आहेत. त्यांच्या बरोबर वासुदेव आणि शिनीचा मुलगा दृष्यद्युम्न, शिखंडी आणि युधिष्ठीर स्वतः असतील. जर धृतराष्ट्राच्या मुलाला ह्या सगळयांशी लढण्याची खुमखुमी असेल तर पांडवांचा त्यांना शिक्षा करण्याचा उद्देश सफल होईल. म्हणून पांडवांशी शांततेने हा मामला सोडवण्यापेक्षा सरळ सरळ युद्धालाच तयार व्हावे असें धनंजयाचे म्हणणे आहे. तरी जर कौरव घाबरत असतील तर आधी सांगितल्या प्रमाणे त्यांना त्यांची सगळी मालमत्ता जी त्यांनी पांडवांकडून चोरली आहे ती ताबडतोब परत करावी तरी द्रौपदीचा जो अपमान विनाकारण केला गेला त्यासाठी कर्ण आणि दुःशासन ह्याना पांडव शिक्षा करणार

आहेतच. त्याशिवाय पांडवांना जो त्रास वनात सहन करावा लागला त्याची किंमत दुर्यौधनाला आणि शकूनीला द्यावी लागणार आहेच. दुर्योधनाला व त्याच्या मित्रांना त्याही पेक्षा जास्त खराब वागणूक पांडव देणार आहेत. सगळया कुकर्माचा वचपा ते काढणार आहेत हे कौरवांनी चांगलेच लक्षात घ्यावे. असे किर्ती सांगत होता. पांडवांच्या चांगुलपणाचा आणि सहनशिलतेचा गैरफायदा उठवल्या बद्दल अनेक राजे कौरवांना शासन करण्यासाठी उतावीळ आहेत. कारण त्यांच्या ह्या अशा कारभारामुळें व्यथित झालेले अनेक राजे पांडवांना मिळालेले आहेत. आता पर्यंत आम्ही खूप कांहीं सहन केले आहे त्याची भरपाई आता होणार आहे असें तो बोलला. अनेक वर्षाच्या त्रासाने कंटाळलेले युधिष्ठीर आता कौरवांना माफ करण्यास तयार नाही. त्यासाठी एक अंतिम युद्धा होणे हांच मार्ग आहे असें तो म्हणाला". पुढे संजय सांगतो, "ज्याप्रमाणें सुके गवत वार्याच्या झोक्यामुळे सगळीकडे आग पसरते तसे युधिष्ठीराचा क्रोध सगळे क्षत्रिय जाळून टाकणार आहे जे कौरवांच्या अन्यायी कारभाराची साथ देणार आहेत. युधिष्ठीर त्याच्या सात्त्विक तेजाने सगळे कौरव शाप देऊन भस्मसात करू शकतो पण तो नितीच्या नियमांने जाणे योग्य समजतो म्हणून आता त्या सगळया गैरव्यवहारासाठी कौरवांना शासन केले जाणार आहे. एक क्षत्रिय म्हणून पांडवांची त्यासाठी जबाबदारी आहे हे लक्षात घ्यावे. जेव्हां भिमसेन धृतराष्टाराला पाहिल त्याच्या रागीट नजरेने, तेव्हा दुर्योधनाला समजेल आपण कोणती चूक केली. भिमाच्या रुपाकडे त्याचे सैनिकसुद्धा पहाण्यास घाबरतात तेव्हां त्याला त्या भयंकर रुपात पाहून दुर्योधनाला त्याची अर्वाच्य भाषा आठवेल आणि पश्चात्ताप होईल. युद्धात जेव्हां दुर्योधन पाहिल कीं, भिम मोठ्या अजस्त्र हत्तींना लोळवतोय तेव्हां त्याला त्याची चूक कळेल. जेव्हां भिम एका एका कौरवाला त्याच्या गदेने ठार मारील तेव्हां दुर्योधनाला त्याची चूक कळेल. जेव्हां भिम त्याच्या रथात बसून सगळी शत्रूची सेना ठार मारेल तेव्हां दुर्योधनाला त्याची चूक समजेल. जेव्हां दुर्योधन पाहिल कीं, त्याची सगळी सेना कापरासारखी जळून जात आहे तेव्हां त्याला समजेल त्यानी किती मोठी चूक केली होती. जेव्हां नकूल त्याच्या रथातून बाण मारत कौरवांची सेना ठार करत फिरेल तेव्हां दुर्योधनाला त्याची चूक समजेल. आरामात रहाण्याची सवय असलेले कौरव जेव्हां वनवासामुळें संतापलेल्या नकूलाच्या हल्ल्यामुळें बेचिराख होतील तेव्हां दुर्योधनाला त्याची चूक काय ते समजेल. युधिष्ठीराच्या एका हांकेने लढण्यासाठी तयार असलेले सुतांचे सैन्य जेव्हां आघाडी सांभाळून कौरवांच्या सैन्याची धुळधाण करेल तेव्हां दुर्योधनाला त्याची चूक कोणती ते समजेल. जेव्हां कुरु सैनिक पहातील कीं, द्रौपदीची कोवळया वयातील बहादूर मुलं जीवाची बाजी लावून लढत आहेत तेव्हां त्याला त्याची चूक समजेल. सहदेव त्याच्या आवाज न करणाऱ्या रथातून जेव्हां कौरवांच्या दोस्त राजांची मुंडकी उडवेल तेव्हां दुर्योधनाला त्याची चूक समजेल. सहदेव जेव्हां गांधारीच्या मुलांची डोकी कापू लागेल तेव्हां दुर्योधनाला त्याची चूक समजेल. जेव्हां तो कृष्णाच्या मुलांना

विषारी बाणांचा वर्षाव करताना पाहिल तेव्हां त्याला त्याची चूक समजेल. सुभद्रेचा मुलगा अभिमन्यू जेव्हां कौरवाच्या सैन्याच्या फळया फोडत घुसेल व त्यांना पळावयाला लावत असल्याचे पाहिल तेव्हां त्याला त्याची चूक काय झाली ते समजेल. जेव्हां प्रभद्रकांचे सैन्य सिंहासारखे कौरवांच्या सैनिकांवर तुटून पडतील तेव्हां त्याला त्याची चूक समजेल. जेव्हां ते महान योद्धे विराट आणि द्रुपद, कौरवांच्या फौजांची धुळधाण उडवतील तेव्हां दुर्योधनाला त्याची चूक काय ते समजेल. जेव्हां मत्स्य देशांचे बेडर योद्धे कौरवांच्या फौजावर तुटून पडतील व ते सैनिक जीवाच्या भितीने पळत असलेले तो पाहिल तेव्हां त्याला त्याची चूक काय झाली ते समजेल. मला सांगावयाला वाईट वाटते परंतु, केवळ दुर्योधनाच्या मूर्खपणामुळें शंतनुंचे खरे पुत्र भिष्म शिखंडीच्या हल्ल्याने मारले जातील तेव्हां त्याला त्याची चूक काय झाली ते समजेल. जेव्हां दृष्टद्युम्न द्रोणांना ठार मारील तेव्हां दुर्योधनाला समजेल त्याना काय चूक केली. तो सोमकश्र्वांचा नेता, वृश्नी कुळातील दामोदर सांगत होता कीं, हे युद्ध होऊ देऊ नकोस, असा लोभीपणा तुला महागात जाईल तरी दुर्योधन युद्धाचा आग्रह करतो त्याचा त्याला पश्र्चात्ताप होईल". संजय पुढे सांगतो कीं, पांडवांनी सत्यकीला त्यांचा सरसेनानी म्हणून नेमले आहे. ज्याच्या सारखा श्रेष्ठ दर्जाचा सरसेनानी सार्या जगात मिळणे दुरापास्त आहे. तो जसा शत्रूवर हल्ला करील दुर्योधन पश्र्चात्ताप करील". संजय पुढे सांगतो, "अर्जुन मला सांगत होता, जेव्हां तो त्याच्या भयंकर दिसणाऱ्या रथाचे दर्शन घेईल, जो पांढर्या शुभ्र घोड्यानी खाचला जात असेल, त्या रथावर माझा ध्वज असेल ज्यावर कपीमुद्रा असेल ज्यातून अघोरी शक्ती असलेल्या शक्तीचा संचार असेल, जो साक्षात केशव चालवत असेल, तेव्हां दुर्योधनाला त्याची चूक काय ते समजेल. जेव्हां तो माझ्या गांडीवाच्या धनुष्याचा टणत्कार ऐकेल तेव्हां तो नीच माणूस जो धृतराष्ट्राचा पुत्र आहे, पश्र्चात्ताप करील. माझ्या गांडीवातून पावसाच्या वर्षावा सारखे बाहेर पडणारे बाण जेव्हां त्याच्या सैन्याची त्रेधातिरपीट उडवतील कारण त्या बाणांमुळें भर दिवसा तेथे रणभूमीत अंधार पडलेला असेल. ते पाहिल्यावर त्याला त्याची चूक समजेल. जेव्हां तो धृतराष्ट्राचा मुलगा त्यांचे बाण माझ्या बाणामुळें तुकडे होऊन पडत असलेले पाहिल तेव्हां त्याला त्याची चूक समजेल. जेव्हां तो पाहिल कीं, त्यांचे अत्युत्तम योद्धे मरून पडत आहेत त्याला त्याची चूक समजेल. जेव्हां तो पाहिल किं, त्याचे धाकटे बंधू लढण्या आधींच मरून पडत आहेत त्याला पश्र्चात्ताप होईल. जेव्हां तो पाहील कीं, माझे बाण साक्षात यमाचा अवतार घेऊन त्याच्या सैन्याचा नाश करत आहे तेव्हां त्याला त्याची चूक समजेल. जेव्हां तो पाहिल कीं, त्याते पाईक  सैनिक माझ्या रथाच्या धुळवटीने गोंधळून गेले आहेत, त्याला त्याची चूक समजेल. जेव्हां तो पाहिल कीं, त्याच्या सैनिकांच्या देहांचे शतशः छिन्नभिन्न झालेले तुकडे इतस्ततः पसरलेले आहेत त्याला त्याची चूक समजेल. जेव्हां तो पाहील कीं, त्याच्या सैन्याचे हत्ती, घोडे, तहानेने व्याकुळ भटकत आहेत त्याला त्याची चूक

समजेल. जेव्हां तो पाहिल त्याचे सैनिक जखमाने विव्हळत आहेत व मृत्यूची भिक मागत आहेत त्याला त्याच्या कर्माचा पश्चात्ताप होईल. जेव्हां तो त्याच्या भावंडांच्या देहाचे तुकडे झालेले पाहिल तेव्हां त्याला त्याची चूक समजेल. जेव्हां तो माझा रथ व त्यावर माझे गांडीव आणि सारथी कृष्ण पाहिल आणि पांचजन्य शंखूचा आवाज ऐकेल त्याला त्याच्या चुकीची जाणीव होईल. जसे युगांताच्या समयी मृत्यू अनेक नीच अवस्थेला गेलेले आत्मे जे एकत्र जमा झाले आहेत व नष्ट होणार आहेत खात असतांना दिसतो त्याप्रमाणें त्याला मी त्याच्या योद्ध्यांना मारतांना पाहिल तेव्हां त्याला पश्चात्ताप होईल. जेव्हां त्याच्या मूर्खपणामुळें त्याची सगळी संपत्ती लयाला गेलेली तो पाहिल तेव्हां त्याला त्याची चूक समजेल.

पुढे पार्थ संजयाला सांगतो, एकदा भल्या पहाटे तो त्याचे प्रातर्विधी उरकून प्रार्थना करत होता तेव्हां त्याला एक ब्राह्मण सांगतो कीं, "अहो पार्थ, तुम्हाला एक मोठे विलक्षण कार्य करावे लागणार आहे". पुढे तो ब्राह्मण सांगतो, "तू जेव्हां तुझ्या शत्रूंना मारत असशिल तेव्हां तुझ्या बाजूनी इंद्र त्याचे अस्त्र घेऊन तुला मदत करत असेल. त्याच प्रमाणें कृष्ण, वसुदेवाचा मुलगा, तुला संरक्षण देत असेल. तुझा रथ तो चालवत असेल". ते ऐकून मला मला समजले कीं, ह्या युद्धाला दैविक महत्व आहे". ज्याच्या पाठीशी दामोदर आहे त्याला कधीही माघार घ्यावा लागत नाही हे विधीलिखीत आहे.

अर्जुन संजयाला सांगतो, एकटा जनार्दन सगळयांना भारी आहे पण तो युद्धात भाग न घेता मला मदत करण्याचे आश्वासन देत आहे. म्हणजे हे काम मला करावयाचे आहे. वासुदेवाला हरवेल असा कोणीही नाही.

पुढे संजय त्या सभेला सांगतो, "अर्जुनाने एका हाताने सगळया भोज सैन्याला हरवले होते जेव्हां तो सुभद्रेला घेऊन पाळाला होता. त्याला कौरव कसें मारणार"? त्यानंतर त्याला प्रद्युम्न झाला. जो देवांचा प्रिय आहे. त्यांने गांधारांचा पराजय करून नग्नजिताच्या सगळया मुलांचे पारिपत्य केले, सुदर्शनास सोडवले. त्याने वाराणशी जाळून टाकली व तेथे अनेक वर्षे कोणी राजा नव्हता. त्यांच्या बरोबर निशादांचा राजा एकलव्य आहे. त्याला कृष्णाने मारले.

संजय सभाला सांगतो, "कृष्णाने उग्रसेनाच्या मुलास, कंसास मारले व प्रजेला मुक्त केले. कृष्ण शल्वाशी लढला, सुभाचा राजा, ज्याचे स्थान आकाशात होते. अशा कृष्णाशी कोणता मनुष्य लढू शकेल"? असुरांचे एक शहर होते, प्राग्योतिश, जेथे कोणालाही पोहोचणे केवळ अशक्य आणि जेथे पृथ्वीच्या मुलांने नरकांने आदितीचे मौल्यवान कर्णफुलं लपवून ठेवली होती, ज्या नरकाला इंद्र त्याच्या सगळया देवसेनेने सुद्धा पराजित करू शकत नव्हता, त्याला कृष्णाने मारले आहे.

देवांनी कृष्णाला असुरांना मारण्यासाठी वापरले आहे. कृष्णाने अनेक असुर मारले आहेत. त्यात मुरा आहे त्याशिवाय असंख्य राक्षसांना सुद्धा त्यांने मारले आहे. नरकाला व मुराला मारून कृष्ण ते आदितीचे मौल्यवान जवाहीर मिळवले. त्याला थकवा माहीत नाही. सगळया योद्ध्यांचा खरा शत्रू असतो त्यांचा थकवा. कृष्णाला मिळालेल्या एका आशिर्वादामुळे त्याला तो शत्रू त्रास देत नाही. म्हणून तो नेहमी विजयी ठरतो. देव त्याला तो आशिर्वाद देतात, त्याप्रमाणे त्याला आकाश, पाणी अडवू शकत नाहीत. कोणतेही शस्त्र त्याला जखम करू शकणार नाही, त्यामुळें कृष्ण सदैव विजयी रहाणार आहे. असें असतांना धृतराष्टाराची मुलं त्याला हरवण्याच्या गोष्टी करत आहेत, ह्याचे नवल वाटते. दुर्योधन दामोदराला अटक करण्याची स्वप्न पहात आहे, हे किती मूर्खपणाचे आहे ते समजले पाहिजे. अर्जुन पुढे सांगतो आमच्यात फूट पाडण्याचा प्रयत्न तो करत असतो किती मूर्खपणाचे आहे हे त्याचे वागणे.

एवढे सांगितल्यावर संजय सांगतो कीं, अर्जुन भिष्माचार्यांकडे लवून नमस्कार करत, द्रोणांना नमस्कार करत, कृपाचार्यांना व अश्वत्थामा ह्यांना नमस्कार करत बोलतो, मी त्या पापी माणसाचा नाश करणारच. आमचे राज्य ज्या प्रकारे बळकावले ते आम्हाला सहन होत नाही. बारा वर्षे वनवासात आणि एक वर्ष अज्ञातवासात काढून आम्ही मोठी तपस्या तेली आहे त्यामुळें आमचे बळ वाढले आहे. त्या उलट कौरव त्यांच्या वासनामय जीवनात राहून त्यांचे अध्यात्मिक बळ घालवून बसले आहेत. त्यांना संपवणे आम्हाला कांहीं अवघड नाही. आम्हाला इंद्राचे, कृष्णाचे पाठबळ आहे. आमचे अध्यात्मिक बळ पुरेसे असेल तर कृष्णाचे सहकार्य आम्हाला मिळणार व आम्ही कौरवांना संपवणार हे ठरलेले आहे. अर्जुन सांगतो, कौरवांच्या बरोबर कर्णालासुद्धा आम्ही मारणार आहोत त्याच्या अपशब्दाची किंमत त्याला द्यावा लागेल. त्यानंतर आम्ही आमचे राज्य सन्मानाने ताब्यात घेऊ.

संजय पुढे पांडव सांगतात कीं, जर धृतराष्ट्राच्या मुलांना त्यांच्याशी लढावयाचे असेल तर त्या युद्धात ते निश्चितपणे ठार मारले जातील. परंतु, जर शांततामय तोडगा मान्य केला तर ते निदान जीवंत राहू शकतील. कौरव त्यांच्या बायकामुलांसह मजा करत असतांना आम्ही वनात ब्राह्मणांबरोबर वेदाचारात मग्न होतो. त्यातच आम्हाला समजले कीं, लवकरच कौरवांचा नाश होणार आहे. त्याबरोबर श्रींजयांचासुद्धा विनाश होणार आहे आणि पांडवांची जीत होणार आहे. त्यानंतर अजातशत्रू असा युधिष्ठीर सर्व जगावर राज्य करणार आहे. जनार्दन जो सगळे जाणतो तो हे सगळे आधीपासून ओळखत आहेच. धृतराष्ट्राचे मुलगे जर लढण्यासाठी आले तर ते सगळे मारले जाणार आहेत हे निश्चित. रात्री कोल्हेकुई सुद्धा ऐकू येत होती. त्याचा अर्थ दुर्योधनाचासुद्धा त्यात नाश होणार आहे. अर्जुन पुढे सांगत असतो संजयाला कीं, राक्षस स्वर्गातून

येऊन त्याच्या रथामागून चालत असतात असें त्याला दिसते. त्याच्या भात्यातील बाण त्याला सारखी विनंती करत असतात कीं आम्हाला फेंक कारण आम्हाला कौरवांच्या अंगात घुसण्याची उत्कंठा आहे. अर्जुन पुढे सांगतो, तो त्याची ठेवणीतील अस्त्र शुकर्ण, पशुपत, आणि ब्रह्म ही अस्त्र तो कौरवांच्या सैन्यावर वापरणार आहे. जे कोणी आमच्याशी लढण्यासाठी येणार आहेत त्या सगळया राजांचा मी नाश करणार आहे. हा माझा अंतिम निर्णय आहे. पुढे तो संडयाला बोलतो, अरे गलवगणा, त्या दुर्योधनाचा मूर्खपणा पहा, तो साक्षात देवांशी लढण्याचा बेत आखत आहे. कांहीं हरकत नाही. वृद्ध भिष्म शंतनुचे पुत्र, कृप, द्रोण आणि त्याचा मुलगा अश्ववत्थामा आणि विदूर जरी कौरवांना शुभेच्छा देत असले तरी ते होणार नाही.

यान संधी पर्व भाग अठ्ठेचाळीसावा संपला.

# यान संधी पर्व

## भाग एकोणपन्नासावा

वैशंपायन सांगतात, त्या भर सभेत शंतनुपुत्र भिष्म दुर्योधनाला बोलतात, "दुर्योधना, एके काळी बृहस्पती आणि शक्र ब्रह्माकडे गेले होते. त्याच्या बरोबर मरुत, वसु, अग्नी, आदित्य, साध्य, सप्तर्षी, गंधर्व, विश्ववसु आणि तावण्यवती अप्सरांचा संघ सुद्धा ब्रह्माला भेटण्यास गेला होता. ते सगळे त्याच्या भोवती कडे करून बसले. नेमके त्यावेळी दोन प्राचीन देवर्षी नर आणि नारायण तेथून निघाले. त्यावेळी बृहस्पती ब्रह्माला विचारतो, "ते दोघे कोण जे आता आपल्यामधून गेले, तुम्हाला न बोलता? आम्हाला सांगा". त्यावर ब्रह्म त्याला सांगतात, ते महान तपोसामर्थ्य असलेले तेजस्वी योगी ज्यांच्या प्रकाशाने सगळे जग उजळून जाईल असे आहेत, नर आणि नारायण. ते सध्या ब्रह्माच्या लोकात रहात आहेत. जे जगात आनंद निर्माण करण्यासाठी आहेत. त्यांची पुजा देव, गंधर्व आणि अप्सरा करतात. त्यांचे काम असुरांचा नाश करणे असें आहे. ब्रह्म पुढे सांगतात, ते ऐकून शक्र तेथे जातो जेथे ते दोघे देवर्षी तपस्या करत असतात. त्याच्या बरोबर इतर स्वर्गीय मंडळीसुद्धा तेथे पोहोचतात. त्यांच्या पुढे बृहस्पती असतात. त्या सुमारास असुर आणि देव ह्यांच्यात एक भीषण युद्ध होत असते त्यामुळें सगळे देव घाबरलेले होते. तेथे गेल्यावर इंद्र त्या दोघा देवर्षींना लवून नमस्कार करतो व आशिर्वाद मांगतो कीं, त्याला त्या लढाईत यश मिळो. तो आशिर्वाद ते दोघे देतात आणि त्या युद्धात इंद्र दैत्यांचा पराभव करतो. त्या युद्धात नर असंख्य दानवांना ठार मारतो. त्यात पौलुम आणि कालकंज मोठ्या संख्येने होते. तो नर देवर्षी म्हणजेच हा अर्जुन आहे. असुर जंभू त्याला गिळंकृत करणार होता तेवढ्यात त्याने त्याला त्याच्या अग्नीबाणाने मारून टाकले. त्यानेच दैत्याची नगरी हिरण्यपुर बरबाद केले. त्या लढाईत तो साठ हजार निवत कवच दैत्यांना मारतो. त्याला अग्नीदेवाची नेहमी साथ असते. दुसरा देवर्षी नारायण सुद्धा त्याचप्रकारे दैत्य दानवांना मारण्याबाबत ख्यातनाम आहे. असें ते दोघे आता अर्जुन आणि कृष्ण ह्या अवतारात आलेले आहेत. त्यांना हरवणे असुरांना शक्य नाही. ते नेहमी जन्म घेतात वाईट प्रवृत्ती जेव्हां जेव्हां ताकदवान होतात. त्यांचे कार्य असते अन्याया विरुद्ध लढणे. तेंच वेदाचे ज्ञानी नारद वृष्नींबद्दल बोलले होते. जेव्हां तू दुर्योधना, केशवाला त्याच्या गदा चक्रासह आणि अर्जुनाला त्याच्या गांडीवासह एकाच रथात पहाशिल तेव्हां तुला माझे हे शब्द आठवतील. तुझी बुद्धी फिरली आहे कां कीं, ह्यांच्या विरुद्ध तू लढण्याचा विचार करत आहेस"? माझे जर तू ऐकणार नाहीस तर तुला तुझ्या भावंडांचा संहार होत असलेला पहावा लागेल. जर ते जगावेत असें तुला वाटत असेल तर तू माझे ऐकशिल. केवळ तीन भ्रष्ट लोकांमुळें म्हणजे, कर्ण जो हीनकुळातील आहे, शकूनी आणि दुःशासन, ह्यांच्यामुळें तू हा चुकीचा निर्णय घेत आहेस".

ते ऐकून कर्ण बोलतो, "आपल्याला असें बोलणे शोभत नाही, अहो पितामह. माझ्या बद्दल असें उद्गार काढणे कारण मी क्षत्रिय वर्णाची कर्तव्ये स्वीकारली आहेत माझ्या वर्णाबाहेरचे ते आहे, त्यात मी काय वाईट करत आहे ते सांगा. मी धृतराष्ट्राच्या परिवाराला कोणता असा त्रास दिला म्हणून आपण असें माझ्याबाबत बोलता? उलट मी येत्या युद्धात सगळया पांडवांना ठार मारून माझी दुर्योधनाशी असलेली दोस्ती सिद्ध करणार आहे. माझे कर्तव्य आहे कीं, मी धृतराष्ट्रांची व दुर्योधनाची सेवा करावी. त्याच्या आधाराची तेवढी किंमत मला द्यावीच लागेल. मी दुर्योधनाचे हित पहात असतो प्रत्येक वेळी, हे आपण कसे विसरता"?

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर भिष्म धृतराष्ट्राला बोलतो, "हा मुलगा नेहमी अर्जुनाला हरवण्याच्या वल्गना करत असतो पण तो त्याच्या सोळावा भागा एवढासुद्धा नाही. जेव्हां एवढी मोठी आपदा आपल्यावर आलेली असतांना ह्या मूर्खाच्या गोष्टी ऐकण्यात तू तुझा समय व्यर्थ घालवू नकोस. तुझ्या नालायक मुलानी विनाकारण त्या पवित्र पांडवांचा अवमान केला आहे त्याची प्रतिक्रिया तुझ्या मुलांना भोगावी लागणार आहे. अशी कोणती मोठी बहादुरी ह्या सुतपुत्राने आता पर्यंत गाजवली आहे कीं, तो अशा प्रकारे बोलतो ते मला समजत नाही. विराटाच्या कडे जेव्हां त्यांचे पशु चोरण्यासाठी तुझी मुलं गेली होती तेव्हां धनंजयाने सगळया कौरवांना पळून लावले तेव्हां ह्याचे कपडे काढून पाठवले होते ते आठव. तेव्हां कोठे गेली होती त्याची बहादूरी? जेव्हां गंधर्वाने कौरवांना पकडले तेव्हां हा कोठे लपून बसला होता? तेथेसुद्धा भिम, पार्थ आणि आश्विनी द्वय त्यांना सोडवण्यासाठी गेले होते. त्यांच्या गुणाची कल्पना त्याला कोठू येणार"? अरे धृतराष्ट्रा हा जे बोलतो त्यात कांहीं तथ्य नाही, त्याच्या बोलण्यात येऊ नकोस. ते भिष्माचे ऐकल्यावर भारद्वजाचा मुलगा द्रोण धृतराष्ट्राला व सगळया सभेला उद्देशून सांगतो, "अहो महाराज जे भिष्म सांगतात त्याप्रमाणे आपण करावे. आपण दुर्गुणी लोकांच्या बोलण्याकडे जास्त लक्ष देऊ नये त्यातच आपल्या सगळयांचे भले आहे. पांडवांबरोबर सलोखा हा उत्तम पर्याय आहे. संजय जे अर्जुनाबद्दल बोलला आणि आता भिष्म जे सांगत आहेत ते लक्षात घेण्यासारखे आहे. तरी धृतराष्ट्र कांहीं निर्णय घेत नाही सलोख्या बाबतचा परंतु, उलट पुन्हा संजयाला पांडवांच्या तयारीबाबत विचारणा करू लागतो, ते पाहिल्यावर त्या सभेत असलेल्या सगळयांना समजते कीं आता कौरवांचा विनाश अटळ आहे.

यान संधी पर्व भाग एकोणपन्नासावा संपला.

# यान संधी पर्व

## भाग पन्नासावा

धृतराष्ट्र संजयाला विचारतात, "पांडव राजा, यमाचा मुलगा काय पुढे बोलला ते सांग. तू अर्जुनाचे सांगितले आहेस पण मला युधिष्ठीर काय विचार करतो ते समजून घ्यावयाचे आहे. त्याला त्या शक्य असलेल्या समरा बद्दल काय वाटते ते मला सांग. त्याचे किती भाऊ त्याच्या आज्ञांचे पालन करत आहेत? माझ्या वाईट मुलाने फसवल्यानंतर सुद्धा तो शांतता करार करण्यास कसा तयार झाला आहे ते मला सांग".

संजय सांगतो, "सगळे पांचाल आणि त्याचे चार बंधू त्याचा तितकाच सन्मान करत आहेत. ते सगळें युद्धासाठी एकदम तयार आहेत. किंबहूना त्यांना सगळयांना युद्ध हवे आहे कारण त्यांना त्यांच्यावर झालेल्या अन्यायाचा वचपा काढावयाचा आहे. सगळे पांचाल कुंतीच्या मुलांचे स्वागत करत असतात. पांचाल, केकया आणि मत्स्य लोक पांडवांचे मोठे चाहते आहेत. ते त्यांच्यासाठी कोणताही त्याग करण्यासाठी सदैव तयार असल्याचे मला दिसले. त्याशिवाय सगळे गुराखी लढण्यासाठी तयार असलेले दिसले. ब्राह्मण, वैश्य कुटूंबातील बायकासुद्धा त्यांना फार मानतात हे मी पाहिले. ते सगळे पांडवांना त्यांच्या कुटूंबाचे सदस्य आहेत असा मान देतात".

धृतराष्ट्र विचारतो, "मला सांग अरे संजया, त्यांनी जे सैन्य जमा केले आहे त्याबद्दलची माहिती तुला काय आहे. दृष्टद्युम्न, सोमक आणि इतर योद्धे पांडवांच्या बाजूनी लढणार आहेत त्यांबद्दल तुला काय माहिती आहे ती सांग".

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने प्रश्न भरसभेत संजयाला विचारल्यानंतर तो विचार पूर्वकपणे दीर्घ श्वास घेत बोलणार इतक्यात अचानकपणे त्याला घेरी येते व तो खाली पडतो. ते पाहिल्यावर त्या राजांच्या सभेत विदूर मोठ्याने बोलतो, "अहो राजश्री, तुमचा संजय घेरी येऊन खाली कोसळलेला आहे. तो कांहीं सांगण्याच्या परिस्थितीत नाही".

ते ऐकून धृतराष्ट्र बोलतो, "अरे विदूरा, मी समजू शकतो त्याने ते महापराक्रमी महारथी पाहिले आणि त्याला माझ्या मुलांच्या बद्दल असणाऱ्या भावनेमुळें तो चिंताक्रांत झाला असणार, बिचारा तो नोकर काय सांगणार मला, त्याची काळजी घेतली पाहिजे".

वैशंपायन पुढे सांगतात, थोड्या वेळांनी तो शुद्धीवर येतो. सांगू लागतो, "मी त्यांना कुंतीच्या मुलांना पाहिले तेव्हां ते मला कृश झालेले दिसले. वनवासात तपस्या करणाऱ्या योग्यांसारखे ते मला वाटले. अज्ञातवासाचा क्षीण त्यांच्या मुखावर मला दिसत होता. ऐका माझे

राजे, पांडवांना साथ आहे द्रुपदाच्या मुलाची, दृष्टद्युम्नाची, जो यज्ञज आहे व ज्याच्या सगळया इंद्रियांवर पूर्ण ताबा आहे. तो धर्मशास्त्र चांगले जाणतो. त्याने कधी कोणाशीही वैर केलेले नाही. त्यांने काशी आणि अंगच्या राजांना पराजित केले आहे. मगध, कलिंग त्याने पादाक्रांत केले आहेत. त्याशिवाय पांडवाची मुलं जी आता युद्धशस्त्रात प्रवीण झाली आहेत ते सुद्धा कौरवांशी लढणार आहेत. महाबली भिम ज्याने अनेक राक्षस मारले आहेत तो तुझ्या मुलांना मारण्यासाठी उतावीळ आहे. भिमाने कुबेराच्या रक्षक राक्षसांचे पारीपत्य केले द्रौपदीला कमळ हवे होते म्हणून गंधमादन पर्वतावर तो वृकोदर तुझ्या मुलांचा वध करण्यासाठी उतावीळ आहे. ज्याचा सेबतान आहे अग्नी, ज्याने स्वर्गात जाऊन महादेवाकडून आणि इतर लोकपालांकडून त्यांची शस्त्रे शिकला तो विजय तुझ्या मुलांचा नाश करण्यासाठी उतावीळ आहे. तो आश्विनी, नकूल ज्याने म्लेच्छ लोकांनी भरलेले पश्चिमेकडील प्रदेश पादाक्रांत केले तो तुझ्या मुलांना मारण्याच्या तयारीत आहे. तो दुसरा आश्विनी सहदेव ज्यांने काशी, अंग आणि कलिंग देश पादाक्रांत केले तो तुझ्या मुलांना मारणार आहे. त्याशिवाय अश्र्वत्थमन, धृश्तकेतू, रुक्मी, प्रद्युम्न सहदेवाबरोबर तुझ्या मुलांचा संहार करण्यासाठी उतावीळ आहेत. काशी राजाची ती मुलगी जिला भिष्म स्वयंवराच्या समयी पळवून आणतो व नंतर सोडून देतो ती अंबा तिच्या शापाने तुझ्या कुळाचा नाश करणार आहे. त्यासाठी ती तपस्या करत आहे. ती नंतर मृत्यू झाल्यावर पांचालांच्या घरात जन्म घेते मुलगी म्हणून परंतु, नंतर मुलगा होते तो शिखंडी तुझ्या विरुद्ध लढणार आहे. त्याशिवाय केकया राजपुत्र, युयुध वृश्नींचा राजा, तुझ्या विरुद्ध लढणार आहेत. ज्याच्या कडे पांडव अज्ञातवासात रहात होते तो राजा विराट तुझ्या विरुद्ध लढणार आहे. काशीचा राजा पांडवांना मिळाला आहे. त्याचे सैन्य पांडवांना मिळाले आहे. द्रौपदीची सगळी मुलं जरी फार तरूण असली तरी युद्ध कलेत तरबेज झाली आहेत ती लढणार आहेत. शिशुपालाचा मुलगा धृष्टकेतु पांडवांना मिळाला आहे. छेड्डीचा राजा पांडवांना मिळालेला आहे. तो त्याचे अक्षौहिणी सैन्य पांडवांसाठी पाठवत आहे. वासुदेव जो सगळया देवांचा देव आहे, तो दामोदर, अर्जुनाचा रथ चालवणार आहे. सरभ, छेड्डी, करकर असें सगळे राजे तुझ्या विरुद्ध लढण्याच्या तयारीत आहेत. जरासंधाचा मुलगा सहदेव पांडवांना मिळाला आहे. जयत्सेन हा मोठा योद्धा त्यांच्या बाजूने आहे. स्वतः राजा द्रुपद त्या लढाईत सामील होणार आहे. त्याशिवाय अहो राजश्री, असंख्य छोटे मोठे राजे त्यांच्या बाजूने आहेत ज्यांच्यावर एकेकाळी युधिष्ठीराने कृपा केली होती. ते त्याची परतफेड करण्यासाठी तुझ्या मुलांशी लढणार आहेत.

यान संधी पर्व भाग पन्नासावा संपला.

# यान संधी पर्व

## भाग एकावन्नावा

धृतराष्ट्र पुढे विचारतो, "तू जे हे राजे सांगितलेस ते सगळे खरोखरच फार मोठे योद्धे आहेत. परंतु, एकटा भिम त्यांच्या एवढा महाबली आहे हेसुद्धा आपल्याला माहित आहे. माझ्या मित्रा, रागावलेला भिम म्हणजे वाघाच्या तावडीत सापडलेले लठ्ठ हरीण अशी परिस्थिती होणार आहे. माझ्या रात्री झोपेविना जातात हल्ली. त्या वृकोदराच्या नुसत्या आठवणींने माझा श्वास गुदमरतो. त्याचे हात इतके बलवान आहेत मला नाही वाटत ह्या सगळया सैन्यात त्याच्याशी बरोबरी करू शकेल असा एकही असेल. भयंकर चिडलेले असें पंडुचे पुत्र जे गमतीत सुद्धा हसत नाहीत ते माझ्या मुलांना मारणार ह्या जाणीवेने जीव घाबरा होतो. तिरक्या नजरेने पहात जेव्हां त्याचा ढगाच्या गडगडाटासारखा आवाज येतो तेव्हां भितीने कापरे भरते. त्याच्या हातातील गदा म्हणजे यमाचीच गदा असे वाटते. मला आता समजू लागले आहे कीं, माझी मुलं खरोखरच मोठ्या संकटात जाणार आहेत. माझ्या सैनिकांना तो हरणात घुसलेल्या सिंहासारखा मारून टाकणार हे मला दिसत आहे. पांडवांत फक्त हा एक आहे जो क्रूरपणे त्याची ताकद दाखवतो. त्याच्या लहानपणापासूनच तो माझ्या दुर्योधनाशी शत्रूसारखा वागत आला आहे. त्याने नेहमीच माझ्या इतर मुलांना जखमी केले आहे. त्यामुळें ते सगळे त्याला तेव्हांपासून घाबरत असतात. आज जे हे भांडण होत आहे त्या मागे ह्या भिमाचा दाणगटपणा आहे हे मी जाणून आहे. तो विनाकारण माझ्या मुलांना हुसकवत असे. मला सगळे सांगत असतं पण मी त्या गोष्टींकडे कधी जास्त लक्ष दिले नाही. मला माझ्या कल्पनेच्या दृष्टीने स्पष्ट दिसते कीं, तो रागावलेला भिम माझ्या सैन्याची धुळधाण करत आहे. कदाचित जर तो शांत असता तर ही वेळ आली नसती. आयुधात तो द्रोण आणि किर्ती सारखा आहे, त्याचा वेग त्याच्या पित्यासारखा म्हणजे वायूसारखा पिसाट आहे. त्याच्यापुढे कोण टिकू शकेल? अशा वायूपुत्राला कोण मारू शकेल? ज्याने राक्षस आणि यक्ष मारले आहेत त्याच्यापुढे मनुष्य कसा टिकेल? अरे संजया मी तुला सांगतो, अगदी लहानपणीसुद्धा तो मला आवरता येत नव्हता. तो माझ्या दुर्बुद्ध मुलांना निश्चितच ठार मारील. अतितापट आणि क्रूर असा हा माझा पुतण्या मरेल पण वाकणार नाही हे मी समजू शकतो. शौर्य, प्रचंड ताकद आणि उजळ वर्ण असा हा माझा पुतणा, ताडासारखा अर्जुनापेक्षा किंचित उंच जो घोड्यापेक्षा जास्त वेगांने धावू शकतो त्याच्याशी माझी सगळी सेना कशी लढणार? मधाळ दृष्टी असलेला माझा हा पुतणा, ज्याचे शब्दोच्चार स्पष्ट असतात व मुद्दे मांडण्याची तऱ्हा बिनतोड आहे, असा तो असल्याचे मला गुरू व्यासांनी एकदा सांगितले आहे म्हणून मी हे सगळे जाणतो. रागावल्यानंतर तो त्याच्या लोखंडी गदेने सगळी सेना, त्यातील रथ, हत्ती, घोडे मारून टाकणार आहे. त्या रागीट

मुलाला मी त्याच्या लहानपणी बर्याचवेळी रागावून बोललो आहे त्या सगळया गोष्टी मला आठवतात. कदाचित ते सगळे आता ह्या युद्धात तो बाहेर काढणार असें वाटते व त्याची मला चिंता वाटते. माझ्या मुलांना माहीत नाही ते कोणत्या भयंकर परिस्थितीला निर्माण करत आहेत. त्याचे जे घातक परिणाम होणार आहेत त्यांची त्याला जराशीसुद्धा कल्पना नाही. अरे संजया माझी मुलं माझे ऐकत नाहीत व मी असा अंध असल्यामुळें अस्वस्थ होण्यापलिकडे कांहींच करू शकत नाही. माझ्या मुलाची अशी परिस्थिती झाली आहे, म्हणतात ना, घी देखा बडगा नही देखा. पांडवांशी समझौता करण्याचे कित्येक फायदे आहेतते मी जाणतो परंतु, चुकीच्या मित्रांच्या बहकाव्यात आलेला माझा सुयोधन माझे अजिबात ऐकत नाही. पांडव हे माणसाच्या रुपात त्यांच्यापुढे येणारा काळ आहे, तो काळ त्याला दिसत नाही तो मूर्ख मुलगा त्या काळाला पहात नाही तो ते मनुष्यरुपातील पांडव पहात आहे. मला त्या भयानक काळाची पावलं समजतात पण मी त्यांना आवरू शकत नाही. ही माझी व्यथा आहे.

जगाच्या अंतकाळी जसा काळ नाचेल तसा हा पांडव युद्धभूमीवर त्याचे तांडव करील व माझी सेना, त्यातील रथ, सारथी, घोडे बरबाद करील. त्या रथावरील ध्वज उखडून काढील व रणभूमीवर फेकून देईल. हत्ती आणि घोड्यावरून लढणारे माझे सैनिक गंगेच्या जोरांने वहाणाऱ्या प्रवाहात जसे सगळे वाहून जाते तसे वाहून जाणार आहेत हे मला जाणवते. भिमाच्या हल्ल्यामुळें माझी मुलं आणि इतर राजे व त्यांच संबंधी इतस्ततः पळून जाताना मला दिसतील. हा भिमच होतो जो वासुदेवाबरोबर मगध देशाच्या राजाचा, जरासंधाचा नाश करत होता. अशारितीने पृथ्वी त्या असुराच्या हातून भिमानी मुक्त केली होती. पहा काय आश्र्चर्य आहे कीं, कोणतेही शस्त्र हातात न घेता त्या वृकोदराने केवळ त्याच्या हातांने त्याचा वध केला. भिष्माच्या दबावाखाली आणि अंधकांच्या व वृश्नींच्या मवाळ धोरणांमुळें कौरव आता पर्यंत भिमाच्या हातून वाचले हे त्यांचे केवळ सद्भाग्य म्हणावे लागेल. एकाद्या जहरी सापासारखा तो त्याचे इतक्या वर्षाचे साठलेले वीष माझ्या मुलांवर सोडणार आहे. जसे इंद्र त्याची गदा घेऊन दानवांचा संहार करतो तसा हा पांडव माझ्या मुलांचा संहार त्याच्या लोखंडी गदेने करणार आहे. तसे पाहिले तर त्याला कोणत्याही शस्त्राची अथवा आयुधाची आवश्यकता नसते तो त्याच्या हातानेच शत्रूला मारू शकतो. आपल्या कडील सगळे ज्येष्ठ योद्धे, भिष्म, भारद्वजाचा पुत्र द्रोण, सरद्वताचा पुत्र कृप त्याची लढाऊ क्षमता चांगलीच जाणून आहेत. कुलिन क्षत्रिय युद्धभूमीवर मरणे श्रेयस्कर समजतात म्हणून ते त्या युद्धात सामील होणार आहेत. तशा मृत्यूमुळें लढवय्याला खरी सद्गती मिळते. पांडवांच्या हातून मरण्यात त्यांना विशेष संतोष वाटेल म्हणून ते कौरवांच्या बाजूने लढणार आहेत हे मी जाणतो. त्यात भिमाच्या हातून मरण्याचे विशेष आहे. दैव नेहमीच सर्वशक्तीमान असते. विशेष करून पुरूषांच्या बाबत ते जास्त योग्य समजले जाते. त्याप्रमाणे

पंडुची मुलं त्या युद्धात जिंकणार हे ठरलेले आहे तरी ते दुर्भाग्य पूर्ण युद्धा मी टाळू शकत नाही. माझी मुलं त्यांचे संचीत घेऊन ह्या युद्धात मरतील व स्वर्गात जातील, त्याना त्या प्रकारे सद्गती मिळेल असें मी समजतो. त्याला पंडुची मुलं कारणीभूत असतील. भिष्मासाठी पाडव आणि कौरव सारखेच प्रिय आहेत हे मी समजतो. त्याच प्रमाणे द्रोण आणि कृप त्यांचे गुरू आणि शिक्षक सुद्धा त्या कारणाने युद्धात जाणार आहेत. मी त्यांना त्याबाबत कांहीं विशेष मदत करू शकत नाही. आपल्या रिवाजानुसार जे प्राचीन काळापासून प्रथेत आहेत, क्षत्रियाला युद्धातच मृत्यू आला पाहिजे. तो मृत्यू अनेक पुण्यकर्म करूनही प्राप्त होत नाही असें आपल्यात समजले जाते. म्हणून युद्ध होत रहाणे गरजेचे आहे. अशा युद्धामुळें बर्याच क्षत्रियांना स्वर्गात जाण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे. विदूर जे फार पूर्वी मला बोलला होता ते प्रत्यक्षात घडणार असें आता मला वाटू लागले आहे. अरे संजया मला आता असें वाटू लागले आहे कीं, शहाणपणा असल्याने सगळी संकट टाळता येत नाहीत. उलटपक्षी मला असें वाटते की, मोठ्या आपत्ती पुढे शहाणपणा कांहीं करू शकत नाही. मोठे मोठे ऋषी जे ह्या जगाचे लांबून निरीक्षण करत आहेत ते सुद्धा त्यातून सुटलेले नाहीत मग माझी काय गत असणार"? "मला माझ्या वासना आहेत ज्या माझ्या मुलांभोवती, नातेवाईकां भोवती, सत्तेभोवती, बायकांभोवती, राज्याभोवती गुंतलेल्या आहेत, अशात माझी काय अवस्था होणार ते समजू शकतो. मला चौफेर फक्त सर्वनाश दिसत आहे. ती द्याताची खेळी ह्या सगळयांपाठी आहे हे आता माझ्या लक्षात येत आहे. अरेरे संजया, दुर्योधनाच्या एका छोट्या लोभाची किती मोठी किंमत आता कुरु घराला मोजावी लागत आहे पहा. आता त्या कालगतीपासून माझी सुटका होणार नाही हेसुद्धा मला स्पष्ट दिसत आहे. अरे माझ्या मित्रा संजया, आता मी कोठे जाऊ? मला कांहीं सुचत नाही. मला माझ्या कुटूंबातील सुना लेकींच्या आर्त कींकाळया आत्ताच ऐकू यायला लागल्या आहेत. माझे पुत्र मेल्याच्या वार्ती माझ्या कानांत जोरांने घुसत आहेत असें वाटते. वृकोदर साक्षात यम होऊन माझ्या मुलांचा संहार करत असल्याचे मला आत्ताच जाणवू लागले आहे. त्यापेक्षा मला त्या आधी मृत्यू कां येत नाही? भिम व त्याच्या बरोबर इतर त्याचे बंधू माझ्या पुत्रांच्या खाडोळया करत असल्याचे मला पहावे लागणार ह्या विचाराने मी अस्वस्थ होत आहे, त्यापेक्षा दुसरे मी कांहीं करू शकत नाही, एक राजा असून अशी माझी गत झाली आहे, अहो दुर्भाग्य".

यान संधी पर्व भाग एकावन्नावा संपला.

# यान संधी पर्व

## भाग बावन्नावा

धृतराष्ट्र पुढे बोलतो, "जो कधी खोटे बोलत नाही, ज्याच्यासाठी धनंजय लढत आहे त्याला जगाची सत्ता मिळावयाला कांहींच हरकत नाही. मी पहातो आहे कीं, असा एकही योद्धा नाही जो किर्तीबरोबर मुकाबला करू शकेल. त्याच्या विविध प्रकारच्या बाणांपुढे कोणता योद्धा उभा राहू शकतो? आपल्यातील द्रोण आणि कृप त्यांच्याशिवाय इतरांशी लढणार आहेत नाहीतर ते युद्धा कसें रंगले असते कोणी सांगू शकत नाही. फक्त कर्ण त्यांच्याशी लढण्याच्या गोष्टी करत असला तरी तो एकटा काय करणार त्यांच्यापुढे? त्यामुळें मला वाटून राहिले आहे कि, मला ह्या युद्धात यश मिळण्याची शक्यता नाही. हा प्रतिष्ठेचा प्रश्न झाला आहे, त्यामुळें पांडव त्यांच्या राज्यासाठी लढणार व ते घेणार ह्यात संशय नाही. द्रोण आणि कर्ण जर मेले तरच हे युद्ध थांबेल एरवी नाही, हे सुद्धा मी समजलो आहे. द्रोणाला दृष्टद्युम्न मारणार हे भाकीत आहे तेव्हां तो त्यांना मारणार हे सुद्धा निश्चित. पांडवांना युद्धात मृत्यू न येण्याचा आशिर्वाद आहे त्यामुळें अर्जुन कर्णाकडून मारला जाण्याची शक्यता नाही परंतु, धनंजय त्याला मारणार असें कृष्ण सांगतो म्हणजे ते होणार आहे हे मला मान्य केले पाहिजे. फक्त त्यांच्या मृत्यूनेच पांडवांचा राग शांत होणार आहे. किती मूर्ख आहे माझा मुलगा मला त्याला आवरता येत नाही, काय माझे दुर्दैव आहे पहा. फाल्गुनी सदैव अजिंक्य असतो हे माहीत असूनही त्याला आव्हान तो मूर्ख राधेय करत आहे व माझा मूर्ख मुलगा त्याचे ऐकत आहे. काय म्हणावे ह्या दुर्भाग्याला. अर्जुनाच्या शौर्याच्या अनेक कथा सर्वश्रूत आहेत तरी सुयोधन ते समजत नाही हे केवळ दुर्बुद्धीचे लक्षण नाही तर काय समजावे. मी असा अंध आहे त्यामुळें मी नेहमीच बेभस असतो. त्याचा गैरफायदा ते घेत आहेत. समझौता करून कुरु घराण्याची ताकद वाढवून पुढे जाण्याचे त्याला समजत नाही. केवळ मत्सर, द्वेष एवढेच त्याच्या मनात आहे व ते मी काढून टाकू शकत नाही. येथे तर कृष्णसुद्धा त्याला मदत करणार आहे, त्याचा सारथी बनून, आमच्याकडे त्या तोलामोलाचे कोणी नाही जे त्यांच्याशी लढतील. भिष्म, द्रोण आणि कृप स्पष्टपणे सांगतात कीं, ते पांडवांशी लढणार नाहीत, ते इतर योद्ध्यांशी लढतील. ह्याचा अर्थ कौरवांची हार निश्चित आहे. हे दुर्योधनाचे मूर्ख सवंगडी समजून घेत नाहीत. किर्तीचे बाण अचुक असतात त्यांच्या लक्ष्याचा नाश खात्रीने होतो. मला त्याच्या गांडीवातून निघालेल्या बाणांचा आवाज जाणवत आहे व मला त्यामुळें फार घबराट होत आहे. त्याच्या बाणांच्या वर्षावामुळें माझे सैन्य इतस्ततः पळत आहे असें मला जाणवते, जरी अजून युद्ध सुरू झालेले नाही, मग जेव्हां प्रत्यक्ष युद्ध प्रारंभ होईल तेव्हां काय होईल त्याची नुसती कल्पना

सुद्धा मला बेचैन करत आहे. अरे संजया हल्ली मला सारखे अशुभ लक्षणाचे अनुभव येत आहेत त्याचा अर्थ काय ते तू समजतोस नां? मला त्यातून कोणीही वाचवू शकणार नाही अरे संजया".

यान संधी पर्व भाग बावन्नावा संपला.

# यान संधी पर्व

## भाग त्रेपन्नावा

धृतराष्ट्र पुढे बोलत आहे, "सामर्थ्यवान पंडुची मुलं आणि त्यांचे साथीदार सगळे वाटेल तो त्याग करण्याच्या उद्देशाने युद्धात उतरत आहेत असें मी समजतो. तू मला माझ्या बलाढ्य शत्रूंबद्दल सांगत होतास. त्यात पांचाल, केकया, मत्स्य, आणि मगध आहेत. त्याशिवाय तो जगन्नाथ कृष्ण पांडवांना जिंकवण्यासाठी आतूर आहे. सात्यकी बद्दल बोलावयाचे तर, त्यांने अर्जुनाकडून सगळी आयुध विद्या क्षणात आत्मसात केली असेल. तो सिनीवंशाचा मर्द युद्धभूमीवर उभा असेल तर कौरवांना ते अवघड जाणार आहे. तो आमच्या फौजांवर तुफान वेगांने बाणांचा वर्षाव करणार आहे. पांचालांचा सुपुत्र दृष्टद्युम्न आमच्या द्रोणांवर चाल करून जाणार आहे. मला त्या सगळ्या गोष्टींचे भय वाटते. युधिष्ठीराचा राग, भिमाचा क्रोध, अर्जुनाचा संताप मला खात आहेत. मला रडू येत आहे, संजया. तो पंडुचा मोठा मुलगा, युधिष्ठीर देखणा, बलवान, संयमी, बुद्धीमान, पुण्यवान, ब्राह्मणांचा प्रिय, दूर धोरणी, ज्याने चांगले साथीदार मिळवले आहेत, जो चांगले निर्णय घेतो असा असून शिवाय प्रेमळ, दयाळू, दानी, माणूसकी असलेला, कधीही विचलित न होणारा, महारथी, नम्र, मर्यादा जाणणारा अशा बरोबर माझे पुत्र काय लढणार"?

तो मूर्ख मुलगा जसे पतंग ज्योतीकडे धावतात तसा पांडवांशी दोन हात करण्यासाठी उतावीळ झाला आहे जणू त्याला मृत्यूची हाव पडली आहे. मीच चुकलो संजया, मी हे सगळे तेव्हांच थाबवायला पाहिजे होते जेव्हां विदूराने मला सावध करण्याचा पर्यत्न केला होता. कोणीही परत येणार नाही त्या युद्धभूमीवरून. म्हणून मी समजतो कीं, हे युद्ध होता कामा नये. तुलासुद्धा माझा निर्णय योग्य वाटतो नां"? असा निर्णय घेतला गेला तर माझ्या मनाला शांती लाभेल. सगळयांचे त्यात भले होणार आहे. मला खात्री आहे जर प्रेमळ युधिष्ठीराला समजले कीं मी दुःखी आहे तर त्याला ते आवडणार नाही. त्याला वाटते कीं, मीच ह्या सगळ्या परिस्थितीला जबाबदार आहे.

यान संधी पर्व भाग त्रेपन्नावा संपला.

# यान संधी पर्व

## भाग चौपन्नावा

संजय बोलतो, "तुमचे बोलणे बरोबर वाटते कारण जर युद्ध झाले तर सव्यसांचीच्या गांडीवामुळें असंख्य क्षत्रिय मारले जाणार आहेत. ते सगळे जरी खरे असले तरी तुम्ही नेहमी तुमच्या मुलाच्याच मनाप्रमाणे निर्णय घेत असता मग हे कसे शक्य होईल? सुरुवातीपासून आपण पांडवांचा अपमान करण्यात मदत केली आणि आता जेव्हां परिस्थिती हाता बाहेर जात आहे हे समजले तेव्हां शहाणपण सुचते, त्याला काय अर्थ आहे? आपण नेहमी पंडुची मुलं आणि तुमची मुलं ह्यात भेद करण्याचे धोरण अवलंबले त्यामुळे ही परिस्थिती उद्भवली आहे. जेव्हां पांडव हरले व वनवासात जात होते तेव्हां तुम्ही लहान मुलासारखे आनंद झाल्यागत हसत होता. ते सगळयांनी पाहिले आहे. जणूकाय तुम्हाला पांडवांच्या वनवासात जाण्याने संतोष झाला आहे. आणि आता रडून काय उपयोग? तुम्ही ओरडत होता कीं, "मजा आली, जे हवे होते ते झाले", म्हणजे तुम्ही दुर्योधनाच्या त्या द्युतातील यशामुळें आनंदीत झाला होता म्हणजे तुम्ही त्या खेळात सहभागी होता हे सगळयांना समजले आहे त्यामुळें आताच्या तुमच्या रडण्यावर कोण विश्र्वास ठेवील? जेव्हां पांडवांचा अपमान होत होता त्या सभेत तेव्हां तुम्ही गप्प कां होता, तुम्ही त्याला कां अटकाव केला नाही? त्याचा हा परिणामन आहे तेव्हां आता रडण्यात कांही अर्थ नाही. कुरु घराण्याच्या मालमत्तेत जे जंगल आहे तो तुमच्या घराण्याचा भाग आहे. परंतु, तुम्ही त्यांनी कमावलेले सगळे पृथ्वीचे राज्य त्यांना फसवून जिंकले तरी ते कांहीं बोलले नाहीत. तुम्ही असें समजता कीं, ते तुमचे झाले त्या द्युतामुळें. जेव्हां तुमच्या मुलांना गंधर्वानी पकडले व पाताळात त्यांना ते गाडणार होते तेव्हां पांडवांनी त्यांना वाचवले तरी तुम्ही पांडवांना बोलावून त्यांचा भाग त्याना देण्याचा चांगुलपणा दाखवला नाही. पांडव वनात जात असतांना आपण जोरजोराने आनंद झाल्यासारखे हसत होता. आणि आता काय शहाणपण सुचत आहे. हे शहाणपण तेव्हां सुचले असते तर बरे झाले असते. आता युद्धाची वेळ आली तेव्हां तुम्हाला ते फाल्गुनाचे शौर्य, त्याचे गांडीव, कृष्णाचे सुदर्शन चक्र दिसू लागले त्याचा काय उपयोग. आता तुम्हाला भिमाच्या ताकदीची आठवण आली, अर्जुनाच्या गांडीवाची आठवण आली ती तेव्हां कां नाही आली"? जेव्हां सगळे नष्ट होणार हे समजले तेव्हां ह्या सगळया गोष्टी आठवून काय उपयोग. तुम्ही पंडुची मुलं व तुमची मपलं त्यात भेद केला तेव्हांच हे सगळे होणार हे ठरले होते. कुरु घराचे प्रमुख म्हणून तुम्ही कधी वागलाच नाहीत मग आता कशाला चिंता करता. पांचाल, सल्व, सुरसेना अशा सगळयांनी आपल्याला खंडणी देण्याचे साफ नाकारले ते आता पांडवांना सामील झाले आहेत. त्यांचा आधार

नेहमीच पांडवांना होता. ते तुमच्या मुलांच्या नेहमीच विरोधात होते. पांडव कधीच तुमच्या मुलांविरोधात नव्हते. ते सदैव सलोखाच करत होते, त्यांच्या मातेची तशीच त्यांना शिकवण होती. म्हणून आता रडण्यात कांहीं अर्थ नाही. हे घडणार असें मी आणि विदूर सतत सांगत आलो आहेत पण तुम्ही त्याकडे सतत दुर्लक्ष केले आहे. तुमचे हे वागणे आता कांहीं उपयोगाचे नाही.

यान संधी पर्व भाग चौपन्नावा संपला.

## यान संधी पर्व

## भाग पंचावन्नावा

दुर्योधन आता बोलू लागला, "अहो राजे धृतराष्ट्र, उगाचच चिंता करण्याचे कांहीं कारण नाही. आम्ही शत्रूचा पराजय करण्यात सक्षम आहोत, त्याबद्दल विनाकारण काळजी करू नका. असें पहा जेव्हां पार्थ वनवासात गेला होता तेव्हां त्यांना भेटण्यासाठी मधूला मारणारा त्याचा मावस भाऊ मोठे सैन्य घेऊन त्यांना भेटण्यास गेला होता. त्या बरोबर त्यांना भेटण्यासाठी केकय, दृष्टकेतू, दृष्टद्युम्न त्याच्या लष्कराबरोबर आले होते. ते सगळे महाबली योद्धे इंद्रप्रस्थाच्या पासून फार लांब नव्हते. तेथे ते तुम्हाला व आम्हाला दोष देत होते. ते सगळे युधिष्ठीराला सांत्वनपर सांगत होते. ते तुम्हाला व आम्हाला ठार मारण्याच्या गोष्टी करत होते. ते समजल्यावर भिष्म, द्रोण आणि कृपांना मी बोललो जेव्हां ते भ्यालेले दिसत होते. त्याना वाटत होते कीं, खरोखरच कुरुवंशाला धोका आहे. तेव्हां मी त्यांना सांगितले कीं, पांडवांना व त्यांच्या सगळया दोस्तांना आमचा विध्वंश करण्याची इच्छा आहे त्यात विदूर व धृतराष्ट्र सोडून तुम्ही सगळे अहात. विशेष म्हणजे कृष्णालासुद्धा कौरवांचा नाश करावयाचा आहे. आमचा नाश केल्यानंतर कृष्ण युधिष्ठीराला ह्या सगळया राज्याचा अधिपती घोषित करणार आहे. ह्या राज्यातील प्रजा आमच्या कारभाराला कंटाळली आहे असें ते सांगत असतात. ते सांगतात कीं, आम्हाला कोणी सच्चा मित्र उरलेला नाही. आदिकाळापासून असें समजले जाते कीं, कमजोर पक्ष नेहमी समझौता करत असतो. बलवान पक्ष आपले म्हणणे अमलात आणत असतो. मला ह्याचे दुःख होते कीं, आमचे अंध पिता स्वताला कमजोर समजत आहेत व शांती कराराच्या बाजूने आपला कल देत आहेत. त्यांना वाटते हे सगळे माझ्या मुळें घडले आहे. म्हणून ते मला सतत दोष देत आहेत. मला मूर्खसुद्धा वेळोवेळी बोलत आहेत. तुम्ही समजता कीं, माझी इतर भावंड केवळ मला खूष करण्यासाठी पांडवांना विरोध करत आहेत. मला माहीत आहे कीं, ते महारथी योद्धे पांडव माझ्यामुळें सगळया कौरवांचा नाश करणार आहेत. त्याबरोबर कौरवांना पांडवांच्या विरुद्ध सल्ला देणारे सगळे तुमचे सल्लागारसुद्धा ते ठार मारणार आहेत हे सगळे जाणतात. भिष्म,द्रोण आणि त्यांचा मुलगा अश्वत्थामा, कृप असें सगळे मला शांतता करार करण्याचा आग्रह करत आहेत. परंतु, ज्यावेळी पांडव वनवासात गेले तेव्हां तेंच सगळे मला सांगत होते, तू घाबरू नकोस, तुझ्या शत्रूंपासून तुला कांहीं धोका होणार नाही, आणि आता असें बोलतात म्हणजे काय? ते सांगत होते, आपल्यापैकी एक एक सुद्धा पृथ्वीवरील सगळया राजांना भारी आहोत. येऊ देत पांडव युद्धासाठी असें हेंच सगळे मला आश्वासन देत होते त्याचे काय झाले"? आपले पितामह भिष्म त्यांच्या काळात

सगळया पृथ्वीवरील राजांना पुरून उरले होते ते सगळे जाणतात. त्यानंतर ते सगळे राजे देवव्रताला शरण आले होते. आजसुद्धा ते तितकेच सक्षम आहेत हे आपम सगळे जाणतो म्हणून शत्रूला घाबरण्याचे कांहीं कारण नाही".

दुर्योधन पुढे त्याचे समर्थन चालू ठेवतो. तो पुढे सांगतो, "त्यावेळी आपण सगळयानी एक निर्णय घेतला होता कीं, तूर्त सगळी पृथ्वी शत्रूच्या ताब्यात आहे, तरी ते आपल्याला कुरुंना हरवू शकणार नाहीत. पंडुची मुलं त्यांच्या दोस्तांबरोबर असें फार शक्तीमान आहेत. आज परिस्थिती अशी आहे कीं, पृथ्वीचे राज्य माझ्या ताब्यात आहे. मी ज्या राजांना एकत्र केले आहे ते सगळे माझ्याच विचारांचे आहेत. लक्षात असू द्या कीं, हे माझे दोस्त राजे माझ्यासाठी अगदी समुद्रात किंवा आगीतसुद्धा उडी घेण्यासाठी तयार आहेत. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल खात्र असावी. तुमची ही सगळी बडबड ऐकून ते तुम्हाला हसत आहेत. तुमचे शत्रूची स्तुती करणे त्यांना हास्यास्पद वाटत आहे. ते सगळे पांडवांशी लढण्यासाठी तयार असतांना आपल्याला काळजी कशाची आहे तेंच मला समजत नाही. म्हणून आपण अशाप्रकारे घाबरून कोणताही निर्णय घेऊ नका. अहो राजे तो इंद्रसुद्धा दोन वे विचार करेल माझ्या सैन्याशी मुकाबला करण्या आधी इतकी आपली सेना तयार आहे. त्या पांडवांना कां घाबरता. साक्षात ब्रह्मसुद्धा आम्हाला हरवू शकणार नाही हे लक्षात घ्या. तुम्ही पाहिले आहे कीं, युधिष्ठीराने अखेरीस फक्त पांच गांव मागितली होती त्यावरूनि त्याला पुरते माहीत आहे कीं, तो व त्याची भावंडं त्यांच्या सगळया दोस्तांसह सुद्धा कौरवांना हरवू शकत नाहीत. म्हणून ते त्यांच्या राज्याची मागणी सोडून फक्त पांच गांव मागत आहेत. त्यातून सगळे स्पष्ट होत असतांना तुम्ही उगाचच कां त्या भिकार्याना घाबरता"? अहो माझे पिता, तुम्हाला वाटते तो वृकोदर मला ठार मारेल, ती तुमची भिती अस्थाई आहे. आपल्याला माझ्या कुवतीची कल्पना कोठे आहे? गदायुद्धात माझ्यासारखा महाबली दुसरा नाही सगळया पृथ्वीवर. अजून पर्यंत कोणी मला गदायुद्धात हरवलेले नाही. भविष्यातसुद्धा कोणी मला पराजित करू शकणार नाही. मी माझ्या गुरूच्या घरात राहून ती विद्या आत्मसात केली आहे. म्हणून मला भिमाची किंवा इतर कोणाची भिती वाटत नाही. मी जेव्हां माझ्या गुरू शंकरशनाचे आशिर्वाद घेतले तेव्हांच ते बोलले आहेत कीं मला तोडीसतोड कोणी नाही. अगदी भिमसुद्धा माझ्यापुढे टिकणार नाही. भिम माझ्या गदेचे फटके सहन करू शकणार नाही. जर मी भिमावर रगावून चढाई केली तर तो टिकणार नाही म्हणून त्याची भिती नका धरू. मी त्याला पहिल्या फटक्यातच यमाच्या घरी पाठवून देईन. अहो राजे, मी वृकोदराला त्याच्या लोखंडी गदेसह माझ्या समोर उभा पहावयाचा आहे. त्या पंडुच्या मुलाला मी एका फटक्यात ठार मारमार आहे.

त्याची सगळी हुशारी इतरत्र, माझ्यापुढे नाही चालणार. माझ्या गदेच्या फटक्याने मी त्याचे तुकडेतुकडे करून टाकणार आहे. अर्जुन आणि कृष्ण दोधेही माझ्या ताकदीचा मान ठेवणारे आहेत. दुर्योधनाची बरोबरी करणारा कोणी योद्धा सार्या पृथ्वीतलावर नाही हे ते पुरते जाणतात. म्हणून तुमच्या मनात जी त्या भिमाबद्दल भिती आहे ती व्यर्थ आहे. म्हणून उगाचच कष्टी होऊ नका. त्याला मारल्यानंतर मी त्यांचे इतर अनेक योद्धे ठार मारणार आहे. अर्जुनाला मी फेकून देणार आहे भिमानंतर. भिष्म, द्रोण, कृप, कर्ण, भुरिश्रव, सल्य, प्रागज्योतिशचा राजा, सिंदचा राजा जयद्रथ असें सगळे आपले रथी महारथी असतांना आपण कां घाबरता? ते सगळे एकेकटे त्या पांडवांना हरवण्यात सक्षम आहेत मग काळजी कशाची करतां"? आम्ही एकत्र असून एकत्रपणे आम्ही त्या अर्जुनाला यमाकडे पाठवून देऊ शकू ह्याबद्दल विश्वास असू द्या. भिष्म, द्रोण आणि कृपांनी सोडलेले अगणित बाण त्याला घेतरील व त्याला यमाकडे पाठवतील. आमचे आजोबा जे शंतनुचे सुपुत्र आहे ते एकटे त्याला भारी आहेत. गंगापुत्र भिष्मांना मृत्यू नाही जोवर ते मरू इच्छित नाहीत. हे आपण जाणता. द्रोण तसेंच अद्वितीय आहेत ज्यांचा जन्म पाम्यात झाला आहे. भारद्वाजांमे ते पुत्र आहेत. कृपसुद्धा महान योद्धे आहेत. गौतमाच्या पोटी ते जन्मले आहेत. ते असें सगळे, मृत्यूच्या पलिकडील आहेत. त्याशिवाय द्रोणांचा पुत्र अश्वत्थामा आहेत आपल्या बरोबर. आपल्याकडे असे एक एक महारथी आहेत जे शक्राला सुद्धा आटोपता येणार नाहीत. उगाच काळजी करून नका. अंतिम विजय आपलाच आहे. ह्या वेळी मी त्या माझ्या शत्रूंना वनवासात किंवा अज्ञातवासात पाठवणार नाही थेट यमाकडे पाठवणार आहे. म्हणजे हा प्रश्न कायमचाच निकालात काढून टाकणार आहे. अर्जुन माझ्या योद्ध्यांकडे साधे पहाणेसुद्धा करू शकणार नाही, लढणे दूरचे. आमचे योद्धे कर्णासारखे अर्जुनाचा नाश करण्याची संधी शोधत आहेत, तरी तुम्ही उगाचच काळजी करू नका. माझ्या दृष्टीने ह्या युद्धात भिण्यासारखे कांहींच नाही. माझा मित्र कर्ण एकटा भिष्म, द्रोण आणि कृपांच्या एकत्र ताकदीसारखा आहे हे ध्यानात घ्या. जमदाग्नीच्या रामानेंच त्याला असें सांगितले आहे. कर्णाच्या अंगावर जन्मताच दोन कर्णभूषणं होती ती इंद्राने त्याच्या पत्नीसाठी, सांचीसाठी कर्णाकडे मागितली व ती त्यांने त्याच्या दानशूर स्वभावाप्रमाणें त्याला दिली त्यावेळी शक्र त्याला एक असा बाण देतो कीं त्यांने तो धनंजयाला ठार मारू शकेल. त्यामुळें अर्जुनाची भिती बाळगण्याची माझ्यामते कांहींच आवश्यकता नाही. त्यासाठी माझे यश निश्चित आहे, जणूकाय विजय मिळाल्यात जमा आहे असें समजा. समसप्तक योद्ध्यानी असा निग्रह केला आहे कीं, एकतर आम्ही अर्जुनाला मारू नाहीतर तो आम्हाला मारील. त्याशिवाय इतर अनेक योद्धे आपल्यात आहेत जे सव्यसाचीला ठार मारण्याची स्वप्न पहात आहेत. त्यासाठी

पांडवांची भिती बाळगण्याची अजिबात गरज नाही. जेव्हां मी भिमाला ठार मारीन, त्यानंतर कोण आहे आमच्याशी लढण्यास"?

पांडवांची शक्ती त्यांच्या शिवाय दृष्टद्युम्न, सत्यकी ह्यांच्या पुरती मर्यादित आहे. त्या विरुद्ध आपल्याकडे कितीतरी महारथी आहेत. त्यात भिष्म,द्रोण व कृपांशिवाय वल्हिक, सल्य, प्रागज्योतिष, जयद्रथ असें कितीतरी आहेत. अवंतीचे विंद आणि अनुविंद, तुझा पुत्र दुःशासन, दुर्मुख, श्रुतयू, चित्रसेन, पुरुमित्र, विविंसती, शाल, भुरिश्वर, विकर्ण, आणि अक्षौहिनी सैन्य आहे,त्यात कितीतरी मोठे योद्धे आहेत. बृहस्पती सांगतात, जर शत्रूपक्षाचे सैन्य एकतृतियांश असेल तर लढाई जरूर करावी. त्याशिवाय मला माहीत आहे कीं, ह्या शत्रूत अनेक दोष आहेत व त्या उलट आपल्या सैन्यात कांहींच दोष नाही. आपले सैन्य गुणसंपन्न आहे. अशाप्रकारे आत्मविश्वास दाखवणारे भाषण केल्यानंतर तो कुरु राजा संजयाकडे पहात त्याला पांडवांच्या तयारी बद्दल विचारतो.

यान संधी पर्व भाग पंचावन्नावा संपला.

# यान संधी पर्व

## भाग छप्पन्नावा

संजयाला दुर्योधन विचारतो, "सात अक्षैहिणी सैन्य जमवल्यानंतर युधिष्ठीर युद्धाच्या दृष्टीने आणखीन कोणती तयारी करत आहे ते मला सांग".

संजय सागू लागतो, युधिष्ठीर भावी युद्धाच्या तयारीने फार संतुष्ट दिसला. त्याच प्रमाणे भिम आणि अर्जुनसुद्धा समाधाना दिसला. ते त्यांना मिळवलेल्या मंत्रानी भारावलेल्या बाणांचा उपयोग मोठ्या प्रमाणात ह्या युद्धात करणार आहेत असें दिसत होते. त्याच्याकडे इंद्राचा विलक्षण रथ आहे त्याचा उपयोग ह्या लढाईत होणार आहे. स्वर्गातून आणलेली चिलखतं व इतर शिरस्राण ते वापरणार आहेत त्यामुळें ते केव्हाही अदृश्य होऊन लढू शकतील. तशा तयारीमुळें त्यांचा उत्साह फार वाढलेला आहे. त्यांना यशाची पूर्ण खात्री आहे. त्याशिवाय युधिष्ठीर मला बोलला कीं, जर युद्ध झाले तर भिष्म, द्रोण आणि कृप पांडवांवर मारा करणार नाहीत असें वचन त्यांनी आम्हाला दिले आहे त्यामुळें ते युद्धात असूनही नसल्यासारखेच आहे.

दुर्योधन खवचटपणे संजयाला बोलतो, मला ठाऊक आहे कीं, तुम्ही सगळे त्यांच्या बाजूने अहात व म्हणून मला खच्ची करण्याचा सतत प्रयत्न करत असता. तरीसुद्धा मला सांग अर्जुनाच्या ध्वजाबद्दल.

संजय सांगतो, अहो राजे, स्वर्गातील कारागिराने तयार केलेले रथ त्याच्याकडे आहे. तश्त्री आणि भौमन अशा नावाजलेल्या तज्ज्ञानी तो रथ बनवलेला आहे. त्या कामात त्या कारागिरांना इंद्र आणि धत्री मदत करत होते. त्यात अनेक क्लुत्त्या योजलेल्या आहेत.

दुर्योधन पुन्हा विचारतो, तुला त्यांचे भारी कौतुक आहे पण मला सांग त्याच्या रथाला कोणते घोडे आहेत? त्यांच्या रथावरील ध्वज कसे आहेत"?

संजय सांगतो, त्यात असलेल्या क्लुत्त्यामुळें त्यावरील ध्वज लहान मोठा होऊ शकतो. ध्वजावर हनुम्ताची प्रतिमा आहे व त्याबरोबर त्या ध्वाजात अनेक विलक्षण सक्तींचा संचार होत असतो. त्या भयंकर शक्ती अर्जुनाच्या आदेशानुसार त्या ध्वजाबाहेर येऊन शत्रूपक्षात गोंधळ करू शकतात. तो ध्वज एक योजने एवढा लांब रुंद होऊ शकतो. त्या रथाच्या वाटेत कांहीं आले तरी तो रथ त्यावरून जाऊ शकतो. त्याला कोणी अडवू शकत नाही. एवढे सगळे असून तो रथ हवेसारखा हलका आहे. त्या ध्वजाला कोणी मोडू शकत नाही. त्या रथाला शंभर घोडे खेचतात.

वार्याच्या वेगांनी ते धावत असतात. त्या रथाला असा आशिर्वाद आहे कीं, त्याचे घोडे मारले जाऊ शकणार नाहीत. युधिष्ठीराच्या रथाला सुद्धा मोठे घोडे आहेत त्यांचा रंग शुभ्र आहे. भिमाच्या रथाचे घोडे वार्याच्या वेगांने धावतात. त्यांच्यात सप्तर्षींचे तेज आहे. ते रथ फाल्गुनीने त्यांना दिले आहेत. सहदेवाचा रथ सुद्धा तसाच आहे. नकूलाचा रथ तसाच आहे. त्या सगळयांचे रथ फार वेगांने जाणारे आहेत. ते सगळे त्यांना इंद्राने भेट म्हणून दिलेले आहेत जेव्हां धनंजय स्वर्गात शिकत होता व साक्षात सांचीकडे रहात होता. त्याच्या सुभद्रा व द्रौपदी ह्या बायकांची मुलसुद्धा तशाच प्रकारच्या उत्तम रथातून लढणार आहेत.

यान संधी पर्व भाग छप्पन्नावा संपला.

# यान संधी पर्व

## भाग सत्तावन्नावा

ते वर्णन ऐकून धृतराष्ट्र बोलतो, "त्यातील कोण पांडवांवरील प्रेमाने सामील झाले आहेत व कोण लढण्यासाठी आले आहेत"?

संजय सांगतो, मी कृष्णाला पाहिले, जो अंधकांचा शिरोमणी आहे. वृश्नीसुद्धा आले आहेत. त्यांत चेतिकन, सत्यकी युयुधन असे योद्धे जमले आहेत. त्यांची वेगळी प्रत्येकी अक्षौहिणी सेना आहे. द्रुपद, त्याचे सैन्य घेऊन आला आहे. त्याचा मुलगा सत्यजित आहे. त्याशिवाय दृष्टद्युम्न आहेच. शिखंडीसुद्धा मी पाहिला तेथे. त्यांच्या सेना सर्व शस्त्रसज्ज आहेत. राजा विराट त्याच्या लष्करासह आला आहे. त्याचे पुत्र शंख आणि उत्तर आहेत. त्याशिवाय सूर्यदत्त, मदीराक्ष त्यांच्या सैन्यानिशी तयार आहेत. जरासंधाचा मुलगा सहदेव त्यांच्या कडे आहे. छेड्डीचा राजपुत्र दृश्तकेतू तेथे आलेले मी पाहिले. केकयांचे पांच मुलगे सामील झालेले आहेत. त्यांच्या अक्षौहिणी सेना त्यांच्या बरोबर आलेल्या आहेत. तेवढे मी पाहिले जे सांगितले. ते सगळे धृतराष्ट्राच्या फौजांना भिडणार आहेत. त्यांच्या दृष्टद्युम्न आहे ज्याला देवांच्या गंधर्वांच्या, असुरांच्या आणि माणसांच्या युद्धांचा चांगला अभ्यास आहे. व जो यज्ञज आहे. भिष्मावर वार करण्यासाठी शिखंडीची नेमणूक करण्यात आली आहे. विराटाचे मत्स्य सैनिक युधिष्ठीराला मदत करणार आहेत. ते शिखंडीलासुद्धा मदत करणार आहेत. भिमसेन सगळया कौरवांचा आणि पूर्व व दक्षिणेकडाल राजांचा फडशा पाडण्यासाठी आहेत. अशी एकंदर रचना मला समजली. कर्णाचा फडशा पाडण्याचे काम अर्जुनाचे आहे. त्याशिवाय जयद्रथ, विकर्तन सुद्धा अर्जुन सांभाळणार आहे. इतर बरेच राजे व त्यांचे सैन्य ह्यांचा फडशा पाडण्याचे कामसुद्धा अर्जुनाला दिले आहे. केकयाचे पांच पुत्र धृतराष्ट्राचे सैन्य मारतील. त्यांना मालवाचे मदत करणार आहेत. त्रिगर्ताचे सैनिक लढणार आहेत पांडवांच्या बाजूनी. सुभद्रचा मुलगा दुर्योधन, दुःशासन, वृहद्बल, ह्यांच्याशी मुकाबला करणार आहे. द्रौपदीची मुलं दृष्टद्युम्नाला मदत करणार आहेत. जेव्हां दृष्टद्युम्न द्रोणांवर हल्ला करेल तेव्हां ते त्याला मदत करणार आहेत. चेकीतन त्याच्या रथाने सोमदत्तला भिडणार आहे. सत्यकी भोज राजा कृतवर्मन बरोबर लढणार आहे. सहदेव शकूनीला ठार मारणार आहे. सहदेव लुच्चा उलकाला मारणार आहे. त्याशिवाय सारस्वतांच्या टोळयांना भिडणार आहे. युधिष्ठीराने त्या सगळयांना त्यांची उद्दिष्टे आखून दिली आहेत असें मला समजले.

धृतराष्ट्र बोलतो, "अरे देवा, माझ्या एका मूर्ख मुलामुळें माझी सगळी मुलं मरणार आहेत. त्या द्युतामुळें सर्वनाश होणार आहे. मी समजतो कीं माझी मुलं आधीच मेली आहेत. तो भिम त्यांना जीवंत ठेवणार नाही. सगळे राजे गांडीवाच्या मार्यात नष्ट होणार आहेत, तो एक यज्ञ होणार ज्यात ते राजे बळी दिले जाणार आहेत. जसें ज्योतीकडे पतंग धावत जातात तसे ते मरण्यासाठी जाणार आहेत. मला असं वाटते त्यांची तयारी पाहून शत्रू पळून जाणार आहेत. मी त्यांना दुखवलं आहे. त्याची किमत मला द्यावी लागत आहे. पंडुची मुलं माझ्या सैन्याचा धुव्वा उडवणार ह्यात मला अजिबात शंका नाही. ते सगळे महारथी आहेत ज्यांच्या तोडीचे कोणी नाही. एकतर स्वर्गात जाऊन शिकून आला आहे व तेसुद्धा कुबेर, इंद्र, महादेव, वायूदेव अशांच्या कडून तशा योद्ध्याला माझ्या सैन्यात हरवेल असा कोणी नाही हे मला माहीत आहे. त्याशिवाय जे खरे मातबर आहेत, भिष्म, द्रोण आणि कृप ते पांडवांशी न लढण्याच्या मनस्थितीत आहेत म्हणजे ते असून नसल्या सारखेच आहे. रहाता राहिला एक कर्ण, त्याला अर्जुन केव्हांही जिंकेल कारण जरी त्यांने त्याच्या पित्याची तपस्या केली असली तरी ती द्वेष, मत्सर अशा विकृत प्रवृत्तीने भ्रष्ट झालेली आहे. त्यामुळें तो एक भ्रष्ट तपस्वी आहे असा कीं त्याला त्याचा जन्मदातासुद्धा दाद देणार नाही. दैवतांना पुजतांना पुजणाऱ्याची मनस्थिती किती निकोप आहे ते महत्वाचे असते. ज्या पुजार्याची मनस्थिती निकोप नाही त्याची पुजा व्यर्थ जाते. एकंदर असें दिसते कीं, कौरवांचे कांहीं खरे नाही! अशात त्यांनां कृष्णाचा आधार आहे. अशांना जिंकण्याच्या वल्गना फक्त एक मूर्खच मारू शकतो. त्याशिवाय इतर महारथी आहेत त्यांच्याशी लढण्याची क्षमता कौरवांत आहे कां"? त्यात उत्तमौज, युथमन्यू, क्षात्रदेव, विराटाचा मुलगा उत्तर, कासायस, छेड्डी, श्रींजय, प्रभद्रक असें कितीतरी आहेत ज्यांना मारणे आपल्या फौजांना कसे शक्य आहे? मी येथे रडत असतांना त्या मूर्खाचे मनसुबे युद्ध करण्याचे जोरात चालू आहेत, माझ्या रडण्याला कांहींच किंमत नाही असें दिसते. मग मी येथे काय करतोय"?

ते ऐकून दुर्योधन बोलतो, पांडव आणि आम्ही एकाच कुळातील आहोत. आम्ही दोघे एकाच पृथ्वीवर रहात आहोत. मग असें तुम्ही कां समजता कीं, विजय फक्त पंडवांचाच होईल"? "आपले योद्धे ज्यात भिष्म, द्रोण, कृप, कर्ण, अश्र्वत्थामा, सोमदत्त, वल्हिक, जयद्रथ असें असतांना जे इंद्राला हरवू शकतात. यश आपल्याला नाहीच मिळणार असा सूर आप कां लावता ते समजत नाही. अहो बाबा, माझ्यावर विश्र्वास ठेवा, मी जमा केलेले हे सगळे पृथ्वीचे महारथी पांडवांना सहज हरवू शकतील. आमच्या योद्ध्यांच्या रथांच्या गराड्यात सापडलेले पांडव व त्यांचे योद्धे आमच्या बाणाच्या वर्षावामुळें हतबल होणारच त्याबद्दल मला तीळमात्र शंका नाही".

धृतराष्ट्र संजयाला बोलतो, "अरे संजया हा माझा मुलगा वेड लागल्यासारखा कांहींतरी बरळत आहे. तो युधिष्ठीराला हरवण्याच्या गोष्टी करत आहे. भिष्म पांडवांच्या शौर्याची चांगलीच जाण ठेवून वागत असतो. पांडव नुसते चांगले योद्धे आहेत एवढे नाही तर ते सात्त्विक प्रवृत्तीचे आहेत, ज्यामुळे युद्धाच्या देवतां त्यांना प्रसन्न आहेत जे माझ्या मुलांच्या बाबत नाही. अरे संजया मला पक्के ठाऊक आहे कीं, पांडवांना युद्ध नको तरी ते तयारी करत आहेत. म्हणून मला पुन्हा एकदा सांग त्यांच्या सैन्याच्या व्यवस्था कशा आहेत"?

संजय सांगतो, दृष्टद्युम्न पांडवाना युद्ध करण्यासाठी सांगत आहे कारण त्याला द्रोणाचार्यांना मारावयाचे आहे. त्याच्या जन्माचा तोंच उद्देश आहे. जो क्षत्रिय युद्धाला घाबरला तो कसला क्षत्रिय? त्यामुळें ते सगळे युद्धासाठी सज्ज आहेत. दृष्टद्युम्न सांगतो कीं, तो कौरवांच्या सगळया महारथींना पुरून उरेल कारण तो यज्ञज आहे व मरणारा नाही. त्याला थकवा माहीत नाही जो क्षत्रियांचा खरा शत्रू असतो. जसा मोठा मासा लहान मांसे गिळंकृत करतो तसे मी त्यांना खाऊन टाकेन. ते ऐकल्यावर त्याला युधिष्ठीर बोलले, पांचाल, पांडव तुझ्यावरच विसंबून आहेत. तुझ्या जोराने सगळ्या पांडवांना ह्या अरिष्टातून बाहेर काढ. तू क्षत्रिय धर्म चांगलाच जाणतोस. तू कौरवांचा निःपात करू शकतोस ह्याबद्दल मला पूर्ण विश्र्वास आहे. जेव्हां शत्रू आपल्या पुढे उभा राहिल तेव्हां तू जे करशिल ते योग्यच असेल. युद्धभूमीवर घाबरलेल्या क्षत्रियांना तुझा आधार असेल ते तुझ्याकडे पाहून लढत रहातील. युधिष्ठीराचे ते उत्तेजक उद्गार ऐकल्यावर तो दृष्टद्युम्न मला बोलला, अहो सुत, लवकर जा आणि दुर्योधनाला माझे आव्हान सांग. प्रतिपाचे वंशज, वल्हीक आणि शरद्वताचा मुलगा (द्रोण) ह्या सगळयांना माझे आव्हान सांग. त्यानंतर त्याने सगळयाच कौरवांकडील योद्ध्यांना आव्हान देण्यास सुरूवात केली. तो मला पुढे सांगतो कीं, पांडवांना देवांचे संरक्षण असल्याने ते मारले जाणार नाहीत. तुम्हाला मारण्यासाठी अर्जुनाची आवश्यकता नाही. मी एकटा पुरेसा आहे. असें आव्हान तो देतो. त्या आधीच त्यांचे राज्य त्यांना मिळणार आहे. सव्यसाची खूप मोठा आहे ह्या लोकांना मारण्यासाठी मी पुरेसा आहे. म्हणून युद्ध करण्याची चूक न करता बर्या बोलांने त्यांचे राज्य त्यांना परत करा असें तो पांचाल राजपुत्र सांगतो.

यान संधी पर्व भाग सत्तावन्नावा संपला.

# यान संधी पर्व

## भाग अठ्ठावन्नावा

धृतराष्ट्र बोलतो, युधिष्ठीर क्षत्रिय शक्तीचा असून त्याशिवाय ब्रह्मचर्य पाळणारा आहे. अशा सामर्थ्यवान पुरूषाबरोबर माझा अक्कलशून्य मुलगा दोन हात करण्याच्या गोष्टी करत आहे. हे माझे मोठे दुर्दैव आहे. मला ते अजिबात नको असें पुन्हा पुन्हा सांगत अइसतांना तरी तो त्या युद्धाचा आग्रह धरत आहे. मी त्याला परोपरीने सांगत आहे किं, भावंडांशी दुष्मनी धरणे चांगले नसते तरी त्याचे वळण बदलत नाही. घरच्यांशी वैर करणे कधीही श्रेयस्कर नसते. युद्ध कधीही आनंद देणारे नसते कारण त्यात मृत्यू हे अंतिम उद्दीष्ट असते. पांडवाचे मागणे रास्त आहे तेव्हां त्यांना त्यांचा भाग देऊन टाकणे हेंच सर्वांसाठी श्रेयस्कर आहे, तरी तो मला मानत नाही. त करणेच न्यायाला धरून आहे. तसे करून शांतता कुटूंबात नांदवणे हेंच सगळयांच्या भल्याचे आहे. ते पंडुचे पुत्र फार चांगले आहेत. ते न करता जर युद्ध केले तर त्यात सगळया कौरवांचा व त्यांच्या दोस्तांचा मला फक्त मृत्यू दिसत आहे. धृतराष्ट्र पुढे सांगतो, "दुर्योधन मात्र ते ऐकायला तयार नाही. मी हे युद्ध करण्या विरुद्ध आहे. तरी इतर काय विचार करतात ते पहावे लागेल. वल्हीक, भिष्म, द्रोण, अश्र्वत्थामा, संजय, सोमदत्त, सल्य, कृप, सत्यव्रत, पुरूमित्र, जय, भूरिश्र्वर ह्यांपैकी कोणीही हे युद्ध नको असेंच सांगत आहेत. ते तू त्या सगळयांचे कां मानत नाहीस"? ह्या योद्ध्यांच्या हिम्मतीवरच कौरवांची भिस्त आहे. म्हणून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे तू तुझा युद्धाचा आग्रह सोडून दे. मला माहीत आहे, तू युद्ध करण्याच्या गोष्टी करतोस कारण तुझे नाठाळ मित्र कर्ण आणि शकूनी, भाऊ दुःशासन तुला हुसकवत आहेत हे मला ठाऊक आहे".

दुर्योधन त्याला उत्तर देतो, मी पांडवांना आव्हान देतो, तुमच्या गटातील द्रोण, अश्र्वत्थामा, संजय, विकर्ण, कंवुज, कृप, वल्हीक, सत्यव्रत पुरुमित्र, भुरिश्र्वर व इतर जे कोणी असतील त्यांच्या मदतीशिवाय पांडवांना मी, कर्ण, दुःशासन सहजपणे पराजित करू. म्हणून त्या युद्धाच्या तयारीला लागा. तो यज्ञ सुरू करू. त्यात माझा रथ हे यज्ञवेदी होऊ दे. माझी तलवान लहान शिडी असेल, माझी गदा मोठी शिडी असेल. त्यावर आहुती देऊ. माझे चिलखत व जिरोटोप तो यज्ञ पहातील व त्यात युधिष्ठीराचा बळी चढवला जाणार आहे. माझ्या रथाचे घोडे पुरोहित होतील, माझे बाण कुस गवताचे काम करतील, आमची ख्याती यज्ञात घालावयाचे तूप असेल. अहो राजा, तो यज्ञ यमाच्या स्तुती करता केला जाणार आहे. अशा यज्ञात लागणारे सगळे आमच्यातून मिळेल. आमच्या शत्रूचा विनाश करून आम्ही यशस्वी होऊन येणार आहोत हे लक्षात

घ्या. आम्ही तिघे मी, कर्ण आणि दुश्शासन सगळ्या पांडवांना ठार मारून तो यज्ञ सिद्ध करणार आहोत. ते होणार कारण आम्ही पांडवांबरोबर समझौता कदापिही करणार नाही. त्यांना ठार मारणे हे एकमेव उद्दीष्ट माझ्यापुढे आहे. त्यांना मारून मग मी ह्या पृथ्वीचा राजा बनून राज्य करणार आहे. अहो माझे पुण्यवान पिता मला पांडवांबरोबर समझौता करण्यास सांगू नका, ते केवळ अशक्य आहे माझ्या करता. मी एकवेळ मृत्यूला मिठी मारीन पण त्या युधिष्ठीराला मिठी कदापिही मारणार नाही. एका सुईच्या अग्रा इतकी सुद्धा जमीन मी त्यांना सहजासहजी देणार नाही.

धृतराष्ट्र सांगतात, "मी ह्यापुढे माझ्या ह्या मुलाचा त्याग करत आहे कारण त्याचा विवेक भ्रष्ट झाला आहे. तरी मला त्याच्या भवितव्यामुळें दुःख होणार हे मी मान्य करतो. ते सगळे यमाच्या घरी जाण्याच्या तयारीत आहेत हे मी समजलो आहे. ते महायोद्धे ह्या विवेकशून्य मुलांना त्यांच्या आयुधांनी नष्ट करणार आहेत. भिमसेन त्या युद्धात अग्रणी असेल व माझे सैन्य कापून काढील. अरे दुर्योधना जेव्हां तू तुझे डोंगरा एवढे हत्ती युद्धभूमीत कोसळून पजलेले पाहशिल तेव्हां तुला माझे शब्द आठवतील. भिसेन जेव्हां तुझ्या सगळ्या रथांचा चुराडा करत असलेला पाहशिल तेव्हां तुला माझे शब्द आठवतील. शेवटी तो महाबली भिम तुला त्याच्या गदेने वार करून ठार मारील तेव्हां तुला माझे शब्द आठवतील. जेव्हां तू तुझे सैन्य भिमाच्या गदेखाली चिरडलेले पहाशिल तेव्हां तुला माझे शब्द आठवतील. पांडवांशी समझौता करण्यातच तुझे व आपल्या घराचे भले आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, असें सांगून तो पृथ्वीचा राजा संजयाकडे वळून बोलतो,

यान संधी पर्व भाग अठ्ठावन्नावा संपला.

## यान संधी पर्व

## भाग एकोण साठावा

धृतराष्ट्र संजयाला विचारतात, "अरे माझ्या बुद्धीमान मित्रा मला सांग वासुदेव आणि धनंजय काय बोलत होते? त्याच्या प्रतिक्रिया मी समजून घेऊ इच्छितो".

संजय त्यांना सांगतो, "मी ज्या परिस्थितीत त्यांना पाहिले ते व त्यानंतर काय बोलले तेसुद्धा सांगतो. मी खाली मान घालून माझ्या हातांना मागे घेऊन मी त्या आंतील कक्षात प्रवेश केला. माझा संयम पूर्ण होता. तेथे ते देव बसलेले होते. त्या दालनांत अभिमन्यू आणि आश्विन द्वय जात नाहीत असें ते दालन होते जेथे द्रौपदी, सुभद्रा आणि सत्यभामा रहात होत्या. तेथे ते योद्धे एक उच्च दर्जाचे मद्य चाखत बसले होते. त्यांच्या गळयात हारांच्या माळा होत्या. दागिने होते ज्यात मौल्यवान रत्नं गुंफलेली होती. जमिनीवर रंगीबेरंगी गालीचा अंथरलेला होता. तेथे केशवाचे पाय अर्जुनाच्या मांडीवर होते. अर्जुन त्याचे पाय द्रौपदी आणि सत्यभामाच्या मांडीवर ठेवून बसला होता. मी आल्याचे पाहून पार्थ मला खुणवतो कीं, मी तेथे असलेल्या एका आसनांवर विराजमान व्हावे. ती चौपायी मी माझ्या हातांनी जवळ घेतली व त्यावर बसलो. मला त्यांचे पायाचे तळवे दिसत होते. त्यावरील शुभलक्षणं मी पाहिली. त्यात दोन रेषा होत्या आंगठ्या पासून तळव्याच्या दुसऱ्या टोकाला गेलेल्या होत्या. ते दोघे सावळया वर्णाचे उंचेपुरे एकाच आसनावर बसलेले पाहून मला भिती वाटली. मला क्षणभर वाटले कीं, इंद्र आणि विष्णू बसले आहेत. ते त्या दोघांच्या बाबतचे सत्य दुर्योधनाला ठाऊक नाही. तो द्रोण व भिष्मांवर आणि त्याच्या खास मित्रावर, कर्णावर भारी विश्र्वास ठेवून आहे. त्यावेळी मला पटले कीं, युधिष्ठाराचा भरवसा कीं, युद्ध जिंकणार मला बरोबर वाटू लागला. विशेष म्हणजे ते दोघे युधिष्ठीराला फार मानत होते. त्यावरून त्याची महत्ता मला समजू लागली. त्यांनी माझे स्वागत केले व मला खाणे आणि पेये देऊन माझा सन्मान केला. त्या औपचारीक विधी नंतर मी बोलावयाला सुरूवात केली, त्यांना मी आपला संदेश दिला. त्यांचे विचार काय असें विचारले, जशी रीत आहे. ते सांगतांना मी माझ्या हातांने नमस्कार करून बोलत होतो. त्यानंतर पार्थाने कृष्णाचा पाय त्याच्या मांडीवरून काढला, त्यावेळी त्याच्या हातावरूल धनुष्याच्या दोराचे वळ मला स्पष्ट दिसत होते. त्यानंतर पार्थ मान ताठ करून बसला. त्यावेळी कृष्ण मला बोलले, त्यांचा आवाज सुमधूर होता, तो ऐकतांना एक वेगळाच संतोष होत होता. त्यांचे बोलणे जरी शांत होते तरी त्यात एक कठोर धमकी मला जाणवली. ते कौरवांना उद्देशून बोलत होते. त्यांचे विचार सुस्पष्ट होते. ते ऐकतांना

एक विलक्षण भिती वाटत होती. तो देव म्हणाला, "संजया, तुझ्या राजाला माझे मत सांग. भिष्म, द्रोण ह्यांना प्रथम सप्रेम नमस्कार करतो. सगळया ज्येष्ठ मंडळींना माझा नमस्कार सांगा. इतरांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे माझे वंदन सांगा. त्यानंतर तो बोलतो, तुम्ही विविध यज्ञ करता. त्यातून ब्रह्माला दानं करता. आपले जीवन तुमच्या मुलाबाळांसह सुखाने व्यतीत करता, पण आता परिस्थिती बदललेली आहे. सत्पात्र दान करतां कां? मनासारखे पुत्र व्हावे ह्यासाठी ते यज्ञ करता. तुम्हाला जे प्रिय आहेत त्यांच्यावर मेहरबनी करता, परंतु, आता युधिष्ठार तुमच्या मुलांशी त्याचे हक्क मिळवण्यासाठी युद्ध करणार आहे". ते बोलतांना कृष्णाच्या डोळयात मी अश्रू पाहिले. कौरवानी पांडवांवर जे कर्जाचे ओझे घातले आहे त्याची परतफेड ते करण्यास तयार नाहीत म्हणून ही वसुलीची कारवाई युद्धाच्या रुपाने होणार आहे. माझ्यावर सुद्धा पांडवांचे कर्ज झाले आहे तेसुद्धा मला फेडावे लागणार आहे. विनाकारण सव्यसाची, भिम, युधिष्ठीर अशा पुण्यश्लोकांचे उपमर्द करून ते कर्ज कौरवांनी केले आहे ते वसुल केले जाईल. त्यांना त्या वसुलीच्या युद्धात मदत करून मी माझे कर्ज फेडणार आहे. पार्थाला अगदी पुरंदराने जरी आव्हान दिले तरी मला त्यासाठी पुरंदराशी लढावे लागणार आहे. अर्जुन कोणलाही आटपणारा नाही, इंद्रालासुद्धा नाही. त्यांने असुर, गंधर्व, यक्ष आणि नाग अशा अनेक स्वर्गीय प्रजातींचा पराभव केला आहे. त्याला कौरव हरवू शकणार नाहीत. त्यात पुन्ही मी त्याच्या बरोबर आहे म्हणून ते केवळ अशक्य आहे ते आपल्या दुर्योधनाला सांगा. विराटात असतांना त्याने एकट्याने कौरवांचा बिमोड केला होता व त्यात कर्ण आणि द्रोणांचे कपडे काढून घेतले होते त्याची आठवण दुर्योधनाने ठेवावी. लढाईत जिंकण्यासाठी थकवा न येणे जरूरीचे असते. तो गुण सगळया पांडवांत आहे जो कौरवांच्या वासनिक जीवन शैलीमुळे त्यांच्याकडे नाही.

यान संधी पर्व भाग एकोण साठावा संपला.

# यान संधी पर्व

## भाग साठावा

वैशंपायन पुढे सांगतात, संजयाचे ते भाषण त्यातील मुद्द्यांच्या संदर्भात तो विचारार्थ घेतो. त्या विचारातील जमेचे व वजाचे मुद्दे नीट तपासल्यानंतर आणि दोनही पक्षांचे युद्धबळ तंतोतंतपणे अजमावल्यावर तो त्या युद्धाचे विश्लेषण करू लागतो. त्याला मनातल्या मनात त्याची मुलं जिंकावीत असें वाटत असते, त्या दृष्टीने तो परिस्थितीचा अंदाज घेऊ लागतो. त्याला समजते कीं, पांडव मानवी आणि दैवी अशा दोनही बाबत कौरवांपेक्षा कितीतरी जास्त श्रेष्ठ आहेत. ते लक्षात आल्यावर तो अंध राजा दुर्योधनाला बोलतो, "अरे सुयोधना, मला तुमच्या बद्दल नेहमीच काळजी वाटत असते. सगळेच प्राणी त्यांच्या संततीबद्दल विशेष प्रेम दाखवतात. त्यांच्यासाठी काय चांगले काय वाईट ते तो प्राणी पहात असतो. त्याप्रमाणें तो त्यांचे भले करण्याचा प्रयत्न करत असतो. खांडव मध्ये काय झाले ते पाहिलेस कां"? अग्नी धनंजयाला निश्चितपणे मदत करावयाला येणार. ह्या युद्धात तो त्याची विध्वंसक शक्ती खात्रीने वापरणार किर्तीला मदत करण्यासाठी. त्याशिवाय इतर लोकपाल देवसुद्धा त्याला मदत करणार हेसुद्धा ठरलेले आहे. कारण पांडव लोकपालांची संतान आहेत. त्यामुळें पांडवांचे पारडे भारी आहे. भिष्म, द्रोण आणि कृपाचार्यांच्या हल्ल्यापासून त्यांना संरक्षण देण्यासाठी ते येणारच. स्वर्गीय देवता आणि पांडव एकत्र आल्यावर त्यांच्याकडे नुसते पहाणेसुद्धा मुष्किल होणार आहे. लढणे दूर राहिले. सगळे जग त्यांना दैवीमानव समजते. सगळे जाणतात की, त्यांच्या कडून सर्व राजे मारले जाणार आहेत. जो योद्धा पांचशे बाण एकावेळी फेकतो जे कोणी पाहू शकत नाही. सगळे कुरु घराण्यातील योद्धे जाणून आहेत कीं, त्याला पराजित करणे केवळ अशक्य आहे माणसाला. त्या अर्जुनाची तुलना फक्त उपेंद्राशी करता येईल. ते सगळे पुन्हा पुन्हा लक्षात आल्याने मी बेचैन झालो आहे. माझ्या मुलांचे बले कशात आहे ते मला पहावे लागेल. ह्या युद्धात फार मोठा विध्वंस होणार आहे हे निश्चित. शांतीचा प्रस्ताव कोणालाही मंजूर नाही. मी पार्थाबरोबर शांतता मांगत आहे. मला युद्ध नको, माझा मूर्ख पुत्र कांहीं बोलो. पांडव कौरवांच्या पेक्षा जास्त बलवान आहेत हे निश्चित. मला माझी मुलं माझ्या समक्ष मेलेली पहावयाची नाहीत. कोणीतरी हे सगळे थांबवा.

यान संधी पर्व भाग साठावा संपला.

## यान संधी पर्व

## भाग एकसष्ठावा

वैशंपायन पुढे सांगतात, बापाचे ते खेद जनक उद्गार ऐकून त्याची मुलगा रागाच्या भरात बोलतो, तुम्हाला वाटते पार्थाला त्याचे दैवी दोस्त मदत करणार आहेत. तुमचा हा अंदाज खोटा ठरणार आहे. कारण जेथे इच्छा आहे तेथे दैवतं मदतीला जात नाहीत. हावरट, लोभी, द्वेष, क्रोध, मत्सर, अशा मनाने जे केले जाते त्याला कोणताही देव कधीच मदत करत नाही, हे शास्त्रात दिले आहे. जेथे इच्छा नाही, मद मत्सर नाही, क्रोध नाही, द्वेष नाही अशांना ते मदत करतात. सुडाच्या भावनेने जे युद्ध केले जाते त्याला कोणतीही देवता मदत करत नाही. पूर्वी होऊन गेलेले नारदमुनी आणि द्वैपायन जे त्याच्या बैराग्या बद्दल ख्यातनाम आहेत ते असें सांगत होते. त्याशिवाय जमदाग्नीचा रामसुद्धा तेंच सांगत असें जेव्हां आम्ही त्यांच्याकडे शिकावयाला जात होतो. देवांना वासनांत (इच्छा) अडकलेले मनुष्य आवडत नाही. जर पांडव क्रोध, लोभीपणा ह्यात गुंतलेले नसते तर त्यांच्यावर ही वेळ आली नसती. माझी ताकद देवांपेक्षा जास्त आहे. मी अग्नीला चुटकीसरशी विझवून टाकीन. माझी ताकद इतकी आहे कीं, मी फाटलेले डोंगर जोडून टाकू शकतो. मी पाण्याला थिजवल्यानंतर त्यावरून रथ आरामात जाऊ शकतात. मी देव आणि असुरांचे सगळे व्यवहार निश्चित करत असतो. ते तुम्हाला अजून माहीत नाही. माझ्या राज्याच विषारी साप नाहीत. माझ्या राज्यात कोणालाही भय वाटत नाही. आकाशातील ढगसुद्धा माझ्या मर्जीने पाणी टाकतात. माझ्या शक्तीमुळें माझी प्रजा सुखी आहे. त्यांच्यावर कोणतेही संकट येत नाही. म्हणून अश्विन, वायू, अग्नी, इंद्र, मरुत आणि धर्म माझ्या क्षेत्रात ढवळाढवळ करावयाला येत नाहीत. पांडवांत ती शक्ती असती तर ते संकटात तेरा वर्षे रखडत पडले नसते. मी तुम्हाला सांगतो व आश्वासन देतो कीं, कोणीही असुर, राक्षस, गंधर्व, यक्ष किवा देव सुद्धा माझ्या वाटेला जात नाहीत. माझ्या मित्रांना मी भेटी देतो अतवा शत्रूला शिक्षा करतो ते माझ्या मर्जीने करत असतो. मी जे हे सांगतो ते खरे आहे. म्हणून लोक मला खरं बोलणारा म्हणून ओळखतात. सगळे माझ्या महान पणाचा अनुभव घेऊ शकतात. मी तुम्हाला सांगतो ते शेखी मिरवण्यासाठी नाही पण खरे सांगण्यासाठी हे समजून घ्या. मी कधी माझी स्तुती करत नाही कारण तसे करणे हलक्यापणाचे लक्षण समजले जाते. आता पांडवांचे व मत्स्यांचे, पांचालांचे, केकयांचे, सत्यकीचे आणि वासुदेवाचे दोष कोणते ते सांगतो. जसें नद्या सागरात मिळाल्या कीं त्यांचे स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात येते त्याप्रमाणे, जेव्हां ते माझ्याशी लढण्यासाठी येतील ते संपुष्टात येतील. माझी बुद्धीमत्ता, माझी उर्जा, माझे स्रोत, माझी हिम्मत सगळे पांडवांपेक्षा उच्च दर्जाचे आहे. भिष्म, द्रोण, कृप, सल्य, शाल्य ह्यांना जे आयुधांचे ज्ञान आहे त्यापेक्षा माझ्याकडे सुद्धा त्यांच्या कितीतरी

पट आहे. अशा प्रकारे वल्गना केल्यानंतर तो संजयाला युधिष्ठीराच्या सैन्य व्युहाबद्दल अधिक माहीती विचारतो.

यान संधी पर्व भाग एकसष्ठावा संपला.

# यान संधी पर्व

## भाग बासष्ठावा

वैशंपायन पुढे सांगतात, दुर्योधनाच्या वाह्यात बडबडीकडे दुर्लक्ष करत धृतराष्ट्र पार्थाबद्दल कांही विचारणार एवढ्यात कर्ण दुर्योधनाला खूष करण्यासाठी मध्येच बालतो, "मी जेव्हां खोटे बोलून रामाकडून ब्रह्मास्त्र मिळवले तेव्हां तो बोलला होता कीं, माझा अंत काळ केव्हा येणार आहे जेव्हां तू ते अस्त्र वापरण्याचे तंत्र विसरशिल. अशाप्रकारे शस्त्राची चोरी करणे हे एक महापाप आहे. त्यानंतर मी त्याची मर्जी सेवा करुन संपादन केली. ते ब्रह्मास्त्र अजून माझ्याकडे आहे व माझा अंतकाळ अजून आलेला नाही. म्हणून मी ह्या युद्धात तुला खात्रीने यशस्वी करून दाखवीन. माझ्यावर ह्या युद्धाची जबाबदारी सोपवावी मी ती कार्यक्षमतेने पार पाडीन. त्या ऋषीकडून मिळाल्ल्या अस्त्राच्या बळावर मी पांचालांना, करुशांना आणि मत्स्यांना त्या बरोबर सगळे पांडव त्यांची मुलं व त्यांची मुलं मारून टाकीन. अनेक विविध प्रांत जिंकून तुझ्या साम्राज्यात जोडीन. आजोबा आणि द्रोण तुझ्याबरोबर आहेतच. मी पार्थाची सगली मुल मारून टाकीन. माझे सैन्य त्यांच्यावर तुटून पडेल. ते काम माझे असेल. ते ऐकल्यावर भिष्म त्याच्या कडे पहात बोलले, "तू हे काय बोलतोस, अरे कर्णा? तुझी बुद्धी नाठाळ झाली आहे कारण तुझा अंतकाळ जवळ येत आहे. अरे तुला समजत नाही जेव्हां मुख्य मारला जाईल त्या बरोबर धृतराष्ट्राचे सगळे पुत्र सुद्धा मारले जातील. तुला माहीत आहे किर्तीचे कर्तृत्व कसे आहे. तरी तू मोठ्या मोठ्या गप्पा मारत आहेस. त्यांने एकट्याने सगळे खांडव वन कृष्णाच्या मदतीने दुष्टांपासून मुक्त कले ते तू विसललास कां"? त्याच्या कडे इंद्राचे वज्र आहे. केशव तुझ्यावर ते फेकेल तर तुझी राख होईल हे तुला समजत नाही. तू ज्या सर्पीण बाणाची पुजा करतोस त्यावर अर्जुनांने त्याचे अस्त्र सोडले तर तुझ्यासकट तो बाणसुद्धा जळून भस्मसात होईल हे तुझ्या कसे लक्षात येत नाही. अनेक युद्धांत दामोदराने तुझ्यापेक्षा जास्त शूर योद्धे पराजित केले आहेत. तो कृष्ण अर्जुनाचा संरक्षक आहे.

कर्ण बोलतो, मला माहीत होते कीं हा म्हातारा असेंच कांहीं बोलणार. तो त्या वृश्नीची स्तुती करणार, आता त्यांना समजू दे त्यांच्या अशा सततच्या अपमानकारक बोलण्याचा परिणाम काय होतो. मी माझी आयुध खाली ठेवतो. आजोबा मला फक्त दरबारात पहातील व मी युद्धात भाग घेणार नाही. कारण जेथे शुरांचा उपमर्द होतो तेथे शूर थांबत नाहीत. त्यानंतर मी माझी ताकद त्याना दाखवीन.

वैशंपायन पुढे बोलतात, "असें बोलून तो महान योद्धा सभेतून निघून जातो. तो गेल्यावर भिष्म दुर्योधनाला हसत हसत बोलतात, जे इतर कौरव ऐकत होते, पहा त्या सुताने त्याचा शब्द कसा पाळला? मोठ्या मोठ्या बाता मारण्या पलिकडे तो कांहीं करू शकत नाही". तेथे कलिग, जयद्रथ, छेड्डीधज, वल्हीक राजे तो प्रकार पहात होते. तो म्हणत होता कीं, तो शत्रूचे हजारो सैनिक मारेल मग आता काय झाले, आता कां हा पळाला? असेच कां हा त्याचा शब्द पाळणार? भिमसेनाचे भयंकर कृत्य पहा, त्याच्या पुढे हा कसा टिकेल? हा जमदाग्नीच्या आश्रमात खोटा ब्राह्मण बनून गेला आणि रामाकडून ती अस्त्र मिळवली. त्या पापकृत्यामुळें त्याची तपस्या आणि ती शस्त्रविद्या दोनही त्यांनी घालवले आहे. ते ऐकून कर्ण गेलेला पाहून रागावलेला दुर्योधन भिष्मांना बोलतो.

यान संधी पर्व भाग बासष्ठावा संपला.

## यान संधी पर्व

## भाग त्रेसष्ठावा

दुर्योधन बोलतो, "पंडुची मुलं साधारण माणसासारखीच आहेत. तेसुद्धा आईच्या उदरातूनच आले आहेत. त्यात कांहीं विशेष नाही. असे असतांना आपण त्यांना कांहीं विशेष दर्जा कां देता. आम्ही कौरव आणि ते पांडव एकाच प्रकारचे आहोत शक्तीने. आमची हिम्मत, धाडस, मर्दुमकी सगळे सारखेच असतांना त्यांना इतका भाव आपण कां देता मला समजत नाही. वयात सुद्धा आम्ही त्यांच्या एवढेच आहोत. शस्त्रविद्येतसुद्धा आमचे शिक्षण सारखेच आहे. आम्ही एकाच वंशाचे, वर्णाचे, पिंडाचे आहोत. मग आम्हाला विजय कां मिळणार नाही"? "मी तुमच्या शौर्यावर अवलंबून रहाणारा नाही. मी व माझा भाऊ, दुःशासन, कर्ण, कृप, वल्हीक, द्रोण असें सगळे लढू व पांडवांना हरवून टाकू. त्यानंतर ब्राह्मणांना मोठी दानं करू आणि यज्ञ करू त्यात ब्राह्मणांना खूप दक्षिणा देऊ. त्यांना पशुधनाचे दान करू. ते सगळे पंडुची मुलं पहात असतील त्यांच्या कैदखान्यातून. त्यांना दिसेल लोक कसे आम्हाला मनतात. तेंच नाही तर केशव सुद्धा समजेल आमची कुवत काय आहे".

ते बाष्कळ बोलणे ऐकून विदूर त्याला बोलतो, "ज्ञानी लोक सांगतात, कीं, बोलण्यात मर्यादा असणे नेहमी हितकारक असते. जो संयमी, विरक्त, जाणकार असून त्याशिवाय वेदांचा अभ्यास करतो तो सहसा यशस्वी होतो. त्याशिवाय क्षमाशिलता असेल तर तो अधिक प्रगती करतो. ते उत्तम गुण आहेत. तो सहसा पाप कर्म करत नाही. त्यामुळे त्याची अध्यात्मिक उर्जा वाढत जाते. असा माणून ब्रह्माला मिळतो. ज्या माणसाला त्याच्या मर्यादा समजत नाहीत त्यापासून शहाणी माणसे दूर रहाणे पसंत करतात. स्वतावर संयम असणे हा एक चांगला गुण आहे. तो क्षत्रियांसाठी आवश्यक समजला जातो. ज्याचे स्वतावर नियंत्रण आहे तो वासनांच्या आहारी जात नाही. त्याच्या इतर बरेच चांगले गुण वाढत जातात. जसें, क्षमाशिलता, सत्यवादीपणा, साधेपणा, इंद्रीयांवर नियंत्रण, धीरोदात्तता, नम्रता, समाधानीपणा, मितभाषी. त्याशिवाय द्वेष, गर्व, घमेंडखोरी, दुराभिमान, दुसऱ्याला फसवण्याची इच्छा, असमाधानीपणा व त्यातून उत्पन्न होणारे दुःख असें कित्येक दोष उरत नाहीत.

ज्याच्यात हावरटपणा नाही, जो समाधानी आहे, जो वासनांच्या आहारी फारसा जात नाही अशा माणसाला स्वसंयमी असें समजतात. ज्याच्या वागण्यामुळें लोकांना तो प्रिय होतो तो संयमी समजला जातो. तो सर्वात अग्रणी असतो. दुसऱ्यांचे भले व्हावे म्हणून प्रयत्न करणारा, जो

कोणालाही दुःख देत नाही, जो शहाणे निर्णय घेतो, जो स्वतः आनंदी रहातो व इतरांनासुद्धा आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करतो तो ब्रह्माला प्रिय असतो. परिस्थितीची जाण असलेला चुकीचे निर्णय घेत नाही. ज्याला त्याच्या ज्ञानामुळे समाधान प्राप्त झाले आहे त्याची पुढची पावल कोणालाही समज नाहीत. तो मोक्षाच्या दिशेने प्रवास करत असतो. त्याचे स्वर्गातील स्थान निश्चित असते.

यान संधी पर्व भाग त्रेसष्ठ संपला.

# यान संधी पर्व

## भाग चौसष्ठ

विदूर पुढे सांगतो, "जुन्या मंडळींकडून आम्ही ऐकतो, एकदा एक पारधी पक्षी पकडण्यासाठी त्याचे जाळे जमिनीवर टाकतो व पक्षी येण्याची वाट पहात बसतो. त्या जाळयात पक्षी अडकतात परंतु, ते सगळे एकदम उडू लागतात जसें तो पारधी त्यांच्या जवळ जातो. तो पक्षांचा थवा हवेत उडत असतो व त्यांच्या खालून तो पारधी त्यांना पकडण्यासाठी धावत असतो. त्यावेळी एक ऋषी त्याचे सकाळचे नित्यक्रम उरकून तेथून जात असतो. ते पाहून तो ऋषी त्या पारध्याला बोलतो, "अरें पारध्या तू जमिनीवरला त्या हवेतील लोकांच्या मागे कां धावत आहेस"? पारधी त्याला उत्तर देतो, "ते पक्षी संघटीत आहेत म्हणून ते त्या जाळयाला घेऊन उडू शकतात. जर एकटा पक्षी असतां तर तो मला सहजपणे सांपडला असता. जर ते एकत्र नसतील तर माझ्या तावडीत सापडले असते". पुढे त्या पक्षांत वाद झाला कीं कोणत्या दिशेने जावयाचे व त्या वादात ते खाली आले आणि पारध्याला मिळाले. ते एकमेकांना दोष देऊ लागले कीं, त्याच्यामुळें ते सांपडले. त्या पक्षांचे जे झाले तें माणसाचे होते जेव्हां ते छोट्या मतलबासाठी भांडतात. म्हणून एकत्र रहाणाऱ्यांनी कधी छोट्या मोठ्या गोष्टींवरून भांडू नये. ज्यांच्यात संघटना मजबूत आहे त्यांना कोणीही हरवू शकत नाही, एकीत बळ असते. अरे धृतराष्ट्रा, कौरवांनी अफाट वैभव मिळवले तरी त्यांचा लोभ कमी झाला नाही. त्यांची प्रवृत्ती हलक्या प्रतीची राहीली. त्यामुळें त्याचा फायदा त्यांच्या शत्रूंना होणार. धृतराष्ट्रा, भरत वंश कोळशासारखा आहे. ते संघटीत असतांना प्रज्वलित होतात परंतु, विभक्त झाले कीं, केवळ धुमसत रहातात. मी एका डोंगरावर कांहीं पाहिले त्याबद्दल सांगतो, ते ऐकल्यावर अरे कौरवा, तुझ्यासाठी काय उत्तम ते समजेल.

एकदा आम्ही उत्तरेकडील पर्वतावर गेलो होतो. आमच्या बरोबर कांहीं शिकारी व ब्राह्मण होते. ते मंत्र आणि औषधी ह्या बाबत चर्चा करत होते. तो उत्तरेकडील गंधमादन पर्वत होता. त्याच्यावर भरपूर वनस्पती होती. त्यात औषधी वनस्पती खूप होत्या. तेथे सिद्ध आणि गंधर्वांची वस्ती होती. तेथे झाडांवर मधाच्या पोळयांतून विपुल मध होता. कुबेर तो मोठ्या मजेत पित असें. त्याच्या संरक्षणासाठी विषारी साप होते. त्या मधाचे वैशिष्ट्य असें कीं जर कोणी माणूस ते पियील तर तो अमर होईल. आंधळयाला दिसू लागेल, म्हातारा तरूण होईल, अपंगाचे अवयव चांगले होतील. त्या लोकांतील जे ब्राह्मण जादूटोणा जाणत होते ते त्याबद्दल बोलत होते. त्यांच्या बरोबर जे शिकारी होते त्याना त्या मधाचा मोह झाला. तो मध मिळवण्यासाठी ते विचार

करू लागले. त्या प्रयत्नात ते सगळे मारले गेले. त्याचप्रमाणे तुझी मुलं अजातशत्रू होऊन पृथ्वीचा उपभोग घेण्याची स्वप्न पहात आहेत. तुझ्या दुर्योधनाची गत अशी आहे म्हणतात नां, घी देखा पण बडगा नही देखा. दुर्योधन धनंजयाशी लढण्याच्या गोष्टी करत आहे. मला त्याच्यात तो जोश आणि हिम्मत कीं तो त्याच्या समोर टिकाव धरेल. अर्जुन त्याला मारून टाकणार जर तो अर्जुनाशी लढावयास गेला. अर्जुनाची जी ख्याती आहे तशी तुझ्या मुलांची आहे कां"?

"तुला माहीत आहे कां, विराटाची पशुधन चोरण्यासाठी ते गेले होते त्यात सगळे होते, भिष्म, द्रोण, कृप आणि कर्ण ज्यांच्या बळावर तुझा मुलगा भरवसा करत आहे. त्यांचे काय झाले? अर्जुनाने त्यांना नागडे करून पाठवले होते तेव्हाच तुला समजले पाहिजे कीं, तुझ्या पक्षात किती बळ आहे. युधिष्ठीर अजून तुझा मान राखत आहे म्हणून पांडव सावकाशीने तुझ्या मुलाचे चाळे पहात आहेत. नाहीतर ते केव्हाच हस्तिनापुर घेऊन बसले असते. द्रुपद, मत्स्य आणि विराट व अर्जुन रागावले तर कौरवांचा खुर्दा होईल हे सक्षात घेऊन काय तो निर्णय घे. माझ्या मते तू युधिष्ठीराला तुझ्या मांडीवर घे व हा मामला बंद करून टाक एकदाचा. युद्ध झाले व त्यात तुझे सगळे पुत्र मारले गेले कीं, तू काय करणार"? तुला पांडवांशीच रहावे लागणार आहे, त्याचासुद्धा तुझ्यापुरता विचार कर.

यान संधी पर्व भाग चौसष्ठ संपला.

# यान संधी पर्व

## भाग पासष्ठावा

धृतराष्ट्र बोलतो दुर्योधनाला, "अरे दुर्योधना, माझे जरा ऐक, अज्ञानी प्रवाशाप्रमाणे तू आहेस, चुकीच्या मार्गाला योग्य मार्ग समजून त्याचा आग्रह तू करत आहेस. त्याचे एकच कारण, कीं, तुला त्या पांचांची संपत्ती सोडावयाची नाही. हे मी समजतो. तू एक विसरतोस कीं, ते पंचमहाभूतां सारखे आहेत, त्यांच्यात दुनियेची ताकद एकवटलेली आहे. त्यांना जिंकण्यासाठी तुला कांहीं त्याग करावा लागेल. त्यासाठी युद्ध करण्याची आवश्यकता तुला कां वाटते"? माझे ऐक, त्यांच्याशी समझौता करून चतुराईने तू कितीतरी जास्त कांहीं मिळवू शकशिल, जरी शांत चित्ताने माझ्या म्हणण्याचा विचार कर. पांडवांतील युधिष्ठीर चांगला आहे, त्याच्या चांगुलपणाचा धूर्तपणे उपयोग करून तू कितीतरी जास्त हक्क मिळवू शकशिल कारण तो अजून मला फार मानतो आहे. प्रचंड वादळाला अडवण्याचा प्रयत्न करणारा वृक्ष जसा कोलमडून पडतो तसे तुझे होणार आहे असा जो अंदाज आपल्या येथील सगळेंच मांडत आहेत त्यांत तथ्य आहे. तू क्षत्रिय आहेस म्हणजे सदैव लढलेच पाहिजे असे नाही. मुत्सद्देगिरी हा सुद्धा एक क्षत्रियांचाच गुण आहे. त्याचा उपयोग करण्याचा विचार कर. त्यांच्याकडील योद्धे अमानवी शक्तीने प्रेरीत आहेत. स्वतः पांडव दैवी आहेत हे तुला माहीत आहे. त्याशिवाय त्यांच्यातील दृष्टद्युम्न पहा, तो कोणाला हरणार नाही कारम तो जन्मला आहेच मुळी द्रोणाचार्यांना मारण्यासाठी. अंधक, वृश्नी मोठे नावाजलेले योद्धे आहेत. त्यांचा सत्यकी तो पांडवांचाच एक भाग आहे. ही वेळ भावनाविवश होऊन चुकीचे निर्णय घेण्याची नाही. तुझ्या एका चुकीच्या निर्णयामुळें असंख्य लोक विनाकारण मारले जाणार आहेत. अरे माझ्या मुलां आम्ही तुझे हिकचिंतक आहोत हे समजून तू आमच्या मताचा मान ठेवला पाहिजेस. नेहमी सगळे वाद, मतभेद युद्धाने सोचवावयाचे नसतात ते तू शिकला आहेस जेव्हां तू शिकत होतास. भिष्म जे सांगतात ते सगळया कुरु घराण्याच्या भल्यासाठी असते. त्यांच्या कठोर वाणीत प्रेम आणि हितचिंतन आहे ते तू आणि तुझा मित्र कर्ण समजत नाहीत. सगळे ह्या युद्धाच्या बाजूने नाहीत ह्याचे कारण तू समजतोस कीं ते पांडवांच्या बाजूचे आहेत. परंतु, प्रत्यक्षात तसे असते तर त्या लोकांनी त्या पंडुच्या मुलांना वनवासात आणि अज्ञातवासात जाऊ दिले नसते हे तू कां लक्षात घेत नाहीस. हे युद्ध टाळण्या मागील मुख्य उद्देश तू व तुझी भावंड, तुमचे परिवार सुखरुप रहावेत हा आहे. त्यात पांडवांची बाजू घेण्याचा भाग अजिबात नाही. ते सोमदत्त, वल्हीक, विदूर, भिष्म, द्रोण, कृप सगळे तुमच्या परिवाराच्या भल्यासाठी बोलत आहेत. म्हणून तू युद्धाचा आग्रह सोडून दे.

यान संधी पर्व भाग पासष्ठावा संपला.

## यान संधी पर्व

## भाग सहासष्ठावा

वैशंपायन पुढे सांगतात, सुयोधनाला अशाप्रकारे बोलल्यानंतर धृतराष्ट्र पुन्हा संजयाशी बोलतो, "मुला मला सांग, आता पर्यंत तू जे मला सागण्याचे राहून गेले असेल ते सगळे सांग, विशेष करून कृष्णाच्या बोलण्यानंतर अर्जुन तुला काय सांगत होता ते मला ऐकावयाचे आहे".

संजय सांगतो, "वासुदेवाचे बोलणे झाल्यावर अर्जुन मला सांगत होता असें कीं ते कृष्णसुद्धा ऐकत होता. तो सांगतो कीं, ते सगळे कौरवांच्या बाजूने लढणार आहेत, भिश्म, द्रोण, कृप, कर्ण, वल्हीक, सोमदत्त, अश्र्वत्थामा, शकूनी, दुःशासन, साल, पुरुमित्र, विविंसती, विकर्ण, चित्रसेन, जयद्रथ, राजा जयत्सेन, विंद, अनुविंद, भुरिश्रव, भागदत्त, इतर बरेच राजे जे दुर्योधनाची बाजू घेऊन आमच्यांशी लढणार आहेत त्यांचा अंतकाळ समीप आला आहे. पांडव रुपी अग्नीत तो दुर्योधन त्यांची आहुती देणार आहे. ते त्या राजांना समजत नाही. कोणाशी लढावयाचे त्यातील योग्य अयोग्य ओळखण्याची सारासार बुद्धी त्यां मंडळींची नष्ट झालेली आहे. त्या भरसभेत तू सगळयांच्या समक्ष सांगशिल कीं, महापापी महालोभी सुयोधन नांवाच्या माणसाला समजू दे कीं,  तू आत्ताच कृष्णाचे ऐकले आहेस, त्यात मी पूर्णतः सामील आहे, म्हणजे तेंच माझे मत आहे. त्या यज्ञात रथांच्या चाकांचा आवाज मत्राप्रमाणे असेल, बाण अर्घ्यासारखे असतील, धनुष्य शिडी सारखे असतील, जर ते युधिष्ठीराला त्याचे राज्य देणार नसतील तर कौरवांचे सगळे सैन्य त्या युद्धरुपी यज्ञात आहुती केले जातील. ते ऐकल्यावर मी त्वरित येथे येण्यासाठी निघालो.

यान संधी पर्व भाग सहासष्ठावा

# यान संधी पर्व

## भाग सदुसष्ठावा

वैशंपायन पुढे सांगतात, जेव्हां संजय ते सांगतो धृतराष्ट्रा समोर, दुर्योधन त्या अर्जुनाच्या बोलण्याकडे पूर्ण दुर्लक्ष करतो बाकीचे सदस्य सुद्धा गप्प बसलेले असतात. त्यानंतर ती सभा विसर्जित होते कारण तेथे जमलेले राजे उठून जाऊ लागतात. ते गेल्यानंतर धृतराष्ट्राला ते समजते, नेहमी प्रमाणे त्याच्या लाडक्या मुलाच्याच सल्ल्याने काम करणारा धृतराष्ट्र तसा ह्यावेळी सुद्धा संजयाला खाजगीत बोलतो कीं, त्याला काय वाटते, कां राजे अशारितीने उठून गेले असावेत? तो संजयाला त्याचे मत विचारतो कीं त्याला काय वाटते, कोण जिंकेल पांडव का कौरव म्हणून.

धृतराष्ट्र पुढे विचारतो, "मला तुझे प्रामाणिक मत दे कीं, ह्या दोघांत कोणाचे बळ कशात आहे व कशामुळें युद्धातील यश कोणाकडे जाईल. त्या पुन्हा, तुला पांडवांच्या बर्याच गोष्टी माहीत आहेत, म्हणून मी तुला विचारत आहे. मला सांग युद्ध झाले तर कोणता पक्ष हरेल तुझ्या अंदाजाप्रमाणे"?

संजय त्याला उत्तर देतो, "मी आपल्याशी कांहीं खोटे बोलणार नाही, अहो माझे राजे, माझ्यावर रागावणार असाल तर मी कसे खरे सांगणार, त्यासाठी जर आपण मला अभय देत असाल तरच मी खरे काय वाटते व त्याची कारणे आपल्याला सांगू शकेन. आपण अजमीदा घराण्याचे, आपले जन्मदाते व्यास आणि आपली पत्नी गांधारी ह्यांची शपथ घेऊन मी जे खरे ते सांगण्यास तयार आहे. त्यांच्या शपथेवर मी आपल्याला धनंजय आणि दामोदरांचे उद्देश सांगू शकेन. मी एक फार छोटा माणूस आहे आपला क्रोध सहन करण्याची माझी कुवत नाही".

वैंशपायन पुढे सांगतात, संजयाचे ते बोलणे ऐकल्यावर धृतराष्ट्र त्याची पत्नी आणि पिता व्यास ह्याना तेथे उपस्थित रहाण्याची विनंती करतो. त्याप्रमाणें ते त्या सभागृहात येतात. संजयाचा व धृतराष्ट्राचा उद्देश समजल्यावर कृष्ण द्वैपायन जे त्यांच्या सूज्ञतेबद्दल ख्यातनाम होते सगळे समजतात व त्यांना सहकर्य देण्याचे आश्वासन देतात. ते संजयाला बोलतात, "अरे संजया न घाबरता, धृतराष्ट्राच्या सगळ्या प्रश्नांची तुझ्या समजूतीनुसार योग्य उत्तरे दे. तुला वासुदेव व आणि अर्जुनाबद्दल जे सांगावयाचे ते सांग".

यान संधी पर्व भाग सदुसष्ठावा संपला.

# यान संधी पर्व

## भाग अडुसष्ठावा

ते आश्र्वासन मिळाल्यावर संजय सांगू लागतो, ते सर्वश्रेष्ठ धनुर्धारी अर्जुन आणि वासुदेव जे समसमान आहेत ताकदीमध्ये, त्यांनी त्यांच्या मर्जीने त्यांचे ह्यावेळचे जन्म घेतले आहेत असे, त्यातील एक चक्रधार आहे. ज्यांच्याकडे नजरबंदी करण्याची किमया आहे, त्यांचे तेज काय वर्णावे, ते कुरुंना दिसत नाहीत, ते पांडवांची क्षमता गरजेनुसार कमी जास्त करू शकतात, ज्याने लिलया नरकाला, संवराला, कंसाला आणि शिशुपालाला मारले, ज्याच्या अध्यात्मिक उर्जेची तीव्रता काय वर्णावी, ज्यांच्या मर्जीने सारी पृथ्वी त्यांच्या नियंत्रणाखाली असते, अशा लोकांच्या तीकदी व कमजोरीची आपण महाराज मला विचारणा करत अहात अशात मी काय सांगणार. ज्यांच्या ताकदीत कमी असें कांहींही नाही. तेथे फक्त ताकदच ताकद आहे तेथे कोणती तुलना त्यांची मी आपल्या नासमज मुलांच्या ताकदीशी कशी करणार ते सांगा जेथे तुलना होऊ शकत नाही. तरी कांहीं गोष्टी सांगतो, समजा सगळया जगाची ताकद एका पारड्यात ठेवली आणि दुसऱ्या पारड्यात कृष्णाची ठेवली तर कृष्णाचे पारडे भारी असल्याचे आढळेल. हे जग तो भस्म करू शकतो पण जग त्याला भसम करू शकत नाही. जेथे चांगुलपणा आहे, जेथे माणूसकी आहे, जेथे भूतदया आहे तेथे गोविंद असतो. आणि जेथे गोविंद आहे तेथे यश आपोआप येते. कारण य़शाचे दुलरे नांव जगन्नाथ आहे. त्याचे सगळया तिनही जगात चालते. कारण तोंच त्या विश्र्वाचा कर्ता आहे. येथे पांडव केवळ कारणमात्र आहेत असें मला वाटते, सगळे होत आहे ते कृष्णाच्या मर्जीने. जनार्दनाला आपल्या मुलांना शिक्षा करावयाची आहे कारण त्याच्यात चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया अभावाने आहेत. ज्याच्यात ते तीन गुण नाहीत तो पापाचरण करत असतो व म्हणून असे लोक जगन्नाथाला नष्ट करावे लागतात. तो जगाचा स्वामी असला तरी सेवकां सारखा समाजात राबत असतो कारण त्याच्यात अहंकार नाही. अशा जगाच्या धन्याला दुर्योधन हरवण्याच्या गोष्टी करत आहे! ह्यापुढे मी काय सांगणार महाराज.

यान संधी पर्व भाग अडुसष्ठावा संपला.

## यान संधी पर्व

## भाग एकोणसत्तरावा

धृतराष्ट्र त्यावर बोलतो, "तुला कसे समजले कीं माधव हांच जगाचा स्वामी आहे"? "तुला समजले व मला कां नाही ते समजले ते सांग".

संजय सांगतो, "आपल्याला कां नाही समजले ते मला माहीत नाही पण मला समजले कारण माझ्या संवनेदना सक्षम आहेत. कदाचित आपल्या संवेदना पुत्रप्रेमापोटी आपल्यासारख्याच अंध झाल्या असतील".

धृतराष्ट्र संजयाला बोलतो, "अरें गवळयाच्या मुला, मला सांग त्या कोणत्या संवेदना आहेत ज्या तुझ्याकडे आहेत व माझ्याकडे नाहीत"?

संजय बोलतो, "आपले परमेश्र्वर भले करो, अहो राजश्री, मला वास्तविक सुखाचा जो भ्रम आहे त्याची माहीती नाही. स्वताला सर्वश्रेष्ठ कधी समजलो नाही जसें आपण समजता, त्यामुळें आम्हाला त्या प्रभूची जाणीव होत रहाते त्यातून ते ज्ञान मिळते, जे स्वताला मालक समजतात त्यांना ती जाणीव तशी येणार? देव समजण्यासाठी प्रथम आपल्यात नम्रपणा असावा लागतो. आपण त्याबाबतसुद्धा अंध अहात त्यामुळें त्या गोष्टी तुम्हाला समजावून सांगण्याचा प्रयत्न मी कसा करणार? वेदांत ते सांगितले आहे पण ते वाचूनसुद्धा विसरलेल्यांना कसे पुन्हा सांगणार"?

ते ऐकल्यावर धृतराष्ट्र आपल्या लाडक्या मुलाकडे वळून बोलतात, "असें असेल तर अरे माझ्या मुलां, तू त्या कृष्णाला शरण जा व त्याचे संरक्षण मांग. हा संजय जे सांगतो ते नेहमी खरेच असते म्हणून मी त्याच्या बोलण्यावर विश्र्वास ठेवून तसे करण्यास सांगत आहे".

दुर्योधन ते ऐकून बोलतो, "तो देवकीचा पवित्र मुलगा जर अर्जुनाबरोबर असेल तर मी त्याला शरण जाऊ शकत नाही".

धृतराष्ट्र चिडून आपल्या पत्नीला उद्देशून बोलतो, "अहो भाग्यवान, हा तुझा लाडका मुलगा, ज्याचे मन दुष्प्रवृत्तीने भरलेले आहे, जो स्वताला व त्याचे ऐकणाऱ्यांना मारून टाकण्याचा

निर्धार करून वागत आहे, तो कोणाचेही ऐकत नाही, त्याला कांहीं समज देऊन पहा, तुमचे तरी ऐकतो कां"?

गांधारी त्यावर बोलते, "आपल्या ज्येष्ठांचे न ऐकणारा, स्वताच्या मातापितराना विसरणारा, सगळया आयुष्याचे मातेरे करणारा, त्याच्या अशा वागण्याने त्याच्या शत्रूचे हात मजबूत करणारा माझा मुलगा आहे ह्याचे मला दुःख होत आहे. अरें मुर्खा तुझ्या पित्याची आज्ञा मान कारण मलासुद्धा तेंच तुला सांगावयाचे आहे. तुझ्या पित्ये शब्द आठव जेव्हां भिम तुला गदेने मारील तेव्हा तुझा अंत होईल".

व्यास ऋषी सांगतात, "माझे ऐक, अरे राजा धृतराष्ट्रा, तू कृष्णाला मानतोस. जेव्हां संजय तुझा वकील म्हणून तेथे गेला होता, त्याला जे खरे ते समजले तेंच त्याने तुला सांगितले आहे. तो हृषिकेशाला ओळखतो. तो अतिप्राचीन देव आहे. तू जर संजयाचे त्याला समजून ऐकशिल तर तुझे भले होईल. मोठ्या अरिष्ठातून तुझ्या कुटूंबाला तो वाचवू इच्छित आहे. अरे विचित्रवीर्याच्या मुला, मनुष्य क्रोध आणि आनंद ह्याच्या झपाट्यात बरीच खोटी कामं करून बसत असतो. ज्यात तो अडकून मग त्यावर पस्तावत रहातो. जे समाधानी नसतात ते दुसऱ्याच्या संपत्तीचा मोह धरतात, त्यात ते त्यांचा विवेक हरवून बसतात आणि द्वेष, वासना ह्यात फसतात. त्यामुळें कित्येकांना मृत्यू मिळतो. जसें अंध मनुष्य खड्ड्यात पडतो. शहाण्या लोकांचा मार्ग जो त्याला ब्रह्माकडे नेतो तोंच खरा मार्ग आहे. जे हे खरे समजतात ते सगळया अडचणींवर मात करून आपले उद्दीष्ट साध्य करतात". धृतराष्ट्र बोलतो, "मला सांगा माझे जन्मदाते, संजयाने सांगितलेल्या मार्गाने जाऊन मला हृषिकेशाच्या कृपेने शांती मिळेल"?

त्यावर संजय बोलतो, "ज्या माणसाचे त्याच्या विचारांवर नियंत्रण नाही अशाला हृषिकश समजणे दुरापास्त आहे. ज्याचे त्याच्या विचारांचे व्यवस्थित नियंत्रण आहे व जो यज्ञादी विधी नित्यनेमाने करत आहे, त्यालासुद्धा ते तेवढे सोपे नाही. परंतु, ज्याने इच्छांचा त्याग केला आहे त्याला ती अध्यात्मिक दृष्टी मिळते जिच्यामुळें तो वैरागी जनार्दनाला ओळखू शकतो. ती अध्यात्मिक दृष्टी आणि अहिंसा प्रवृत्ती माणसाला खऱ्या अर्थाने ज्ञानी बनवते. म्हमून अरे राजा, आपण आपल्या वासना नियंत्रण करण्याचा प्रयत्न करावा. त्यात भ्रष्टता आणणारे विचार मनात येऊ देऊ नका. प्रयत्नाने सगळे जमते. भवाच्या आकर्षणात आपण राहू नका तरच ते आपल्याला जमेल. ज्ञानी ब्राह्मण असें सांगतात कीं, वासनांकडे दुर्लक्ष करण्याने ते शहाणपण प्राप्त होते. अहो

नृपश्री, ज्यांनी त्यांच्या इच्छांवर ताबा मिळवलेला नाही अशांनी केशवाचे खरे रुप कधीच दिसत नाही. ज्यांने ज्याच्या इच्छा संपवलेल्या आहेत त्याला स्वाभाविकपणे न मांगताच केशवाचे दर्शन आपसुकपणे होते. त्यालाच योग म्हणतात".

यान संधी पर्व भाग एकोणसत्तरावा संपला.

# यान संधी पर्व

## भाग सत्तरावा

धृतराष्ट्र बोलतात, "मी तुला विनंती करतो, अरे माझ्या संजया, मला त्या कमलनयन कृष्णाचे सांग. मला त्याच्या नावाने तो समजत नाही. मला त्या खऱ्या नराचे दर्शन हवे आहे".

संजय बोलतो, "मी आपल्याला विनंती करतो, त्याचे पवित्र नांव आहे, केशव जे तुम्ही आधीसुद्धा ऐकले आहे. त्याशिवाय असंख्य इतर नांवाने त्याला त्याचे भक्त ओळखतात. त्याच्या नांवांची कांहीं गणती नाही. त्याला वासुदेव म्हणूनसुद्धा बोलले जाते. तो सगळया चराचरांना त्याच्या मायावी प्रेरणेंने गुंतवून ठेवतो. कांहीं त्याच्या तेजांने उत्साहीत होतात. त्याला विष्णू सुद्धा बोलतात. कारण तो अतिशुद्ध आहे. त्याला माधव बोलतात, त्याच्या प्रेमळ स्वभावामुळें व त्याच्या योग साधनेमुळें. त्याला मधूसुदन बोलतात कारण त्याने असुर मधूचा वध केला जगाच्या भल्यासाठी. त्यांने जगाच्या भल्यासाठी वेळोवेळी अनेक वेळा पृथ्वीवर अवतार घेतले दुष्टांचा नाश करण्यासाठी जसा ह्यावेळी तो आला आहे तुझ्या दुष्ट मुलांचा नाश करण्यासाठी. त्याला त्यांने मारलेल्या अनेक पापपुरूषांच्या नांवाने सुद्धा ओळखतात. आता तो सत्तवत वंशात अवतरला आहे, ह्यावेळी त्याचे नांव आहे कृष्ण. त्याचा अर्थ चिरंतन शांती. त्याला पुंडरीक म्हणतात. ते त्याच्या एका स्थानावरून आलेले आहे. त्याला जनार्दन म्हणतात, कारण तो सगळया कुकर्मींचा कर्दनकाळ आहे. त्याला कांहीं वृषभाक्षन म्हणतात कारण वृषभ म्हणजेच वेद व ते ज्याचे डोळे आहेत असा. त्याला अज असेंसुद्धा म्हणतात. म्हणजे जो कधी त्या अर्थाने माणसात जन्मत नाही ज्या अर्थी सामान्य माणसे जन्मतात. त्याला दामोदर असे म्हणतात, कारण त्याचे तेज त्याचे स्वताचे आहे. त्याला हृषिकेश म्हणतात, कारण, त्याच्या सानिध्याने चिरंतन सुख त्याच्या फक्तांना मिळते. त्याला महावहू म्हणतात, त्याचे कारण असें समजतात कीं तो पृथ्वी आणि आकाश धरून आहे. त्याला अधाक्षज म्हणतात, कारण तो अक्षय आहे, त्याचा कधी अधःपात होत नाही. त्याला नारायण म्हणतात कारण तो सुक्ष्मपणे प्रत्येक मनुष्यात हजर असतो. आणि त्यालाच ओळखणे हे प्रत्येक माणसाचे कर्तव्य असते. ज्यांने त्याला ओळखले तो मुक्त होतो. त्याला पुरूषोत्तम म्हणतात कारण, तो स्वतः स्वताला उत्पन्न करत असतो व स्वताच स्वताला संपवत असतो. तो विश्र्व निर्माण करतो आणि संपवतो सुद्धा, त्याला सगळे ज्ञान आहे म्हणून त्याला कांहीं ज्ञानी लोक सर्व म्हणून बोलतात. गोविंद म्हणजे सत्य (वचन) म्हणून त्याला कांहीं सत्य असेंसुद्धा बोलतात. त्याला अनंत म्हणतात. कारण तो नित्य आहे. तो माया उत्पन्न करतो. सत्यातून असत्य

तयार करतो त्यालाच आपण माया म्हणतो. त्या मायेच्या प्रभावाखाली ही सृष्टी निर्माण झाली व चालू आहे. अशा विविध गुणाचा हा जो चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ह्यांचे एकत्र रुप आहे, साक्षात पावित्र्य आहे. त्याची कृपा झाली तर कौरवांचा ऱ्हास थांबवता येईल. पण तो आधीच पांडवांकडे आहे. तू जेव्हां त्याच्याकडे गेला होतास तेव्हां तू त्याची सेना मागितलीस व अर्जुनाने त्याला मागितले तेव्हांच ठरले कीं, तुमचा नाश होणार".

यान संधी पर्व भाग सत्तरावा संपला.

## यान संधी पर्व

## भाग एकाहत्तरावा

धृतराष्ट्र बोलतात, "अहो संजया, मला त्यांचा मत्सर वाटतो कारण मी त्याला तुझ्यासारखा पाहू शकत नाही. मला सांगतात कीं, तो ह्या अवतारात खूप सुंदर दिसतो. त्याचे तेज विलक्षण आहे. तो बोलू लागला कीं, ते ऐकत रहावे असें वाटते. त्याचे बोलणे श्रींजयांना भावते. पूर्ण निर्दोष असा तो आहे हे मी ऐकतो. त्याचे कर्तृत्व विलक्षण आहे व तो तूर्त यादवांचा शिरोमणी आहे. त्याचे निर्णय अत्युत्तम असतात ज्यामुळें पुण्यवंतांचे भले होते. तो पापात्म्यांचा कर्दनकाळ आहे. ते जमलेले कौरव त्याला पाहू शकतात त्यांचे भले होईल असें मी समजतो. ह्या अवतारात तो वृश्नींचा कुळवतंस आहे. माझ्या सगळया लोकांचा तो कंठमणी होवो. तो मधूवचनी ज्याच्या मुखातून फक्त शुभ निघते, मी मला त्या सर्वशक्तीमान कृष्णाच्या हवाली करतो. तो साध्यांना सहज प्राप्त होतो जे खरे वैरागी आहेत. तो अरिष्ठ पक्षासारखा आहे ज्याला सुंदर पंख आहेत. जगाला उत्पन्न करणारा, प्राचीन, ज्याला कांहीं सुरूवात व अंत नाही. ज्याचे कर्तृत्व म्हणजेच हे विश्र्व आहे. ज्याने देव उत्पन्न केले, असुर, रक्षस त्यावेळी अनवधानाने उत्पन्न झाले त्यांचे निराकरण तो सतत करत असतो. जो स्वताला एवढे सगळे करून इंद्राचा धाकटा बंधू म्हणून सांगतो अशा माधवाला माझा नमस्कार.

**- यान संधी पर्व संपले –**

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळया नितीशास्त्र शिकवणाऱ्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते

सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षें मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईंदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकऱ्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकऱ्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले

आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म

पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकाऱ्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्याकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.



ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा.

धन्यवाद